# सामान्य प्रशासन विभाग

- मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना

# मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना.

शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-2016 /प्र.क्र.432/कार्यासन 12, दि.20 मार्च, 2018

**उद्देश :-**

- मानांकने / निकषांवर आधारित शासकीय कामगिरीचे गुणाधारीत मूल्यमापन करुन याव्दारे उत्कृष्ट कामगिरी साध्य करणाऱ्या व त्यासाठी अंगभूत क्षमतांचा पूर्णपणे वापर करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना सन्मानित करणे व त्याव्दारे इतर अधिकारी / कर्मचारी यांना कामकाजासाठी प्रोत्साहीत करणे.

**योजनेची व्याप्ती :-**

- मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना महाराष्ट्र राज्यात सर्व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येईल.

**योजनेचे स्वरुप :-**

विविध निकषांनुसार अधिकारी/कर्मचारी यांच्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेवून गुणांकन केले जाईल. सदर गुणांकन दोन प्रकारे करण्यात येईल.

- उद्दिष्टनिष्ठ बाबींसंदर्भातील (Ojective items) कामगिरी उदा. कार्यालयीन उपस्थिती, कामाचा निपटारा, वक्तशीरपणा, सचोटी, गोपनीय अहवालातील प्रतवारी, कार्यालयीन वर्तणूक वैगरे बाबींसाठी गुणांकन देण्यात येईल.
- व्यक्तिनिष्ठ बाबींसदर्भातील (Subjective items) कामगिरी उदा. संवाद कौशल्य, मसुदा कौशल्य, शासन नियमासंदर्भातील ज्ञानाची पातळी, नि:पक्षपातीपणा, निर्णय घेण्याची क्षमता, सादरीकरणाची क्षमता, नाविन्यपूर्ण कामकाजासंदर्भातील कल, लोकांशी सौजन्यपूर्ण वागणूक, वरिष्ठांना योग्य प्रकारे विषयाचे प्रस्तुतीकरण करण्याची क्षमता वगैरे बाबींसाठी गुणांकन देण्यात येईल.
- उद्दष्टिनिष्ठ बाबींचे गुण हे कार्यालयीन अभिलेख्यांच्या आधारे निश्चित करता येतील. मात्र व्यक्तिनिष्ठ बाबींचे गुणांकन करण्यासाठी स्वतंत्र समिति गठीत करुन या समितीने सदर गुणांच्या तपासणीच्या अनुषंगाने तपासणीसूचीनुसार गुणांकन निश्चित करणे अपेक्षित आहे. तसेच संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिलेल्या निकषासंदर्भात त्यांचे वरिष्ठ, कनिष्ठ व त्यांचे त्याच संवर्गातील इतर सहयोगी यांचे मत जाणून घेवून त्याआधारे समितीने गुणांकन निश्चित करणे अपेक्षित आहे.
- दोन्ही गुणांकन-उद्दिष्टनिष्ठ व व्यक्तीनिष्ठ यांची एकत्रित बेरीज करुन संबंधितांचे गुणांकन तीन स्तरावरील पुरस्कारासाठी ( जिल्हा, मुख्यालय व विभागप्रमुख ) अंतिम केले जाईल.

**पात्रतेचे निकष :-**

- राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे किमान 5 वर्षे शासकीय सेवा पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी याचा सदर पुरस्कार योजनेसाठी विचार करण्यात येईल.
- शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत स्थायित्व प्रमाणपत्र व 5 वर्षांची नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक राहील.
- शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत परीविक्षाधीन कालावधी समाधानकाररीत्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र, स्थायित्व प्रमाणपत्र व 5 वर्षाची नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक राहील.

- ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी/ न्यायालयीन चौकशी चालू आहे किंवा जे अधिकारी / कर्मचारी हे शिक्षा भोगत आहेत, अशा अधिकारी / कर्मचारी यांचा सदर कालावधीमध्ये पुरस्कार योजनेसाठी विचार करण्यात येऊ नये.
- मंत्रालय भूषण व प्रशासकीय विभाग भूषण पुरस्काराने अधिकारी / कर्मचारी यांना, त्यांच्या संपूर्ण शासकीय सेवा कालावधीमध्ये कमाल तीन वेळा सन्मानित करता येईल.
- विभागरत्न व संवर्गरत्न पुरस्कार तसेच जिल्हा / विभाग रत्न व क्षेत्रीय कार्यालय / मुख्यालय रत्न पुरस्काराने शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना शासकीय सेवा कालावधीमध्ये कितीही वेळा सन्मानित करता येईल.

**<u>पुरस्काराचे प्रकार :-</u>**

- सदर योजने अंतर्गत खालील चार पुरस्कार प्रदान करण्यात येतील.
  - **विभाग रत्न पुरस्कार**:-
    प्रशासकीय विभाग स्तरावर सहसचिव/उपसचिव हा संवर्ग वगळून 7 संवर्गासाठी स्वतंत्रपणे संवर्गनिहाय पुरस्कार देण्यात येतील.
  - **संवर्ग रत्न पुरस्कार**:-
    विभागरत्न पुरस्कार प्राप्त प्रत्येक संवर्गातील पुरस्कार्थीमधून संवर्गनिहाय तीन उत्कृष्ट मान्यवरांना तसेच सहसचिव/उपसचिव या संवर्गातील तीन उत्कृष्ट मान्यवरांना हा पुरस्कार देण्यात येईल.
  - **मंत्रालय भूषण पुरस्कार** :-
    संवर्गरत्न पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थीमधून एका उत्कृष्ट मान्यवरास हा पुरस्कार देण्यात येईल.
  - **सर्वोत्कृष्ट विभाग पुरस्कार** :-
    सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमधून एक विभागास हा पुरस्कार देण्यात येईल.

------*****------

# महसूल व वन विभाग

- **डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना**

## **डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना.**

**शासन निर्णय :- डब्ल्यूएलपी-0515/प्र.क्र.155/फ-1 दि. 4 ऑगस्ट, 2015.**

**उद्‌देश :-**

- गावातील जन-जल-जंगल-जमीन या संसाधनाचा शाश्वत विाकस साधून उत्पादकता वाढविणे.
- गावकऱ्यांच्या सहभागातून वन व वन्यजीवांचे संरक्षण व व्यवस्थापन करणे.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करुन सहजीवन प्रस्थापित करणे.
- वन व वन्यजीव संवर्धनातून मिळणारे फायदे ग्रामविकासाकरीता वापरणे.

**गावाच्या निवडीचे निकष :-**

- व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावे, राष्ट्रीय उद्याने/अभयारण्यातील व त्यांचे सीमेपासून 2 कि.मी. च्या आत येणारी गावे.
- गाव निवडतांना गाव समूह हे तत्व अवलंबावे.

**योजनेअंतर्गत करावयाची कामे :-**

- वन्यजीव संरक्षण व संसाधनाचा विकास –

  वनक्षेत्रावर नैसर्गीक पुन:उत्पादनाची कामे घेणे/ वैरण संसाधनाचा विकास करणे, पाणवठे निर्मिती करणे, विहिरींना कठडे बांधणे.

- मानव वन्यजीव संघर्ष कमी करणे –

वनावरील ताण कमी करण्याकरीता एल.पी.जी., बायोगॅस, सूर्यचूल, सुधारित चूली यासारख्या योजना राबविणे व अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या वापरास चालना देणे.

- पर्यायी रोजगार संधी वाढविणे .
- स्वच्छता अभियान राबविणे.
- पशुसंसाधनांचा विकास.
- जलसंसाधनांचा विकास.
- कृषि संसाधनांचा विकास.

------*****------

# कृषि व पदुम विभाग

- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना.
- प्रधानमंत्री किसान सन्मान योजना
- मुख्यमंत्री कृषि व अन्नप्रक्रिया योजना
- प्रधानमंत्री पीक विमा योजना
- महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART)

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना.

**<u>शासन निर्णय :-</u> क्र. शेअवि-2018/प्र.क्र.193/11-अे, दि. 1 डिसेंबर, 2018.**

**<u>उद्‌देश :-</u>**

- अपघातग्रस्त शेतकऱ्यास/त्यांच्या कुटूंबास आर्थिक लाभ देण्यासाठी सन 2015-2016 पासून सदर योजना सुरु करण्यात आली.

**<u>योजनेचे स्वरुप :-</u>**

- शासनाकडून सर्व खातेदार शेतकऱ्यांचा विमा हप्ता भरण्यात येतो.
- शेतकऱ्यांनी अन्य कोणताही विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध असणार नाही. या विमा योजनांअंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.
- या योजनेअंतर्गत मिळणारे लाभ पुढीलप्रमाणे असतील :-

| **अ.क्र.** | **अपघाताची बाब** | **नुकसान भरपाई** |
|---|---|---|
| 1 | अपघाती मृत्यू | रुपये 2,00,000/- |
| 2 | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | रुपये 2,00,000/- |
| 3 | अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | रुपये 2,00,000/- |
| 4 | अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | रुपये 1,00,000/- |

**<u>लाभार्थी निवडीचे निकष :-</u>**

- महाराष्ट्र राज्यातील 10 ते 75 वयोगटातील नोंदीत शेतकरी
- शेतकरी म्हणून त्याच्या नावाचा समावेश असलेला 7/12 किंवा 8-अ नमुन्यातील उतारा.
- शेतकऱ्यांचे वारस म्हणून तलाठ्याकडील गाव नमुना नं. 6-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.
- अपघाताच्या स्वरुपानुसार इतर कागदपत्रे.

**<u>विमा संरक्षणामध्ये समाविष्ट बाबी :-</u>**

1. रस्ता/रेल्वे अपघात 2. पाण्यात बुडून मृत्यू 3. विषबाधा 4. विजेच्या धक्क्या बसल्याने झालेला अपघात 5. वीज पडून मृत्यू 6. खून 7. उंचावरुन पडून झालेला अपघात 8.सर्पदंश व विंचूदंश

9. नक्षलवाद्याकडून हत्या 10.जनावरांच्या खाल्ल्यामुळे/ चावण्यामुळे जखमी/मृत्यू 11. दंगल 12. अन्य कोणतेही अपघात.

**वारसदार :-**

- मृत शेतकरी यांची पत्नी/पती.
- मृत शेतकऱ्याची अविवाहित/विवाहित मुलगी.
- मृत शेतकऱ्याची नातवंडे.
- मृत शेतकऱ्याची आई.

------*****------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना.

**उद्देश :-**

- अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे.

**योजनेचे स्वरुप :-**

- सदर योजनेअंतर्गत खालील घटकासाठी त्यापुढे नमूद रकमेच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा | |
|---|---|---|---|
| 1 | नवीन विहीर | 2,50,000/- | |
| 2 | जुनी विहीर दुरुस्ती | 50,000/- | |
| 3 | इनवेल बोअरिंग | 20,000/- | |
| 4 | पंप संच | 20,000/- | |
| 5 | वीज जोडणी आकार | 10,000/- | |
| 6 | शेततळ्यांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण | 1,00,000/- | |
| 7 | सूक्ष्म सिंचन संच | ठिबक | 50,000/- |
| | | तुषार | 25,000/- |

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

- लाभार्थी हा अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.

- शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.
- शेतकऱ्याकडे त्याच्या स्वत:चे नावे किमान 0.40 हेक्टर व कमाल 6.00 हेक्टर शेतजमीन असली पाहिजे.
- शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा 7/12 दाखला व 8अ उतारा असणे आवश्यक आहे.
- लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.
- लाभार्थ्यांचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.
- दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य.
- दारिद्रयरेषेखालील नसलेले अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. 1,50,000/- पेक्षा जास्त नसेल तरच या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.
- दारिद्रयरेषेखालील (बीपीएल यादीत अंतर्भूत शेतकऱ्यांसाठी वार्षिक उत्पनाच्या मर्यादेची अट नाही. परंतु ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये 1,50,000/- चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसीलदार यांच्याकडून मागील वर्षाचा उत्पन्नाचा अद्ययावत दाखला घेऊन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना**

अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या तरतुदी सारख्याच तरतुदी असणारी ही योजना राबविली जाते.

------*****------

## प्रधानमंत्री किसान सन्मान योजना

**<u>शासन निर्णय :-</u> क्र. किसयो-2019/प्र.क्र.20/भाग-4/11-अे, दि. 15 फेब्रुवारी, 2019.**

**<u>उद्देश :-</u>**

- ज्या शेतकरी कुटूंबाचे एकूण कमाल धारण क्षेत्र 2.00 हेक्टर पर्यंत आहे त्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता सदर योजना राबविली जाते.

**<u>योजनेचे स्वरुप :-</u>**

- सदर योजना राज्यात दि. 1 डिसेंबर, 2018 पासून राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली असून या योजनेअंतर्गत विहित निकषांप्रमाणे ज्या कुटूंबाचे (पती-पत्नी व त्यांची 18 वर्षाखालील अपत्ये) दि. 1 फेब्रुवारी, 2019 पर्यंत सर्व ठिकाणचे मिळून लागवडीलायक एकूण धारणा क्षेत्र 2.00 हेक्टर पर्यंत असेल अशा पात्र शेतकरी कुटूंबियास रु. 2000/- प्रती हप्ता याप्रमाणे 3 हप्त्यात एकूण रु. 6000/- प्रती वर्षी लाभ मिळणार आहे.

**<u>योजनेचा लाभ मिळण्यासाठी खालील व्यक्ती पात्र असणार नाहीत :-</u>**

- जमिन धारण करणारी संस्था
- संवैधानिक पद धारण करणारे /केलेले आजी व माजी व्यकती.
- आजी/माजी मंत्री/राज्यमंत्री, आजी/माजी खासदार/राज्यसभा सदस्य, आजी/माजी विधानसभा/विधान परिषद सदस्य, आजी/माजी महानगरपालिकेचे महापौर, आजी/माजी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष.
- केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी/कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थांच्या अखत्यारितील कार्यालयांमधील आणि स्वायत्त संस्थांचे सर्व अधिकारी /कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज संस्थांमधील नियमित अधिकारी/कर्मचारी (चतुर्थश्रेणी/गट-ड वर्गातील कर्मचारी).
- मागील वर्षात आयकर भरलेल्या व्यक्ती.
- निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रु. 10 हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे. (चतुर्थश्रेणी/गट-ड वर्गातील कर्मचारी)
- नोंदणीकृत व्यवसायिक डॉक्टर, वकील , अभियंता, सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊटंट), वास्तुशास्त्रश्र (आर्किटेक्ट) इत्यादी क्षेत्रातील व्यक्ती.

  याबाबत राज्य, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरीय समित्यांची स्थापना केली आहे.

**ग्रामस्तरीय समितीची कार्ये व जबाबदारी पुढीलप्रमाणे आहे:-**

- पात्र शेतकरी कुटुंबाची यादी गावमध्ये प्रसिध्द करणे व हरकतींचे निराकरण करुन यादी निश्चित करणे.
- सदर योजनेची गावात व्यापक प्रसिध्दी करुन मोहिम स्वरुपात गावातील शेतकऱ्यांचे बॅंक खाते क्रमांक, आधार क्रमांक, मोबईल क्रमांक ही माहिति संबंधीतांच्या सहमतीने प्राप्त करुन परिशिष्ट अ मध्ये भरणे.
- 

  9
- ग्रामपातळीवर ही माहिती संकलीत करण्याची प्रमुख जबाबदारी ही तलाठी यांची असून ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक हे वरील कामासाठी पूर्ण सहकार्य करतील.

# मुख्यमंत्री कृषि व अन्नप्रक्रिया योजना

**<u>शासन निर्णय :-</u> क्र. राअअ-1116/प्र.क्र.248/14-अे, दि. 20 जून, 2017.**

**<u>उद्देश :-</u>**

- शेतीमालाचे मूल्यवर्धन करण्याकरिता शेतकरी सहभागाव्दारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यास प्रोत्साहन देणे.
- उत्पादित अन्नपदार्थाच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, ऊर्जेची बचत व्हावी, यासाठी प्रकल्पाच्या आधुनिकीकरणास प्रोत्साहन देणे.
- अन्नप्रक्रियेव्दारे उत्पादित मालास ग्राहकांची पसंती निर्माण करणे, बाजारपेठ निर्माण करणे व निर्यातीस प्रोत्साहन देणे.
- कृषि व अन्नप्रक्रियेकरिता प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती करणे.
- ग्रामीण भागातील लघू व मध्यम अन्नप्रक्रिया उद्योगांना प्राधान्य देऊन रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे.

**<u>योजनेचे स्वरुप :-</u>**

- सदर योजना सन 2017-18 पासून प्रथम 5 वर्षांकरीता प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानंतर योजनेच्या मूल्यमापन अहवालाच्या आधारावर सदर योजना पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
- या योजनेमध्ये पुढील उपघटकांचा समावेश असणार आहे:-

I. कृषि व अन्न प्रक्रिया प्रस्थापना, स्तरवृध्दी व आधुनिकीकरण

II. शीतसाखळी योजना.

III. मनुष्यबळ निर्मीती व विकास योजना.

**<u>योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र उद्योग/ संस्था :-</u>**

- फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया उत्पादने इत्यादींवर आधारीत अन्नप्रक्रिया प्रकल्प चालविणारे किंवा स्थापित करीत असलेले शासकीय/सार्वजनिक उद्योग
- सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी /गट
- सक्षम महिला स्वयंसहायता गट
- खाजगी उद्योग क्षेत्र.
- ग्रामीण बेरोजगार युवक.
- सहकारी संस्था.

**आर्थिक तरतुदी :-**

- केंद्र शासनाचा सहभाग बंद झाल्यामुळे ही योजना 100 % राज्यपुरस्कृत योजना आहे.
- या योजनेकरीता प्रतिवर्षी किमान 50 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

**उद्देश :-**

- ही योजना खरीप हंगाम 2016 पासून राज्यात राबविण्यात येत आहे. अधिसूचित पिकांना नैसर्गिक आपत्ती, कीड व रोग इ. बाबींपासून विमा संरक्षण देणे व नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देऊन पीक नुकसानीच्या कठीण कालावधीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखणे , हा या योजनेचा उद्देश आहे.

| **पिकांचे प्रकार** | **खरीप हंगामातील समाविष्ट पिके** | **रब्बी हंगामातील समाविष्ट पिके** |
|---|---|---|
| **एकूण पिके** | 15 | 08 |
| **तृणधान्य** | भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका. | उन्हाळी भात व गहू (बागायत व जिरायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) |
| **कडधान्य** | तूर, मूग, उडीद. | हरभरा |
| **गळीत धान्य** | भुईमूग, सोयाबीन, तीळ, कारळे, सूर्यफूल. | उन्हाळी भुईमूग, करडई, सूर्यफूल |
| **नगदी पिके** | कापूस व कांदा | रब्बी कांदा |

**सहभागी शेतकरी :-**

- अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार शेतकऱ्यांना योजना बंधनकारक असून बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक राहील.

**विमा संरक्षण :-**

- पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट.
- प्रतिकूल हवामानामुळे पिकाची पेरणी/लावणी न झाल्यास होणारे नुकसान.
- पीक कालावधीत प्रतिकूल हवामानामुळे होणारे नुकसान.

- काढणी पश्चात नुकसान
- स्थानिक नैसर्गिक आपत्ती (गारपीट, भुस्खलन, पुराचे पाणी शेतात आल्यास).
- **जोखीमस्तर :- या योजनेअंतर्गत 70 टक्के जोखीमस्तर देय आहे.**

**विमा हप्ता व अनुदान :-**

- शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या 2 टक्के, रब्बी हंगामासाठी 1.5 टक्के व नगदी पिकांसाठी 5 टक्के असा किंवा वास्तवदर्शी दर यापैकी जो कमी असेल तो राहील. उर्वरित विमा हप्ता रक्कम ही अनुदान स्वरुपात केंद्र व राज्य शासनामार्फत समप्रमाणात देय राहील.

------*****------

**11**

## महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART)

**<u>उद्देश :-</u>**

- दि. 8 जानेवारी, 2019 च्या मंत्रीमंडळ बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार दि. 19 जानेवारी, 2019 रोजी शासन निर्णयान्वये जागतिक बँक अर्थसहाय्यीत "महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन" हा सुमारे रु. 2220 कोटी (300 दशलक्ष डॉलर) गुंतवणूकीचा प्रकल्प राबविण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
- या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालावधी 6 वर्षे असणार आहे.

**प्रकल्पाची उद्‍दिष्ट्ये:-**

- कृषि मालाच्या पणन विषयक पायाभूत सुविधा निर्माण करणे.
- शेतमाल बाजार प्रवेशाच्या नोंदी, प्रतवारी, गुणवत्ता तपासणी, संगणकीकृत शेतमाल लिलाव पध्दती, साठवणूक सुविधा, निर्यात सुविधा निर्मिती, अस्तित्वातील सुविधांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे.
- कृषि उत्पन्न बाजार समित्या व खाजगी बाजार समित्यांना e-Trading Platform व्दारे एकीकृत बाजार नेटवर्कव्दारे जोडणे.
- शेतकरी उत्पादक गटांची निर्मिती व त्यांच्या सक्रिय सहभागाव्दारे शेतकऱ्यांना बाजारपेठशी जोडणे
- शेतमालाचे काढणी पश्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेव्दारे मुल्यवृध्दी करणे, ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य (Safe Food) उत्पादित करण्यास मदत करणे.
- विविध योजना व उपक्रमांचे एकत्रिकरण (Convergence) व्दारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांच्यासाठी उपजीविकेचे स्त्रोत निर्माण करणे.

**महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पासाठी कृषि विभाग नोडल विभाग म्हणून कामकाज पाहील आणि पदुम विभाग, पणन विभाग, सहकार विभाग, ग्राम विकास विभाग हे विभाग व त्यांच्या अधिनस्त यंत्रणा प्रकल्पांतर्गत सहभागी विभाग (Line Department) राहतील.**

------*****------

# शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

- सर्व शिक्षा अभियान.
- पढे भारत बढे भारत योजना.
- माध्यमिक शिक्षा अभियान.
- मदरसांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण.
- समग्र शिक्षा अभियान.
- राज्याचे युवा धोरण.
- खेलो इंडिया.

# सर्व शिक्षा अभियान

**सुरूवात :-**

- 2000-2001.

**उद्देश :-**

- 2010 पर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.
- शिक्षणातील सामाजिक, प्रादेशिक व लैंगिक भेद दूर करणे.
- प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.
- शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीच्या पर्यवेक्षणासाठी सुविधा उभारणे.

**योजनेचे घटक :-**

- शाळा उपलब्ध नसलेल्या अधिवासामध्ये शाळा उभारणे.
- शाळेमध्ये पायाभूत सुधारणा करणे.
- अतिरिक्त शिक्षक पुरविणे.
- शिक्षकांना प्रभावी प्रशिक्षण देवून त्यांची क्षमता वाढविणे.
- शैक्षणिक साहित्य विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे.
- मुलींच्या शिक्षणावर तसेच विशेष गरजा असलेल्या बालकांच्या शिक्षणावर विशेष लक्ष पुरविणे.
- संगणकाचे प्रशिक्षण देणे.

**योजनेचे लक्ष गट :-**

| अ.क्र. | घटक | 2005 सालची परिस्थिती | सद्यस्थिती 2017-2018 |
|---|---|---|---|
| 1 | शाळाबाह्य मुले | 1.34 कोटी | 61 लाख |
| 2 | वार्षिक सरासरी गळतीचा दर | 11.3 % | 4.13% |
| 3 | विद्यार्थी : शिक्षक प्रमाण | 41:1 | 23:1 |
| 4 | ढोबळ पटनोंदणी दर | -- | 99.21% |

**आर्थिक तरतूद :-**

- सुरवातीला 75:25 असा असणारा केंद्र : राज्य खर्चाचा वाटा 2016-17 पासून 60:40 असा झाला आहे.

------*****------

# पढे भारत बढे भारत योजना

**सुरूवात :-**

- 26 ऑगस्ट, 2014.

**उद्देश :-**

- मुलांना लवकर वाचता-लिहिता यावे तसेच गणित विषयात रस निर्माण व्हावा.

**योजनेचे स्वरुप :-**

- मुलांना लवकर वाचता व लिहिता येईल व भाषेत गोडी निर्माण होईल यासाठी प्रयत्न करणे.
- 
- भौतिक व सामाजिक, वास्तव जगाशी संबंधित असलेल्या गणित विषयात नैसर्गिक व सकारात्मक रुची निर्माण करुन गणित विषय अवगत करणे.

**योजनेचे उद्दिष्टे:-**

- मुलांना प्रोत्साहित करणे, मुभा देणे, त्यांना वाचनात व लिहिण्यात गुंतविणे, जेणेकरुन त्यांच्यात वाचनाचे व लिहिण्याचे कौशल्य विकसित होईल.
- आकडे, मोजणी, आकार यांमधील प्रश्न सोडविणे, कार्यकारणभाव समजावून घेणे, जेणेकरुन गणिती कौशल्य विकसित होईल.
- वाचन व लिखाणातून मुलांना आनंद मिळेल.

------*****------

# माध्यमिक शिक्षा अभियान

**सुरूवात** :-

- 2009-2010.

**उद्‌देश** :-

- मार्च 2009 मध्ये माध्यमिक शिक्षणाची उपलब्धता व माध्यमिक शिक्षणाचा स्तर उंचावणे.

**योजनेचे स्वरुप** :-

- अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, कला व हस्तकलांसाठी वर्गखोल्या, शौचालय, पेयजलाच्या सुविधा, दुर्गम भागात शिक्षकांसाठी निवासी वसतिगृहे उभारणे.
- 30 विद्‌यार्थ्यांमागे 1 शिक्षक या प्रमाणात अतिरिक्त शिक्षकांची भरती, विज्ञान-गणित-इंग्रजी शिक्षणावर भर, शिक्षक प्रशिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, माहिती-तंत्रज्ञान आधारित शिक्षण, अभ्यासक्रमात सुधारणा, शिकविण्याच्या पध्दतीत सुधारणा करणे.
- सूक्ष्म नियोजन, आश्रमशाळा अद्‌ययावत करणे, अनुसूचित जाती-जमाती व अल्पसंख्याकांचे प्रमाण जास्त असणाऱ्या क्षेत्रांवर विशेष लक्ष पुरविणे, दुर्बल घटकांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी विशेष लक्ष पुरविणे, शाळांमध्ये महिला शिक्षकांचे प्रमाण वाढविणे, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारणे.
- आता ही योजना समग्र शिक्षा अभियानाची भाग झाली आहे.

**योजनेचे उद्‌दिष्टे**:-

- शाळांची उपलब्धता वाढविणे, नजीकच्या अधिवासापर्यंत माध्यमिक शिक्षण उपलब्ध करणे.
- 2005-06 मध्ये माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 52.26 टक्के होती ती 75 टक्के करण्याचे ध्येय ठेवण्यात आले.
- 2017 पर्यंत माध्यमिक शिक्षणाच्या उपलब्धतेचे सार्वत्रिकीकरण करणे.
- 2020 पर्यंत माध्यमिक शिक्षणातील गळती रोखणे.
- Vision 2022 अन्वये 2022 पर्यंत 80,000 माध्यमिक शाळा अद्‌ययावत करावयाच्या आहेत. तसेच प्रत्येक विद्‌यार्थ्याला 5 कि.मी. परिघाच्या आत माध्यमिक शाळा उपलब्ध करावयाची आहे. RMSA योजना आणि नवीन समग्र शिक्षा अभियान ही उद्‌दिष्टे पूर्ण करण्याचे माध्यम आहे.

------*****------

15

**मदरसांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)**

शासन निर्णय क्र. मदर-2008/(348/08)-असंक, दिनांक 10/02/2009

**योजनेचा उद्देश** : मदरसामधील विद्यार्थ्यांना पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांप्रमाणेशैक्षणिक गुणवत्ता/योग्यता प्राप्त होण्याकरीता मदरसामधील पारंपारीक शिक्षणाबरोबरच शास्त्र, गणित, समाजशास्त्र, हिंदी व इंग्रजी हे आधुनिक विषय शिकविण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरविणे. ज्यायोगे त्यांच्यकरीता माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल व नोकरीच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध होतील.

**लाभार्थी** : अल्पसंख्यांक मुस्लीम समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागास व मकतब/मदरसा/दारुल उलूम येथे धार्मिक शिक्षण घेणारी मुले.

**योजनेचे स्वरुप** : ही योजना संपूर्णत: केंद्र शासन पुरस्कृत आहे. तथापि, योजनेची अंमलबजावणी राज्य शासनामार्फत करण्यात येणार आहे. या योजनेद्वारे मदरसांना त्यांच्या विद्यार्थ्यांकरीता प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील आधुनिक विषयातील गुणवत्तापूर्ण व व्यावसायिंक शिक्षण प्राप्त करुन घेण्यासाठी नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ ओपन स्कूलींग NIOS शी संलग्न व्हावे लागेल. या योजनंअंतर्गत 14 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या मदरसातील विद्यार्थ्यांकरीता NIOS मार्फत देण्यात येणारे व्यावसायीक शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध होईल. तसेच मदरसामध्ये आधुनिक विषय शिकविण्याकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकांना त्यांचे अध्यापन कौशल्य वाढविण्याकरीता प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे. या योजनेअंतर्गत आधुनिक विषय शिकविणाऱ्या शिक्षकाचे वेतन अनुदान, ग्रंथालय, बँक सुविधा तसेच प्राथमिक/माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी, सायन्स/गणित किटस् तसेच इतर अध्यापन विषय साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी, सायन्स लॅब, कॉम्प्युटर लॅब,वर्कशॉप व त्यांची देखभाल इ.साठी अनुदान दिले जाईल.

*******

## समग्र शिक्षा अभियान (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)

**उद्देश** : वयोगट 3 ते 18 वर्षे (पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक म्हणजे. इ.12 ची पर्यंतच्या मुलांच्या शिक्षणासाठी) असणाऱ्या मुलांना गुणवत्तापूर्ण व 21 व्या शतकातील कौशल्ये अंगीकृत करणारे शिक्षण प्राप्त होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, शिक्षक प्रशिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण, मुलींचे वसतीगृह, व अपंग एकात्मिक विकास योजना, या पूर्वीच्या योजना शालेय शिक्षणाकरीता एकात्मिक योजना म्हणून केंद्र पुरस्कृत योजना भारत सरकारने सन 2018-19 पासून सुरु केली. या योजनेचे समग्र शिक्षा अभियान असे नामकरण केले आहे.

**लाभार्थी** : समग्र शिक्षा ही योजना प्रामुख्याने शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मुलांसाटी लागू आहे. तथापि, मोफत पाठ्यपुस्तके, शिक्षक प्रशिक्षण इ.बाबी खाजगी अनुदानीत शाळांमधील मुले व शिक्षक यांच्याकरीता लागू राहतील. तर, शिक्षण हक्क कायद्यातील कलम 12 (1)(C) नुसार 25 टक्केआरक्षण या तरतुदीअंतर्गत खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये प्रवेशित बालकांच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**योजनेचे स्वरुप** : शैक्षणिक दृष्ट्या मागास गट, डावी कडवी विचारसरणी बाधीत जिल्हे, विशेष लक्ष केंद्रित जिल्हे आणि आकांक्षित जिल्ह्यांचा शैक्षणिक विकास साधण्यावर भर. या योजनेअंतर्गत शाळाबाह्य मुले, बेघर, अनाथ, रेल्वे स्थानकांवर राहणारीतसेच दुर्बल व वंचित घटकांतील मुलांसाठी निवासी शाळा, निवासी वसतिगृह, शाळांचे सक्षमीकरण (बांधकाम), शाळा सुविधा उपलब्ध नाही अशा ठिकाणची शहरी वंचित मुले/अनाथ मुले यांना नियमित शाळेत जाण्याकरीता परिवहन/मदतनीस सुविधा, शिक्षण हक्क कायद्यानुसार मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, 25 टक्के प्रवेश सुविधा, शाळाबाह्य मुलांकरीता विशेष प्रशिक्षण, स्थलांतरीत मुलांचे शिक्षण व हंगामी वसतीगृह, गुणवत्तेशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रम, अध्ययन समृध्दी कार्यक्रम, संयुक्त शाळा अनुदान, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडक शाळांसाठी ग्रंथालय तरतूद, राष्ट्रीय अविष्कार अभियान हा विज्ञान विषयक उपक्रम, क्रीडा साहित्य घेण्याची तरतूद,

शिक्षक शिक्षण, शाळाबाह्य, दुर्बल आणि वंचित गटातील मुलींसाठी कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय, समानतेकरीता विशेष कार्यक्रम, मुलींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण दिव्यांगांसाठी समावेशित शिक्षण अशा कार्यक्रमांचा समावेश आहे.

**आर्थिक सहाय्य** : या योजनेकरीता केंद्र व राज्याच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाण 60:40 असे आहे.

********

## राज्याचे युवा धोरण (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)

शासन निर्णय क्र. युकयो-2012/प्र.क्र.65/क्रीयुसे-3, दिनांक 12 नोव्हेंबर,2013

**उद्देश** : राज्यातील/जिल्हयातील युवांनी केलेले समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर युवा पुरस्कार प्रतिवर्षी देणे.

**लाभार्थी** : राज्यातील 13 ते 31 या वयोगटातील युवक/युवती व राज्यातील सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1860 किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट 1950 नुसार नोंदणीकृत संस्था.

**योजनेचे स्वरुप** : जिल्हा युवा पुरस्कार जिल्हा स्तरावर एक युवक, एक युवती यांना गौरवपत्र, सन्मानचिन्ह,रोख रक्कम व नोंदणीकृत संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम अशा स्वरुपाचा असेल.

राज्य स्तरावर युवा पुरस्कार क्रीडा विभागाच्या क्षेत्रिय विभागानुसार प्रत्येक विभागातील एक युवक, एक युवतीस गौरवपत्र सन्मानचिन्ह व रोख पुरस्कार या स्वरुपात व संस्थेस गौरवपत्र, सन्मानचिन्ह, व रोख पुरस्कार अशा स्वरुपाचा असेल.

अर्जदार युवक/युवती चे वय पुरस्कार वर्षातील 1 एप्रिल रोजी 13 वर्षे पूर्ण व 31 मार्च रोजी 35 वर्षे पर्यंत असावे. अर्जदाराचे त्या जिल्हयात सलग 05 वर्षे वास्तव्य तर राज्यात 10 वर्षे वास्तव्य असणे आवश्यक. पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागून दिला जाणार नाही. पूरस्कार मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही. केलेल्या कार्याचे सबळ पुरावे जोडणे आवश्यक. पुरस्कार प्राप्त युवक, युवती अथवा संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रियाशिल राहण्याचे हमीपत्र देणे आवश्यक. अर्जदार व्यक्ती/संस्थेचे केलेले कार्य स्वयंस्फूर्तीने केलेले असावे. एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती राज्यातील अन्य जिल्हयात पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. अर्जदार/संस्थेच्या सदस्यांचा पोलीस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला देणे आवश्यक राहील.

युवा व युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांची 1 एप्रिल ते 31 मार्च या कालावधीतील गेल्या तीन वर्षाची केलेली कार्य कामगिरी विचारात

घेण्यात येईल. तसेच युवा व नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य, राज्याचे साधन संपत्ती जतनव संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य, समाजातील दुर्बल घटक, अनुसुचीत जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग इ.बाबतचे कार्य, शिक्षण, प्रौढ शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण, व्यसनमुक्ती तसेच युवांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य, राष्ट्रीय एकात्मतेच प्रोत्साहन देणारे कार्य, नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या, महिला सक्षमीकरण इ.बाबत कार्य, साहस इ.बाबतचे कार्य.

जिल्हा स्तरावरील पुरस्कारांची निवड जिल्हास्तर पुरस्कार निवड समितीकडून करण्यात येईल तर राज्य स्तरावरील पुरस्कारांची निवड राज्यपुरस्कार निवड समितीकडून करण्यात येईल. दरवर्षी 01,मे या महाराष्ट्र दिनी जिल्हा पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल व 23 ऑगस्ट रोजी राज्य स्तरारवरील पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल.

********

## **खेलो इंडिया (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)**

शासन निर्णय क्र.केआयपी-2316/प्र.क्र.87/क्रीयुसे 1, दिनांक 20 नोव्हेंबर,2018

केंद्र शासनाने राजीव गांधी खेल अभियान, अर्बन स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर स्कीम, नॅशनल स्पोर्टस् टॅलेंट सर्च या तीन योजनांचे एकत्रिकरण करुन "खेलो इंडिया-क्रीडा विकासाचा राष्ट्रीय कार्यक्रम" ही योजना सुरु केलेली आहे.

**उद्देश** : या योजनेची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

क्रीडांगण विकास, क्रीडा शिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम, राज्यस्तर खेलो इंडिया केंद्राची स्थापना, वार्षिक खेळाच्या स्पर्धा, प्रतिभावंत खेळाडूंचा शोध आणि विकास (शिष्यवृत्ती), खेळाच्या पायाभूत सुविधांचा वापर आणि निर्मिती/सुधारणा, क्रीडा अकादमीसाठी सहाय्य, ग्रामीण आणि देशी व आदिवासी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा, शाळेतील मुलांची शारिरीक दुरुस्ती (तपासणी व मापदंड), महिला क्रीडा स्पर्धा, दिव्यांग लोकांमध्ये खेळाच्या सुविधा व स्पर्धा, शांती आणि विकासासाठी खेळ

**लाभार्थी** : राज्यातील खेळाडू

**योजनेचे स्वरुप** :

- देशातील खेळाच्या मैदानांचा सर्वे करुन GIS प्रणालीवर दर्शविण्यात येणार
- क्रीडा मार्गदर्शकांसाठी ऑनलाईन अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून याद्वारे क्रीडा शिक्षक व स्वयंसेवकांना मास्टर ट्रेनर म्हणून विकसित करणार. हे मास्टर ट्रेनर अन्य क्रीडा शिक्षकांना प्रशिक्षित करतील. ही योजना राज्याच्या योजनेला पूरक योजना म्हणून राबविण्यात येईल.
- राज्याने निर्माण केलेल्या क्रीडा सुविधा पुर्ण क्षमतेने वापरात आणल्या जात नसल्याने, त्याचा अधिकाधिक चांगला वापर होण्याच्या दृष्टीने राज्य स्तरावर खेलो इंडिया केंद्राची स्थापना करुन केंद्र शासनाद्वारे करारनामा (एमओयु) करुन केंद्र शासनाद्वारे साई (SAI) मार्फत अशा ठिकाणी डे-बोडींग योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना साईमार्फतच राबविण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासन केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र विकास कार्यक्रम व सी.एस.आर.द्वारे निधी उपलब्ध करुन देणार आहे.

- खेलो इंडिया योजनेअंतर्गत 2017-18 पासून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.यामध्ये एकूण 16 खेळांचा समावेश केलेला आहे.राष्ट्रीय क्रीडा महासंघ, भारतीय शालेय खेळ महासंघ, व भारतीय विद्यापीठ असोसिएशन यांच्या वतीने एकत्रित ऑलिंपीक अभियान राबविण्यात येईल. या स्पर्धेतून प्रतिभावान खेळाडूंची निवड केली जाणार असून अशा खेळाडूंना खेलो इंडिया अंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येईल.
- देशातील प्रतिभावंत खेळाडूंचा शोध घेण्यासाठी विविध चाचण्यांचे आयोजन करण्यात येऊन या चाचण्यांमार्फत पहिल्या वर्षी 1000 प्रतिभावंत खेळाडू शिष्यवृत्ती व प्रशिक्षणासाठी आठ वर्षांसाठी निवडण्यात येतील. निवड झालेल्या खेळाडूंना भारतीय खेळ प्राधिकरणाची क्रीडा अकादमी, क्रीडा शाळा, क्रीडा महाविद्यालये, राज्य क्रीडा अकादमी, तसेच खेळाडू वा खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या क्रीडा अकादमी मध्ये प्रवेश देण्यात येईल.
- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक ॲथलेटिक्स ट्रॅक, सिंथेटिक हॉकी मैदान लाईट व्यवस्थेसह, सिंथेटिक टर्फ फुटबॉल मैदान धावनपथ व लाईटव्यवस्थेसह, बहुउद्देशीय सभागृह, जलतरण भराव, मानवी क्षमता व पुनर्प्रगती प्रयोगशाळा स्थापन करणे, या शिवाय विद्यापीठांमध्ये स्पोर्टस् एक्सलंस सेंटर निर्माण करणे
- या योजनेअंतर्गत ग्रामीण, देशी व आदिवासी खेळांना व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्पर्धांचे आयोजन करणे
- खेलो इंडिया अंतर्गत देशातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती तपासण्यासाठी मापदंड विकसित करण्यात येत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याची शारिरीक तपासणी करुन विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक फिटनेसबाबतची माहिती संकलन करण्याची प्रक्रिया, नियम व मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येतील.
- राष्ट्रीय स्तरावर महिलांच्या एकूण 4 गटांमध्ये स्पर्धा होणार असून, या स्पर्धांमध्ये 12 खेळ प्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. तत्पूर्वी राज्यस्तरावरील स्पर्धा सुध्दा 12 खेळ प्रकारांमध्ये 4 गटात घ्यावयाच्या आहेत.
- दिव्यांग व्यक्तीसाठीच्या खेळांच्या आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यांना व भारतीय क्रीडा प्राधिकरणास वित्तीस सहाय्य पुरविणे. स्टेडीयम दिव्यांग सुलभ होण्याकरीता आवश्यक निधी दिव्यांग सक्षमीकरण योजनेतून उपलब्ध केला जाईल. या योजनेतून प्राप्त निधीचा उपयोग खेळाडू, खेळाडूंचे वर्गीकरण, साहित्य,

प्रशिक्षण आणि पॅराऑलिम्पिक खेळांसाठी संघाची तयारी आणि स्पर्धांसाठी करण्यात येईल.

**आर्थिक सहाय्य** : राज्य शासन केवळ महिला क्रीडा स्पर्धांवरील खर्च करणार असून, उर्वरीत सर्व योजनांवरील 100 टक्के खर्च केंद्र शासन करणार आहे.

---

# उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

- **मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना.**
- **राज्याचे ऊर्जा संवर्धन धोरण.**
- **प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना.**
- **सामूहिक प्रोत्साहन योजना – 2013.**

# मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना.

**<u>शासन निर्णय:-</u> क्र.सौरप्र-2018/प्र.क्र.401/ऊर्जा 7, दि. 15.11.2018.**

**<u>उद्देश :-</u>**

- कमी दाबाने वीजपुरवठा होणे, वीजपुरवठा खंडीत होणे, तांत्रिक वीज हानी वाढणे, रोहित्र बिघाड होण्याच्या प्रमाणात वाढ, विद्युत अपघात, विद्युत चोरी या सर्व समस्यांवर मात करुन शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषन विरहित सौर कृषी पंप उपलब्ध करणे.
- शेतकऱ्याला दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व पारंपारिक पध्दतीने कृषी पंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चात व शासनाव्दारे सबसिडीव्दारे देण्यात येणाऱ्या अनुदानात बचत करणे.

**<u>योजनेचे स्वरुप :-</u>**

- या योजनेअंतर्गत पुढील तीन वर्षांच्या कालावधीत 1 लाख सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
- ही योजना पूर्णत: राज्य शासनाची असेल.
- एकूण तीन टप्प्यांमध्ये योजना राबविली जाईल व प्रत्येक टप्पा तो प्रत्यक्ष सुरु झाल्यापासून 18 महिन्यांमध्ये राबविण्यात येईल.

**<u>लाभार्थी निवडीचे निकष :-</u>**

- 5 एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास 3 अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे सौर कृषी पंप व 5 एकरापेक्षा जास्त शेतजमीन धारक शेतकऱ्यास 5 अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देय राहील.
- राज्यातील पारंपारिक ऊर्जेव्दारे विद्युतीकरण न झालेले शेतकरी, विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेले शेतकरी, महावितरण कंपनीकडे विद्युत जोडणीसाठी पैसे भरुनही प्रलंबित असणाऱ्या ग्राहकांपैकी/ शेतकऱ्यांपैकी, ज्यांना नजीकच्या काळात विद्युत जोडणी मिळणे शक्य नाही असे शेतकरी, अतिदुर्गम भागातील शेतकरी, महाराष्ट्र शासनाच्या धडक सिंचन योजने अंतर्गत लाभ घेतलेले शेतकरी यांना सदर योजने अंतर्गत प्राधान्य राहील.
- वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतजमीन धारक शेतकरी सुध्दा या योजनेसाठी पात्र राहतील.

**<u>आर्थिक तरतुदी :-</u>**

- सदर योजनेंतर्गत सौर कृषी पंपासाठी सर्वसाधारण गटाच्या लाभार्थ्यांकडून 10 टक्के व अनुसचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता 5 टक्के लाभार्थी हिस्सा म्हणून भरणे लाभार्थ्यास आवश्यक राहील.
- उर्वरित रक्कमेपैकी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांकरीता लागणारा निधी हा विशेष घटक योजना व आदिवासी उपयोजना मधून उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. अशा प्रकारे सन- 2018-19 साठी सामाजिक न्याय विभागाने एकूण रु. 96.37 कोटी व आदिवासी विकास विभागाने एकूण रु. 76.241 कोटी इतका निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.
- सर्वसाधारण गटाच्या लाभार्थ्यांकरीता राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय अनुदानातून 10 टक्के हिस्सा देण्यात येईल.
- वीजविक्री करामध्ये 10 पैसे वाढ करुन असा वाढीव वीजविक्रीवरील कर या योजनेच्या अंमलबजावणीसाठी वापरण्यात येईल.

## राज्याचे ऊर्जा संवर्धन धोरण.

**<u>शासन निर्णय :-</u> क्र. अपाऊ-2015/प्र.क्र.378/ऊर्जा-7, दि. 22 जून, 2017.**

**<u>उद्देश :-</u>**

- विविध क्षेत्रात पुढील 5 वर्षांमध्ये ऊर्जाबचत/ऊर्जा कार्यक्षमता कार्यक्रम राबवून 1000 मे.वॅ. ऊर्जेची बचत करण्याचे उद्दिष्ट साध्य करणे.
- वीज, ऑईल, गॅस यांच्या बचतीमुळे शासनावरील अनुदानाचा बोजा कमी करणे.
- एलईडी सारख्या तंत्रज्ञानाच्या वापरास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देणे.
- विजेची तांत्रिक हानी कमी करुन वीजदर कमी करणे.

**<u>अंमलबजाणी :-</u>**

**1. उद्योग :-**

उद्योगांना ISO 50001 मानक – ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली प्रमाणपत्र – – अंगीकारण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. महाऊर्जातर्फे उद्योगाला प्रमाणीकरण व प्रशिक्षण यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या 50 टक्के खर्च , जास्तीत जास्त 50 हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येईल.

**2. वाणिज्यिक/शासकीय इमारती :-**

वार्षिक वीजदेयक रु. 5 लाख व त्यापेक्षा जास्त असणाऱ्या कार्यालयीन इमारतीचे/ उद्योगांचे ऊर्जा परीक्षण (Energy Audit) पुढील तीन वर्षांत करुन त्यावर अंमलबजावणी करण्यात येईल.

सदर इमारतींत प्रकाश योजनेसाठी केवळ एलईडीचा वापर केला जाईल.

**3. नगरपालिका/महानगरपालिका :-**

नगरपालिका/महानगरपालिका यांच्या पथदिव्यात व पाणीपुरवठा योजनांमध्ये ऊर्जा बचतीचे प्रकल्प ESCO (Energy Service Company) तत्वावर राबविणे व्यवहार्य व्हावे म्हणून त्यांना कमाल रु. 50 लाखांपर्यंत अर्थसहाय्य महाऊर्जा कडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**4. कृषि क्षेत्र :-**

महावितरण कंपनीतर्फे नवीन कृषि पंप जोडणी देतांना 5 स्टार मानांकित पंप बसविणे बंधनकारक करण्यात येईल.

**5. वीज वितरण कंपन्या :-**

- BEE, नवी दिल्ली यांच्यातर्फे दरवर्षी ऊर्जा व्यवस्थापन व ऊर्जा परिक्षक(Energy Auditor)साठी परीक्षा घेण्यात येते. ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ऊर्जा परिक्षक म्हणून परीक्षा उत्तीर्ण केली असेल व ऊर्जा संवर्धनासाठी त्यांच्या क्षेत्रात विशेष प्रयत्न केले असतील त्यांना प्रोत्साहन म्हणून 1 वेतनवाढ देण्यात यावी.
- दरवर्षी 14 डिसेंबर हा ऊर्जा संवर्धन दिवस व 14 ते 20 डिसेंबर ऊर्जा संवर्धन आठवडा साजरा केला जाईल.
- पर्यावरण विभागाकडे परवानगीसाठी प्राप्त होत असलेल्या प्रकल्पांना परवानगी देत असताना प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या एकूण वीजेच्या वापरापैकी कमीत कमी 30 टक्के पर्यंतची ऊर्जा नवीन व नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांचा वापर करुन साध्य करावी यासाठी त्यांना आवाहन करण्यात यावे.
- ऊर्जा संवर्धन धोरण 2017 ची अंमलबजावणी करतांना सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थांनी महाऊर्जाची तांत्रिक मान्यता घ्यावी.

**<u>आर्थिक तरतुदी :-</u>**

- सदर धोरण राबविण्यासाठी पुढील 5 वर्षांमध्ये सुमारे रु. 807.63 कोटी इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

------*****------

# प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना

**सुरुवात :-**

- 15 ऑगस्ट, 2008.
- ही योजना पुढील योजनांच्या एकत्रिकरणातून अस्तित्वात आली आहे :-

1 पंतप्रधान रोजगार योजना.

2 ग्रामीण रोजगार निर्मिती योजना.

**उद्देश** :-

- सबसिडीयुक्त पतपुरवठा करुन रोजगार निर्मिती करणे.
- ग्रामीण तसेच शहरी भागात स्वयंरोजगाराचे प्रकल्प उभारुन रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- बेरोजगार तरुण, परंपरागत कारागीर या गटांना एकत्र आणून स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे.

**योजनेचे लाभ** :-

- लघुउपक्रमांना सबसिडी दिली जाते. 25 लाखांपर्यंतच्या उत्पादन क्षेत्रातील उपक्रमाला/ प्रकल्पाला, 10 लाखापर्यंतच्या सेवा किंवा व्यवसाय क्षेत्रातील उपक्रमाला/प्रकल्पाला प्रकल्प खर्चाच्या ग्रामीण भागात 25 % व शहरी भागात 15 % सबसिडी दिली जाते. लाभार्थ्याने 10 % भांडवल उभारायचे असते. उर्वरित (म्हणजे ग्रामीण भागात 65 %व शहरी भागात 75 %) भांडवली मदत बँकेमार्फत कर्ज म्हणून पुरविली जाते.
- नव्याने सुरु होणाऱ्या प्रकल्पांनाच योजनेचा लाभ मिळतो. प्रकल्पांना लाभ घेण्यासाठी कुठलीही उत्पन्न मर्यादा नाही.

**लाभार्थी पात्रता** :-

- वय किमान 18 वर्षे असावे.
- लाभार्थी किमान 8 वी उत्तीर्ण असावा.
- स्वयंसहाय्यता गट किंवा धर्मादाय संस्था देखील पात्र आहेत.

**खर्चाचा वाटा** :-

- केंद्र 100 %.

------******---

# सामूहिक प्रोत्साहन योजना-2013

**सुरुवात :-**

- 1964.
- सध्याच्या योजनेचा कालावधी दि. 1.04.2013 ते दि. 31.03.2018 असा आहे.

**उद्देश :-**

- राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्ट्यातील उद्योगांचे विकेंद्रिकरण करण्याकरिता व राज्यातील औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षित होवून त्यामधून रोजगारनिर्मितीला चालना देणे.

**योजनेचे लाभ :-**

**वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योग घटकांना खालीलप्रमाणे सवलती अनुज्ञेय आहेत :-**

- घटकाने भरणा केलेल्या मुल्यवर्धीत करावर आधारीत विहित कालावधीकरीता भांडवली गुंतवणूकीच्या काही प्रमाणात औद्योगिक विकास अनुदान,
- विद्युत शुल्क माफी,
- मुद्रांक शुल्क माफी,
- जकात कर परतावा, (साप्रोयो, 2013 मध्ये वगळण्यात आले)
- विदर्भात स्थापन होणाऱ्या उद्योगांना स्वामित्वधन परतावा, (साप्रोयो, 2013 मध्ये वगळण्यात आले)
- राज्य कामगार विकास योजना व भविष्यनिर्वाह निधीमध्ये भरलेल्या अंशदानापोटी केलेल्या खर्चाच्या 25 टक्के मर्यादेपर्यंत रक्कम, 5 वर्षाकरीता (कमी मानवी निर्देशांक जिल्ह्यात स्थापन होणाऱ्या उद्योगांना) (साप्रोयो, 2013 मध्ये वगळण्यात आले).

**लाभार्थी पात्रता :-**

**विशाल प्रकल्पाच्या निकषामध्ये 2011 मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केली आहे:-**

| अ.क्र. | तालुक्यांचे वर्गीकरण | विशाल प्रकल्पासाठी निकष |
|---|---|---|
| 1 | अ व ब वर्गीकृत तालुके | रु. 750 कोटी गुंतणूक किंवा 1500 व्यक्तींना रोजगार |
| 2 | क वर्गीकृत तालुके | रु. 500 कोटी गुंतणूक किंवा 1000 व्यक्तींना रोजगार |
| 3 | ड व ड+ वर्गीकृत तालुके | रु. 250 कोटी गुंतणूक किंवा 500 व्यक्तींना रोजगार |

| | | |
|---|---|---|
| 4 | विना उद्योग जिल्हे व नक्षल प्रभावीत क्षेत्र | रु. 100 कोटी गुंतणूक किंवा 250 व्यक्तींना रोजगार |

**खर्चाचा वाटा :-**

- **राज्य शासन** 100 %.

------*****------

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (उद्योग उर्जा व कामगार विभाग)

शासन निर्णय क्र. योजना-2019/प्र.क्र.121/उद्योग-7, दिनांक 01 ऑगस्ट,2019

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना राज्यस्तरीय कार्यक्रमांतर्गत योजना म्हणून राबविण्यात येईल.उद्योग संचालनालय, मुंबई हे योजनेचे प्रमुख अंमलबजावणी संस्था म्हणून कार्यवाही करतील.

**योजनेचे उद्दिष्ट** : राज्यातील युवक-युवतींना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी, त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून स्थापित होऊन पुढील पाच वर्षात सुमारे 1 लाख सूक्ष्म, लघु उपक्रम स्थापित होणे व त्यामाध्यमाजून एकूण 10 लाख रोजगार संधी राज्यात उपलब्ध होणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रथम वर्ष 2019-20 साठी एकूण 10 हजार लाभार्थी घटक उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**पात्र घटक (लाभार्थी)** : कायदेशीररित्या पात्र असणारे उत्पादन,सेवा उद्योग, कृषि पूरक व्यवसाय, कृषिवर आधारित उद्योग, ई-वाहतूक व त्यावर आधारीत व्यवसाय, एकाच नाममुद्रेवर (ब्रँड ) आधारित संघटीत साखळी विक्री केंद्रे, फिरते विक्री केंद्र/खाद्यान्न केंद्र इ.घटक कार्यक्रमांतर्गत पात्र असतील.

**पात्रतेसाठी अटी** : 18 ते 45 या वयोगटातील कुठलेही स्थायी उत्पन्न नसलेले स्थानिक रहिवासी. अनुसूचीत जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक यांच्यासाठी 5 वर्षे शिथिल.

उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट

शैक्षणिक पात्रता - रु.10 लाखावरील प्रकल्पासाठी 7 वी उत्तीर्ण, रु.25 लाखावरील प्रकल्पासाठी 10 वी उत्तीर्ण.

एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस कार्यक्रमाचा लाभ घेता येईल. (कुटुंबाची व्याख्या-पती, पत्नी)

अर्जदार व्यक्तीने प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अथवा तत्सम केंद्र अथवा राज्य शासनाच्या अन्य विभागाकडील/महामंडळाकडील अनुदानावर आधारित स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्पाचे स्वरुप** : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषि पूरक

उद्योग/व्यवसायांसाठी रु.10.00 लाख व उत्पादन प्रकारच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रु.50.00 लाख राहील. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत प्रकल्प उभारणीच्या खर्चाचे वर्गीकरण, बँक कर्ज 60% ते 75%, अर्जदाराचे भागभांडवल 5% ते 10%, शासनाचे आर्थिक सहाय्य अनुदान स्वरुपात (मार्जिन मनी) 15% ते 35% असे असेल.

या कार्यक्रमासाठी ग्रामीण भागासाठी (20,000 च्या आतील लोखसंख्या क्षेत्रासाठी) खादी ग्रामोद्योग मंडळ व उर्वरीत भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र हे कार्यक्रम अंमलबजावणी संस्था म्हणून काम पाहतील. या कार्यक्रमाची सुलभ अंमलबजावणी होण्याकरीता कर्ज प्रस्तावापासून अनुदान वितरणापर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गतचे कर्जप्रस्ताव कार्यबल समितीच्या मंजूरीनंतर बँकांकडे (सरकारी व खाजगी शेड्यूल) मंजूरीकरीता पाठविण्यात येतील. बँकांच्या मंजूरीनंतर राज्यशासनाचे अनुदान दावे संबंधित बँक शाखा सादर करेल. या दाव्यांची छाननी होऊन उद्योग संचालनालयामार्फत राज्य शासनाचे अनुदान संबंधित बँक शाखेस नोडल बँकेच्याद्वारे जमा होईल.

**आर्थिक तरतूद** : या कार्यक्रमाद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, कार्यक्रम कालावधीत (पुढील 5 वर्षात) एकूण 1 लाख घटक स्थापित करण्याचे व सुरुवातीचे वर्ष 2019-20 साठी एकूण 10 हजार घटक (लाभार्थी) उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टांच्या 30% उद्दिष्ट महिला प्रवर्गासाठी व 20% उद्दिष्ट अनुसूचीत जाती/जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखून ठेवले आहे. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांचेकडून उद्दिष्टाच्या प्रमाणात तरतूद उद्योग विभागास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उर्वरित तरतूद शासनाच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

********

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ

**मंडळाची स्थापना :-**

- दि. 01 मे, 2011 रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या त्रिपक्षीय मंडळाची स्थापना झालेली आहे.

**उपकर :-**

- मंडळाकडे उपकर, कामगारांची नोंदणी फी व कामगारांची वार्षिक वर्गणी या माध्यमातून निधी जमा होतो. उपकर अधिनियमाच्या कलम 3 (1) नुसार केंद्र शासनाने अधिसूचनेव्दारे एकूण प्रकल्प खर्चाच्या 1 % (जमिनीचे मूल्य वगळता) इतकी रक्कम उपकर निश्चित केला आहे.
- माहे एप्रिल 2018 पर्यंत मंडळाकडे रु. 6442 कोटी एवढा उपकर जमा झाला आहे.

**बांधकाम कामगारांची नोंदणी व पात्रतेचे निकष :-**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम 1996 च्या कलम 12 (01) अन्वये 18 ते 60 वर्षे वयोगटा दरम्यान असलेल्या व मागील वर्षभरात कमीत कमी 90 दिवस काम केलेल्या बांधकाम कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे:-

I. नोंदणी फी :- रु. 25/- व मासिक वर्गणी रु. 01/- प्रमाणे (05 वर्षासाठी)

II. वयाचा पुरावा

III. 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र

IV. रहिवासी पुरावा

V. ओळखपत्र पुरावा

VI. पासपोर्ट आकाराचे 3 फोटो.

**मंडळामार्फत एकूण 29 सरकारी योजनांचा लाभ नोंदीत बांधकाम कामगारांना दिला जातो. त्यापैकी काही योजना पुढीलप्रमाणे आहेत.**

- कामगाराच्या शाळेतील किमान 75% किंवा अधिक उपस्थिती असणाऱ्या दोन पाल्यांना इयत्ता 1 ली ते 7 वी साठी प्रतिवर्षी रु. 2,500/- व इयत्ता 8 वी ते 10 वी साठी प्रतिवर्षी रु. 5000/ एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.
- कामगाराच्या दोन पाल्यांना इयत्ता 10 वी व 12 वी मध्ये किमान 50 % किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. 10,000/- एवढे प्रोत्साहनात्मक शैक्षणिक आर्थिक सहाय्य.
- नोंदित लाभार्थी कामगाराच्या 2 पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेश घेण्यासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इ. साठी प्रती शैक्षणिक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रु. 1,00,000/- व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रु. 60,000/- इतके शैक्षणिक सहाय्य.
- नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनमान्य पदविकेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रति शैक्षणिक वर्षी रु. 20.000/- आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्यास प्रति शैक्षणिक वर्षी रु. 25,000/- एवढे आर्थिक सहाय्य.
- नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जिवीत अपत्यांपर्यंत नेसर्गिक प्रसुतीसाठी रु. 15,000/- व शस्त्रक्रियेव्दारे प्रसुतीसाठी रु. 20,000/- एवढे आर्थिक सहाय्य.
- लाभार्थी कामगार व त्याच्या कुटूंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु. 1,00,000/- एवढे वैद्यकीय सहाय्य. एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटूंबातील दोन सदस्यांपर्यंत मर्यादित तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.
- नोंदीत लाभार्थी कामगार अथवा त्याच्या पती/पत्नीने एका मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे 18वर्षांपर्यंत रु. 1,00,000/- मुदत बंद ठेव.
- नोंदीत लाभार्थी कामगारास 75 टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. 2,00.000/- एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपूर्ती अथवा मंडळामार्फत रु. 2,00,000/- आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एक लाभ अनुज्ञेय राहील.
- नोदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. 5,00,000/- एवढे आर्थिक सहाय्य.

- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु. 2,00,000/- आर्थिक सहाय्य.
- नोंदीत बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रु. 6,00,000/- पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रु. 2,00,000/- मंडळामार्फत देणेबाबत.
- नोंदीत लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराचे विधूर पतीस प्रतीवर्षी रु. 24,000/- एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त 5 वर्षांसाठी)

------*****------

# ग्राम विकास विभाग

- प्रधानमंत्री आवास योजना.
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजना.
- बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना.

# प्रधानमंत्री आवास योजना

**सुरुवात :-**

- 1 एप्रिल, 2016.
- ग्रामीण गरिबांची घरे बांधण्यासाठी असणाऱ्या इंदिरा आवास योजनेचे नाव बदलून प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली.

**उद्‌देश :-**

- दारिद्रय रेषेखालील लोकांना, विशेषत:अनुसूचित जाती व जमातीतील लोकांना व वेठबिगारीतून मुक्त झालेल्या लोकांना घर बांधण्यासाठी किंवा कच्ची घरे अद्‌ययावत करण्यासाठी अनुदान देण्याच्या उद्‌देशाने ही योजना सुरू करण्यात आली .

**लाभार्थी :-**

- एकही खोली नसलेले, एक किंवा जास्तीत जास्त दोन खोल्यामध्ये राहणारे व कच्च्या भिंती आणि कच्चे छत असणारे कुटूंब.
- वंचित गट.
- या योजनेच्या लाभार्थी निवडीसाठी आर्थिक, सामाजिक व जातीय जणगणना 2011 चा आधार घेतला आहे.

**योजनेचे स्वरुप :-**

<table>
<tr><th>घटक</th><th colspan="2">लाभ</th></tr>
<tr><td colspan="2">घराचा आकार</td><td>25 मीटर वर्ग</td></tr>
<tr><td rowspan="2">घरबांधणीसाठी आर्थिक मदत</td><td>सपाट प्रदेश</td><td>1.20 लाख</td></tr>
<tr><td>डोंगराळ प्रदेश</td><td>1.30 लाख</td></tr>
<tr><td colspan="2">मध्यावधी लक्ष्य</td><td>सन 2019 पर्यंत 1 कोटी घरे बांधणे</td></tr>
<tr><td colspan="2">दिर्घावधी लक्ष्य</td><td>सन 2022 पर्यंत 4 कोटी घरे बांधणे</td></tr>
</table>

**खर्चाचा वाटा :-**

- केंद्र : राज्य - 60 : 40.

------*****------

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

**उद्देश** :-

- राज्यातील न जोडलेल्या वाड्या वस्त्या जोडण्यासाठी नवीन जोडणी व प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत अंतर्भूत न झालेल्या, अस्तित्वातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करणे.

**लाभार्थी** :-

- एकही खोली नसलेले, एक किंवा जास्तीत जास्त दोन खोल्यामध्ये राहणारे व कच्च्या भिंती आणि कच्चे छत असणारे कुटूंब.
- वंचित गट.
- या योजनेच्या लाभार्थी निवडीसाठी आर्थिक, सामाजिक व जातीय जणगणना 2011 चा आधार घेतला आहे.

**योजनेचे स्वरुप** :-

- या योजनेअंतर्गत नवीन जोडणी 730 कि.मी. व रस्ता दर्जोन्नतीसाठी 30,000 कि.मी लांबीवर काम करण्यात येणार आहे.
- नवीन जोडणी अंतर्गत दरवर्षी 146 कि.मी तर दर्जोन्नती अंतर्गत पहिल्या टप्प्यात 2,000 कि.मी च्या लांबीवर काम करण्यात येईल व पुढील 4 वर्षात उर्वरीत लांबीवर टप्प्याटप्प्यात काम करण्यात येईल.

**निकष** :-

- रस्ता दर्जोन्नती करताना कोअर नेटवर्क मध्ये समाविष्ट असलेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांचा दर्जोन्नतीसाठी विचार करण्यात येईल.
- 500 पेक्षा अधिक लोकसंख्येचा प्रथम विचार करण्यात येईल. सन 2011 च्या जणगणनेनुसार सर्वसाधरण क्षेत्रात 500 पेक्षा जास्त व आदिवासी क्षेत्रात 250 पेक्षा जास्त लोकसंख्येच्या वाड्या वस्त्या उतरत्या क्रमाने जोडण्यात येतील.
- मात्र यामध्येही नदीघाट किंवा वाळू उत्खननामध्ये ज्या रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे त्यांचा प्राथम्याने विचार करण्यात येईल.
- ज्या ग्रामीण रस्त्यांवर जास्त वर्दळ आहे अशा रस्त्यांचा प्राधान्याने विचार केला जाईल.
- ज्या ग्रामपंचायती 14 व्या वित्त आयोगाच्या निधीतून 15 % निधी स्वेच्छेने देतील त्यांचा प्राथम्याने विचार करण्यात येईल.

वरील नमूद मुद्यांना गुण देण्यात येतील व त्या गुणमुल्यांकना आधारे रस्त्यांची निवड करण्यात येईल. रस्त्यांची निवड करण्यासाठी पालक मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती नियुक्त करण्यात येईल.

**निधी :-**

- एकूण साधारणत: 3,216 कोटी इतका निधी दरवर्षी आवश्यक आहे.

**अंमलबजावणी :-**

- ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत ही योजना राबविण्यात येईल.

------*****------

# बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचयात बांधणी योजना

**बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना**

**सुरुवात :-**

- 23 जानेवारी, 2018.

**उद्देश :-**

- राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना कार्यालयाची स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे.

**निकष :-**

- 1000 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना शासनाच्या प्रस्तुत योजनेतून कार्यालय बांधावयाचे झाल्यास त्याचे मूल्य रु. 12.00 लाख इतके निर्धारित करण्यात आले असून त्यापैकी 90 % प्रमाणे रु. 10.80 लाख इतकी रक्कम शासनामार्फत व उर्वरित 10 % प्रमाणे रु. 1.20 लाख इतकी रक्कम ग्रामपंचायतीने स्वनिधीतून खर्च करावा.
- 1000 ते 2000 पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना कार्यालय बांधण्यासाठी 18.00 लाख इतके मूल्य निर्धारित केले असून त्यापैकी 85 % प्रमाणे रु. 15.30 लाख इतकी रक्कम शासनामार्फत व उर्वरित 15 % प्रमाणे रु. 2.70 लाख इतकी रक्कम ग्रामपंचायतीने स्वनिधीतून खर्च करावा.
- 2000 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गटातील ग्रामपंचायतींना कार्यालय बांधण्यासाठी 18.00 लाख इतके मूल्य निर्धारित केले असून त्यापैकी 80 % प्रमाणे रु. 14.40 लाख इतकी रक्कम शासनामार्फत व उर्वरित 20 % प्रमाणे

रु. 3.60 लाख अथवा जी वाढीव लागेल ती रक्कम ग्रामपंचायतीने स्वनिधीतून खर्च करावी.

- एखाद्या ग्रामपंचयात क्षेत्रामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर करण्यास वाव असल्यास संबंधित ग्रामपंचायतीने त्याबाबत ग्रामसेभेचा ठराव केल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्या समितीने संबधित ग्रामपंचायतीस त्याप्रमाणे सार्वजनिक-खाजगी- भागीदारी तत्वावर ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम करण्यास परवानगी द्यावी.

------*****------

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा

**सुरुवात :-**

- 5 जुलै, 2013.
- 1 नोव्हेंबर, 2016 पासून हा कायदा संपूर्ण देशभरात लागू झाला आहे.

**उद्देश :-**

- 6 ते 72 महिन्यांच्या बालकांना अंगणवाडीमध्ये मोफत पुरक पोषण आहार.
- गरोदर व स्तनदा मातांना अंगणवाडीत पूरक पोषण आहार.
- 6 ते 14 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना शाळेत पूरक पोषण आहार.
- इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजने अंतर्गत गरोदर व स्तनदा मातांना दिले जाणारे रु. 6000 चे अनुदान वाटप कायदेशीर करण्यात आले.

**पात्र कुटुंबाना मिळणारे लाभ :-**

| घटक | अग्रक्रम कुटूंब | अंत्योदय कुटूंब |
|---|---|---|
| तांदूळ (कि.ग्रॅ) | 3 | 3 |
| गहू (कि.ग्रॅ) | 2 | 2 |
| भरड धान्य (कि.ग्रॅ) | 1 | 1 |
| एकूण अन्नधान्य | 5 कि.ग्रॅ प्रती व्यक्ती प्रती माह | 35 कि.ग्रॅ प्रती कुटुंब प्रती माह |

**योजनेचे स्वरुप :-**

- या कायद्याने अग्रक्रम कुटुंब आणि अंत्योदय अन्न योजनेचे लाभार्थी असे लाभार्थ्यांचे दोन गट केले.
- देशातील 67 % कुटुंबे (ग्रामीण 75% व शहरी 50%) अग्रक्रम कुटुंबे म्हणून निवडण्यात आली आहेत. ही कुटुंबे निवडण्याची जबाबदारी राज्यांवर आहे.
- वर नमूद दराने अन्नधान्य न मिळाल्यास अन्नधान्य भत्ता देण्याची जबाबदारी केंद्रावर आहे.
- युध्द, दुष्काळ,पूर, चक्रीवादळ, भूकंप या परिस्थितीत कायद्यात उल्लेखलेली जबाबदारी शिथील करण्यात येईल.
- एखाद्या अधिकाऱ्याने या कायद्याची अंमजबजावणी करण्यात कसूर केल्यास 5000 रु. पर्यंतचा दंड.
- राज्य अन्न आयोगाची स्थापना करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**खर्चाचा वाटा :-**

- केंद्र 100 %.

------******------

# नियोजन विभाग

- मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.

## मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम (नियोजन विभाग)

शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2014/प्र.क्र.400/2014/12, दि.29/05/2015

**योजनेचा उद्देश** : राज्यातील विकास प्रक्रिया,त्यातील टप्पे जाणून, समजून घेत असताना शासकीय यंत्रणेतील कामकाज, त्यातील घटकांचा ताळमेळ, आणि निर्णय प्रक्रियेचा अनुभव तरुणांना मिळावा, त्यातून समर्पित वृत्तीने समाजसेवा करण्यासाठी प्रामाणिक, ध्येयवादी, सुजाण नागरीक तयार व्हावेत यासाठी राज्यातील तरुणांसाठी हा कार्यक्रम सुरु.

**लाभार्थी** : राज्यातील 21 ते 25 या वयोगटातील तरुण.

**योजनेचे स्वरुप** : या कार्यक्रमाकरीता फेलोंची संख्या 20 निश्चित करण्यात आलेली असून, फेलोंच्या एकूण संख्येच्या 1/3 संख्या महिला फेलोंची असणार आहे. फेलोंचा दर्जा शासकीय सेवेतील गट अ च्या अधिकाऱ्याच्या समकक्ष ठरविण्यात आला आहे.

- फेलोंच्या निवडीबाबतची सर्व कार्यवाही नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत करण्यात येते.
- 20 फेलोंची निवड 11 महिन्यांकरीता करण्यात येते. असाधारण कामगिरी करणाऱ्या फेलोचा कालावधी 2 वर्षांपर्यंत वाढविता येतो.
- निवड झालेल्या फेलोंना दरमहा रु.35,000/- इतकी छात्रवृत्ती व त्याव्यतिरिक्त रु.5000/- एवढा प्रवासखर्च देण्यात येतो.
- निवड झालेल्या फेलोंना यशदा, पुणे मार्फत 15 दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते.
- या कार्यक्रमांतर्गत अवर्षणमुक्त महाराष्ट्र/अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प, विशेष पायाभूत सुविधा, रस्त्यांचे जाळे, पर्यटन विकास, ई-गव्हर्नन्स, आदिवासी उपयोजना/विशेष घटक योजनांची परिणामकारक अंमलबजावणी, दळणवळण यंत्रणा, पर्यावरण/carbon credit/वातावणीय बदल आणि सार्वजनिक व खाजगी भागीदारीचे प्रकल्प, राज्यातील वनक्षेत्र वाढविणे, नापिक जमीन वृक्ष लागवडीखाली आणणे, पर्यायी वनीकरणाचा मोठा कार्यक्रम राबविणे आणि वनहक्क कायदा 2006, किफायतशीर जलमार्ग विकसीत करणे, बंदर विकास पर्यटन विकासांतर्गत सागरी अभ्यास (वातावरणीय बदल व पर्यावरण या अंतर्गत), राज्य शासनाच्या सहभागातून राज्यातील रेल्वे

प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी इ.प्रकल्पांतर्गत किंवा शासन निश्चित करेल त्या क्षेत्रात फेलोंनी काम करणे आवश्यक. निवड होणाऱ्या फेलोंना या क्षेत्रांपैकी ज्या क्षेत्रात काम करावयाची इच्छा आहे अशा किमान 3 क्षेत्रांचा पसंतीक्रम उमेदवारांकडून घेऊन हा पसंतीक्रम विचारात घेऊन उमेदवारांना नियुक्ती देण्यात येते.

**********

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

**सुरुवात** :-

- 2 फेब्रुवारी, 2006
- ही योजना पुढील योजनांच्या एकत्रिकरणातून अस्तित्वात आली :-
  - संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना.
  - राष्ट्रीय कामाच्या बदल्यात अन्न योजना.

**उद्देश** :-

- ग्रामीण अकुशल कामगारांना वर्षभरातून किमान 100 दिवसांच्या मजुरी रोजगाराची हमी देणे.
- गरीबांच्या स्त्रोतांची उपलब्धता वाढवून राहणीमानात सुधारणा घडवणे.
- पंचायतराज संस्थांना बळकटी देणे.

**लक्ष्ये** :-

- उत्पादक व टिकावू मालमत्ता उभारणे.
- नैसर्गिक स्त्रोतांना पुर्नरुज्जीवन मिळवून देणे.
- सामाजिकदृष्ट्या व्यावर्तित गटांचे सबलीकरण करणे.

**स्वरुप** :-

- कामासाठी नोंदणी केल्यानंतर 15 दिवसांच्या आत व 5 कि.मी. च्या आत काम दिले जाते.
- कामाच्या ठिकाणी पाळणागृह, पेयजल, प्रथमोपचार यांची सोय केलेली असते.
- 5 कि.मी अंतरापलीकडील कामासाठी 10 % जास्त मजुरी मिळते.
- नोंदणी नंतर 15 दिवसांच्या आत काम न मिळाल्यास बेरोजगार भत्ता दिला जातो.

- 1976 च्या समान वेतन कायद्यानुसार पुरुष व स्त्रियांना सारखीच मजुरी दिली जाते.
- 1948 च्या किमान मजुरी कायद्यानुसार मजुरीचा दर ठरविला जातो.
- मजुरी व्यतिरिक्त या योजनेच्या लाभार्थ्यांना जनश्री विमा योजना व राष्ट्रीय स्वाथ्य विमा योजनांचा लाभ मिळतो.

**योजनेतील ग्रामसभेचे आणि ग्रामपंचातीचे महत्त्व** :-

- **ग्रामसभा** -

योजनेअंतर्गत राबवावयाच्या कामाचे निर्धारण, परीक्षण व सामाजिक लेखा परीक्षण ग्रामसभा करते.

- **ग्रामपंचायत** -

ग्रामपंचायत नोंदणी अर्ज स्विकारते, अर्जाची छाननी करते, कुटुंबाची नोंद करते, जॉब कार्ड देते, कामाचे अर्ज स्विकारते, नोंदणी करणाऱ्याला 15 दिवसांच्या आत रोजगार पुरविते, कामाची व मजुरीची नोंद ठेवते, लेखे ठेवते, कायद्यांच्या व योजनेच्या माहितीचा प्रसार करते.

कामाच्या मूल्यापैकी 50 % निर्धारण ग्रामपंचायत करते.

**खर्च** :-

- केंद्र : राज्य यांच्या खर्चाचा वाटा मजुरीसाठी 100 : 0 असा आहे तर साहित्यसाधने व बेरोजगारी भत्त्यासाठी अनुक्रम 75 : 25 व 0 : 100 असा आहे.

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

- मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे.
- भारत सरकार शिष्यवृत्ती योजना.
- अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना.
- सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.
- राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार.
- मागेल त्याला व्यावसायिक प्रशिक्षण.
- अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.
- रमाई आवास (घरकुल) योजना.
- आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजना.
- पद्यश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना.
- अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थाना अर्थसहाय्याची योजना
- वृध्दाश्रम योजना.
- तांडा/वस्ती सुधार योजना
- विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
- शालांत परीक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य (बीजभांडवल)
- [illegible]

# मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे

**शासन निर्णय क्र. :- खाबाप्र-2012/प्र.क्र.116/शिक्षण-2, दि. 02 जुलै, 2012.**

**उद्दिष्टे :-**

- मागासवर्गीय मुला-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी. त्यांना उच्च शिक्षण घेता यावे. त्याचप्रमाणे आर्थिदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात आलेली आहेत. सदरच्या योजना सन 1922 पासून कार्यान्वित आहे. सध्या महाराष्ट्रात विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर 381 वसतिगृहे (मुलांची 218+मुलींची 163) मंजूर असून त्यांपैकी 377 सुरु असून त्यामध्ये 35530 विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

**लाभाचे स्वरुप :-**

- मोफत निवास व भोजन, अंथरुण-पांघरुण, ग्रंथालयीन सुविधा.
- शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश.
- क्रमिक पाठ्य पुस्तके, वह्या, स्टेशनरी इ.
- वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्राईंग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश कॅनव्हास इत्यादी.
- वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्याच्या दैनदिन खर्चासाठी निर्वाहभत्ता.

**निर्वाहभत्ता :-**

- विभागीय पातळीवर - दरमहा रु. 800/-
- जिल्हा पातळीवर -दरमहा रु. 600/-
- तालुका पातळीवर -दरमहा रु. 500/-

**अटी व शर्ती :-**

- गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 2,00,000/- पेक्षा जास्त नसावे.
- इयत्ता 8 वी व त्यापुढे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येईल.
- अर्ज करावयाची मुदत शालेय विद्यार्थ्यांसाठी 15 मे पूर्वी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 30 जून पर्यंत किंवा निकाल लागल्यापासून 15 दिवसांचे आत.

- सन 2014-15 पासून शासन स्तरावरुन शासकीय वसतिगृहात जागेपैकी 10 टक्के प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या जागा ह्या खास बाब म्हणून अटी व शर्तीस अनुसरुन व गुणवत्तेनुसार भरण्यात येतात आणि 5 टक्के खास बाब म्हणून अनाथ तसेच मांग, भंगी, मेहतर या जातीतील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येते.

**संपर्क**:-

- संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कलयाण.
- संबंधित विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
- संबंधित गृहपाल, मागासवर्गीय मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृह.

------*****------

# भारत सरकार शिष्यवृत्ती योजना

**भारत सरकार शिष्यवृत्ती योजना**

**शासन निर्णय क्र. :- इबीसी-2011/प्र.क्र.4/मावक-2, दि. 2 ऑगस्ट,2011.**

**उद्‌दिष्टे :-**

- मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना महाविद्‌यालयीन / उच्च शिक्षण घेता यावे.
- विद्‌यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

**लाभाचे स्वरुप :-**

- विद्‌यार्थ्यांस निर्वाहभत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क प्रदान
- दरमहा रु. 230 ते रु. 450 या दराने निर्वाहभत्ता.
- वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्‌यार्थ्यांसाठी दरमहा रु. 380 ते रु. 1200 निर्वाहभत्ता.

**अटी व शर्ती :-**

- विद्‌यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील असावा.
- विद्‌यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 2 लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.
- विद्‌यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा.
- विद्‌यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**संपर्क :-**

- संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
- संबंधित महाविद्‌यालयाचे प्राचार्य.

------*****------

# अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणसाठी शिष्यवृत्ती योजना

**शासन निर्णय क्र. :- इबीसी-2015/प्र.क्र.69/शिक्षण-1, दि. 16 जून,2015.**

**उद्दिष्टे :-**

- अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणसाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पी.एच.डी. अभ्यासक्रमाकरीता प्रवेश मिळाला आहे अशा 50 विद्यार्थ्यांना (पी.एच.डी.-24 व पदव्युत्तर - 26 ) परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

**लाभाचे स्वरुप :-**

- विद्यापीठाने प्रमाणित केलेली शिक्षण फी ची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो.
- विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरीका व इतर राष्ट्रांसाठी 14000 यु.एस.ए. डॉलर तर यु. के. साठी 9000 पौंड इतका अदा करण्यात येतो.
- विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी यु.एस.ए. व इतर देशांसाठी 1375 यु.एस.ए. तर यु.के. साठी 1000 पौंड इतके अर्थसहाय्य देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे.
- विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो.

**अटी व शर्ती :-**

- विद्यार्थी अनुसूचित जाती/नवबौध्द घटकातील असावा.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- विद्यार्थ्यांचे वय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता 25 वर्षांपेक्षा जास्त नसावे व पी.एच.डी. अभ्यासक्रमाकरिता 40 वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थ्याच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 6 लाखापेक्षा जास्त नसावे
- विद्यार्थ्याने QS rank 300 मधील विद्यापीठामध्ये प्रवेश घेतलेला असावा.

**संपर्क :-**

- जाहिराती द्वारे दरवर्षी मे महिन्यात अर्ज मागविण्यात येतात.

- आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

------*****------

# सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

**शासन निर्णय क्र. :- इबीसी-2003/प्र.क्र.417/मावक-2, दि. 31 मार्च,2005.**

**उद्दिष्टे :-**

- इयत्ता 5 वी ते 7 वी व इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय (अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र) मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने अनुक्रमे सन 1996 व 2003 पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे.

**शिष्यवृत्तीचे स्वरुप :-**

| इयत्ता | शिष्यवृत्ती दर | कालावधी |
|---|---|---|
| 5 वी ते 7 वी | रु. 60/- दरमहा | 10 महिने |
| 8 वी ते 10 वी | रु. 100/- दरमहा | 10 महिने |

**अटी व शर्ती :-**

- उत्पन्न व गुणांची अट नाही.
- अर्ज करण्याची आवश्यकता नाही. वर्षातून तीन वेळा म्हणजे 26 जून, 22 सप्टेंबर आणि 3 जानेवारी या तारखांना शिष्यवृत्ती देण्यांत येते.

**संपर्क :-**

- संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
- संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

------*****------

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार.

**शासन निर्णय क्र. :- इबीसी-2003/प्र.क्र.115/मावक-2, दि. 21 जुलै, 2003.**

**उद्‌दिष्टे :-**

- इयत्ता 10 वी व 12 वी च्या परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र च्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान केले जातात.

**पुरस्काराचे स्वरुप :-**

| अ.क्र. | संवर्ग | पुरस्काराचे स्वरुप |
|---|---|---|
| 1. | सर्वसाधारण विद्‌यार्थ्यांमधून राज्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र च्या विद्‌यार्थ्यांस (म्हणजे संपूर्ण राज्यातून पहिला आलेला विद्‌यार्थी अनुसूचित जाती , विजाभज व विमाप्र या प्रवर्गाचा असेल तर) | रु. 2.50 लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| 2. | सर्वसाधारण विद्‌यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्‌यार्थ्यास | रु. 1.00 लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| 3. | सर्वसाधारण विद्‌यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्‌यार्थ्यास | रु. 50 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| 4. | सर्वसाधारण विद्‌यार्थ्यांमधून जिल्हयात प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्‌यार्थ्यास | रु. 25 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| 5. | सर्वसाधारण विद्‌यार्थ्यांमधून तालुक्यामध्ये प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्‌यार्थ्यास | रु. 10 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| 6. | सर्वसाधारण विद्‌यार्थ्यांमधून प्रत्येक माध्यमिक विद्‌यालयात व कनिष्ठ महाविद्‌यालयामधून इ. 10 वी व 12 वी परीक्षेत प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्‌यार्थ्यास | रु. 5 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

**संपर्क :-**

- संबंधित जिल्हयाचे सहायक आयुक्त, समाज कल्याण

------******------

# मागेल त्याला व्यावसायिक प्रशिक्षण

**शासन निर्णय क्र. :- इबीसी-2003/प्र.क्र.188/मावक-2, दि. 4 जुलै, 2003.**

**उद्दिष्टे :-**

- अल्पशिक्षित अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेरोजगार उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी.

**लाभाचे स्वरुप :-**

- औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये मोफत प्रशिक्षण.
- प्रशिक्षणार्थ्यांस टूल किट आणि रु. 100 दरमहा विद्यावेतन देण्यात येते.
- प्रशिक्षण कालावधी 1 आठवडा ते 2 महिने
- प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यामागे रु. 2500/- इतका खर्च शा.नि. मध्ये नमूद आहे.

**अटी व शर्ती :-**

- उमेदवार अनुसूचित जाती/नवबौध्द घटकांतील असावी/असावा.
- किमान 4 थी पास असावी/असावा.

**संपर्क :-**

- संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

------*****------

# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.

**शासन निर्णय क्र. :- दवसु-2015/प्र.क्र.59/अजाक-1, दि. 27 मे, 2015.**

**उद्दिष्टे :-**

- अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक दलित वस्त्यांमध्ये नळ पाणी पुरवठा, गटारे, स्वच्छता विषयक सोयी, जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, समाज मंदीर इत्यादी पायाभूत व्यवस्था करुन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ही योजना आहे.

**लाभाचे स्वरुप :-**

- शासन निर्णय, दिनांक 5डिसेंबर, 2011 अन्वये लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्येक अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे अनुदान देण्यात येते.

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान (रु.) |
|---|---|---|
| 1. | 10 ते 25 | 2 लाख |
| 2. | 26 ते 50 | 5 लाख |
| 3. | 51 ते 100 | 8 लाख |
| 4. | 101 ते 150 | 12 लाख |
| 5. | 151 ते 300 | 15 लाख |
| 6. | 301 च्या पुढे | 20 लाख |

- या योजने अंतर्गत घ्यावयाच्या कामांचा सन 2013 पासून पुढील पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार करण्यात आलेला आहे. तो संबंधित जिल्हयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. महाराष्ट्रात 37604 दलित वस्त्या आहेत.
- बृहत आराखड्यामध्ये नमूद असलेल्या कामाचा प्रस्ताव योग्य त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायतीने तयार करुन गट विकास अधिकारी यांचेमार्फत जिल्हापरिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे सादर करणे अपेक्षित आहे.

**संपर्क :-**

- जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

------*****------

# रमाई आवास (घरकुल) योजना.

**शासन निर्णय क्र.** :- **विसआ-2015/प्र.क्र.85/बांधकामे**, **दि.** 15 **मार्च**, 2016.

**उद्‌दिष्टे** :-

- अनुसूचित जाती व नवबौध्द कुटूंबांचे राहणीमान उंचवावे वत्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या जागेवर 269 चौरस फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी रमाई आवास घरकुल योजना सन 2009-10 पासून सुरु आहे. सदर योजनेची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, शहरी विभागासाठी नगरपरिषद/नगरपालिका व महानगर पालिका या स्थानिक यंत्रणेमार्फत करण्यात येते.

**लाभाचे स्वरुप** :-

- घराच्या बांधकामासाठी क्षेत्र निहाय कमाल खर्चाची मर्यादा ग्रामीण क्षेत्र रु. 1,00,000/- व नगरपालिका/नगरपरिषद क्षेत्र रु. 1.50 लाख व महानगरपालिका व मुंबई विकास प्राधिकरण क्षेत्र रु. 2 लाख इतकी आहे.
- लाभार्थी हिस्सा ग्रामीण क्षेत्र निरंक, नगरपालिका क्षेत्र 7.5 टक्के, महानगरपालिका क्षेत्र 10 क्षेत्र इतका आवश्यक आहे.
- ग्रामीण भागातील कुटूंबांला लाभार्थी हिस्सा भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.
- शहरी विभागात दारिद्र्यरेषेवरील पात्र लाभार्थ्यांना सुध्दा घरकुल योजनेचा लाभ देण्यात येत आहे. सदर लाभ देण्यासाठी लाभार्थ्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा व लाभार्थी स्वहिस्सा अनुदानाच्या स्वरुपात खालील प्रमाणे :-

| **क्षेत्र** | **उत्पन्न मर्यादा** | **लाभार्थी हिस्सा** |
|---|---|---|
| नगरपालिका/नगरपरिषद | रु. 1.50 लाख | 7.5 टक्के |
| महानगरपालिका | रु. 2.00 लाख | 10 टक्के |

- ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि. 30.12.2015 अन्वये पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरू करण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत रमाई आवास योजनेतील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील घरकुलासाठी पात्र असणाऱ्या परंतू जागा उपलब्ध नसणाऱ्या लाभार्थ्यांसाठी जागा खरेदी करिता रु. 50,000/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते.

- अनुसूचित जातींमधील जे अपंग लाभार्थी दारिद्रय रेषेखाली नाहीत. ज्याचे अपंगत्व 40 टक्के पेक्षा अधिक आहे व वार्षिक उत्पन्न एक लाखापर्यंत आहे, अशा अपंग लाभार्थ्यांना ते योजनेच्या उर्वरित अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.

**अटी व शर्ती :-**

- लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य 15 वर्षे असणे आवश्यक.
- अर्जदाराच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्र रु. 1,00,000/-, नगरपरिषद/नगरपालिका क्षेत्र रु. 1.50 लाख, महानगरपालिका क्षेत्र व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्र रु. 2.00 लाख इतकी आहे.
- सदर योजनेचा लाभ कुटूंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल. लाभार्थ्यांने शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**संपर्क :-**

- संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण/जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद/आयुक्त महानगरपालिका (संबंधित).

------*****------

## आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजना.

**शासन निर्णय क्र. :- आंजावि-2007/प्र.क्र.191/मावक-2, दि. 1 फेब्रुवारी, 2010.**

**उद्दिष्टे :-**

- राज्यातील जातीयता भेदाभेद कमी करण्यासाठी जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी आंतरजातीय विवाहित जोडप्यांना अर्थसहाय्य देणे.

**लाभाचे स्वरुप :-**

- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांपैकी एक व्यक्ती आणि सवर्ण हिंदू, जैन, लिंगायत, बौध्द, शीख यापैकी दुसरी व्यक्ती अशांनी विवाह केल्यास तसेच मागासवर्गातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विवाहित जोडप्यांना या योजने अंतर्गत रु. 50000/-अर्थसहाय्य देण्यात येते, सदर धनाकर्ष पती पत्नीच्या संयुक्त नावाने प्रदान करण्यात येतो.

**संपर्क :-**

- संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/ समाज कल्याण अधिकारी वर्ग-2 बृहन्मुंबई (मुंबई क्षेत्रासाठी)

------*****------

# पद्‌मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.

**शासन निर्णय क्र. :- जमीन-2012/प्र.क्र.3/अजाक-1, दि. 13 मार्च,2012.**

**उद्‌दिष्टे :-**

- दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन अनुसूचित जाती व नवबौध्द शेतमजूर कुटुंबाच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे, त्यांच्या राहणीमानात सुधारणा व्हावी व मजुरीवर असलेले त्यांचे अवलंबित्व कमी व्हावे या उद्‌देशाने ही योजना राबविण्यात येते.

**अटी व शर्ती :-**

- लाभार्थी हा अनुसूचित जाती/नवबौध्द घटकातील असावा.
- लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील व भूमिहीन शेतमजूर असावा.
- लाभार्थ्यांची वयोमर्यादा 18 ते 60 वर्षांपर्यंत असावी. विधवा आणि परित्यक्ता यांना प्राधान्य.

**लाभाचे स्वरुप :-**

- लाभार्थ्यास 4 एकर कोरडवाहू किंवा 2 एकर बागायती जमीन देण्यात येते.
- जमीन खरेदीसाठी शासनाकडून 50 टक्के अनुदान व 50 टक्के बिनव्याजी कर्ज देण्यात येते.
- कर्ज फेडीची मुदत 10 वर्षे असून कर्जाची परतफेड कर्ज मंजुरीनंतर 2 वर्षांनी सुरु करण्यात येते.

**शासन निर्णय, दिनांक 13 मार्च 2012 अन्वये जिल्हास्तरीय समितीस, जमीन खरेदी करण्यासाठी, पुढील प्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.**

- जिल्हाधिकारी यांनी प्रचलित रेडीरेकनरच्या किंमतीप्रमाणे जमीन विकत घेण्याचा प्रयत्न करावा. रेडीरेकनरच्या किंमतीप्रमाणे जमीन उपलब्ध होत नसल्यास जमिनीच्या मुल्याबाबत संबंधित जमीन मालकाशी वाटाघाटी कराव्यात. त्यानुसार रेडीरकनरची किंमत अधिक 20 टक्के पर्यंत प्रथम रक्कम वाढवावी. तरीसुध्दा जमीन विकत मिळत नसल्यास ही 20 टक्के रक्कम 20 टक्के च्या पटीत 100 टक्के पर्यंत म्हणजेच रेडीरेकनरच्या दुप्पट किंमती पर्यंत वाढविण्यात यावी. तथापि, ही रक्कम प्रती एकरी रु. 3.00 लाख इतक्या कमाल मर्यादेत असावी.

- लाभार्थीने स्वत: जमिनीचा शेध घेतल्यास व योजनेच्या इतर सर्व अटी व शर्ती पूर्ण करीत असल्यास त्यास ती जमीन प्राधान्याने देण्यात यावी, मात्र जमीन खरेदी करताना जमिनीचे दर वरीलप्रमाणे राहतील.

**संपर्क** :-

- संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.

------*****------

# अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थाना अर्थसहाय्याची योजना

**शासन निर्णय क्र. :- मासाका-2010/प्र.क्र.52/विघयो-2, दि. 30 मार्च,2010.**

**उद्दिष्टे** :-

- सहकाराच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्या घटकातील संस्थाना अर्थ सहाय्य देण्याची योजना आहे. यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या यंत्रमाग सोसायट्या निटिंग गारमेंट्स, सूत प्रोसेसिंग युनिट्स, शेती माल प्रक्रिया, साखर कारखाने, खांडसरी कारखाना रुपांतरित करणे व तत्सम उद्योंगांचा समावेश आहे.

**अटी व शर्ती** :-

- सहकार कायद्यांतर्गत संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक.
- संस्थेचे 70 टक्के भागधारक हे अनुसूचित जातीचे/नवबौध्द असावेत.
- संस्थेने प्रकल्पाच्या 5 टक्के स्व:हिस्सा भाग भांडवल जमा करणे आवश्यक आहे.
- शासनाने या योजनेसाठी विहीत केलेल्या 1 ते 31 अटी व पूरक अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरुप** :-

- सहकारी संस्थाचा स्व: हिस्सा - 5%
- सहकारी संस्थांना शासकीय भाग भांडवल - 35%
- शासकीय दीर्घ मुदतीचे कर्ज - 35%

- वितिय संस्थाकडून कर्ज - 25%

**संपर्क** :-

- संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.

------*****------

# वृध्दाश्रम योजना

**शासन निर्णय क्र. :- विभशा-2010/प्र.क्र.6/विजाभज/2, दि. 29 डिसेंबर,2011.**

**उद्‌दिष्टे :-**

- वृध्दापकाळ चांगल्या प्रकारे व सुखासमाधानाने घालविता यावा याकरिता योजना सुरु करण्यात आली आहे.

**लाभाचे स्वरुप :-**

- शासन मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थामार्फत अनुदान तत्वावर वृध्दाश्रम चालविण्याची योजना सन 1963 पासून कार्यान्वित आहे.
- संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम, 1960 व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1850 अंतर्गत नोंदणीकृत असावी.
- सदर वृद्‌धाश्रमात अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार, करमणूक, मनोरंजनाची सोय मोफत करण्यात येते.
- वृध्दाश्रमात निराधार व निराश्रीत 60 वर्षावरील पुरुष व 55 वर्षावरील स्त्रियांना प्रवेश देण्यात येतो.
- प्रत्येक वृध्दामागे परिपोषण अनुदान 1 जानेवारी, 2012 पासून प्रतिमाह रु. 630- ऐवजी रु. 900/- या प्रमाणे देण्यात येते.
- वृध्दाश्रमाची प्रवेश संख्या कमीत कमी 25 आहे तसेच प्रत्येक वृध्दामागे इमारत बांधकाम अनुदान रु. 750/- एकदाच दिले जाते.

**संपर्क :-**

- **शहरीसाठी** - संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
- **ग्रामीणसाठी** - संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद.

------*****------

# तांडा/वस्ती सुधार योजना

**शासन निर्णय क्र. :- तासुयो-2011/प्र.क्र.10/विजाभज-1, दि. 2 जानेवारी, 2013.**

**उद्दिष्टे :-**

- लमाण बंजारा लोकांच्या तांड्यामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.
- एका जागी स्थैर्य निर्माण करुन स्थिर जीवन जगावे व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

**अटी व शर्ती :-**

- 50 ते 100 लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या रुपये 4.00 लाख.
- 100 ते 150 लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या रुपये 6.00 लाख.
- 150 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या रुपये 10.00 लाख.

**लाभाचे स्वरुप :-**

- विद्युतीकरण, पिण्याचे पाणी, अंतर्गत रस्ते, गटारे, शौचालये तसेच वाचनालये व मुख्य रस्त्यांना जोडणारी रस्त्यांची कामे व सेवाभवन इत्यादी कामे अग्रक्रमाने घेण्यासाठी अनुदान दिले जाते.

**कार्यपध्दती :-**

- संबंधित ग्रामपंचायत यांनी प्रस्ताव तयार करुन संबंधित पंचायत समितीस सादर करावा.
- पंचायत समितीच्या सार्वजनिक बांधकाम अभियंता यांनी योजना आराखडा तयार करुन जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचे मार्फत संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण तथा सदस्य सचिव जिल्हा स्तरीय समिती यांचेकडे सादर करावा.
- सदस्य सचिव यांनी खाली जिल्हास्तरीय समिती समोर निर्णयास्तव प्रस्ताव सादर करावा.

**जिल्हास्तरीय समिती :-**

| | | |
|---|---|---|
| 1. | मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| 2. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| 3. | स्थानिक लोकप्रतिनिधी (लमाण, बंजारा समाजाचा) | सदस्य |
| 4. | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण | सदस्य सचिव |

**संपर्क :-**

- संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
- संबंधित जिल्हयाचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद.

------*****------

# विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

**शासन निर्णय क्र. :- गृनियो-2011/प्र.क्र.111/विजाभज-1, दि. 27 डिसेंबर, 2011.**

**उद्दिष्टे व स्वरुप :-**

- राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटुंबांचे राहणीमान उंचावणे.
- राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील कुटुंबांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी सहाय्य करणे.

**अटी व शर्ती :-**

- लाभार्थी कुटूंब हे विमुक्त जाती भटक्या जमातीच्या मूळ प्रवर्गातील तसेच गावोगावी भटकंती करुन उपजीविका करणारे असावे.
- लाभार्थी कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 1 लक्ष पेक्षा कमी असावे.
- लाभार्थी कुटूंबाचे स्वत:च्या मालकीचे घर नसावे.
- लाभार्थी कुटूंब हे झोपडी/कच्चे घर/पालामध्ये राहणारे असावे.
- लाभार्थी कुटूंब हे भूमीहीन असावे.
- लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.
- लाभार्थी कुटूंबाने राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- सदरहू योजनेचा लाभ पात्र कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.
- लाभार्थी वर्षभरात किमान 6 महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा.

**लाभाचे स्वरुप :-**

- ग्रामीण भागातील या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विजाभज कुटुंबांना प्रत्येकी पाच गुंठे जमीन देवून त्यावर त्यांना 269 चौ.फु.ची घरे बांधून देणे.
- उर्वरित जागेवर लाभार्थी कुटुबांना विविध शासकीय योजनांव्दारे स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे.
- प्रतिवर्षी 33 जिल्हयातील प्रतिजिल्हा 3 गावे निवडून त्या गावांतील 20 कुटुंबांना या योजनेचा लाभ देणे.
- पालात राहणारे, दारिद्रय रेषेखालील कुटुंब, घरात कोणीही कमावता नाही अशा विधवा, परित्यक्ता किंवा अपंग महिला व पूरग्रस्त या प्राधान्यक्रमाने कुटुंबाची निवड केली जाईल.
- घर व भूखंड हे संयुक्तपणे पती-पत्नीच्या नावे केले जाईल, मात्र विधवा व परित्यक्ता स्त्रियांच्या बाबतीत भूखंड व घर त्यांच्या नावेच केले जातील.

- भूखंड व घर कोणालाही हस्तांतर करता येणार नाही व विकता येणार नाही. तसेच भाडे तत्वावर सुध्दा देता येणार नाही व पोटभाडेकरु सुध्दा ठेवता येणार नाही.
- सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षेतखाली जिल्हा स्तरावर समिती व उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर समिती निर्माण करण्यात आलेली असून त्यांना शासकीय जमिनीची निवड करणे, शासकीय जमीन नसल्यास खाजगी जमीन निश्चित करुन खरेदी करणे, लाभार्थी निवड करणे, लेआऊट तयार करुन भूखंडावर घर बांधून देणे, पायाभूत सुविधा पुरविणे, विविध शासकीय योजनाव्दारे स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे इ. कामे करावयाची आहेत.

## शालांत परीक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना.

**शासन निर्णय क्र. :- अपंग-2013/प्र.क्र.91/अ.क.-1, दि. 30 डिसेंबर, 2014.**

**उद्देशः-**

- इयत्ता 10 वी पुढील शिक्षण घेणारे अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

**लाभार्थी पात्रता :-**

- इयत्ता 10 वी पुढील शिक्षण घेणारे अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थी.
- विद्यार्थ्यांकडे किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्क्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.
- विद्यार्थी एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा.

**लाभाचे स्वरुप :-**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचा गट | शिष्यवृत्तीची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | वसतिगृहात राहणारे | वसतिगृहात न राहणारे |
| 1. | गट अ (वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण, ॲगीकल्चर, व्हेटरनी मधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण) | दरमहा रु. 1200/- | दरमहा रु. 550/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | गट ब (अभियांत्रिकी, तांत्रिक, स्थापत्य वैद्यकशास्त्र, पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रु. 820/- | दरमहा रु. 530/- |
| 3. | गट क (कला, विज्ञान, वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रु. 820/- | दरमहा रु. 530/- |
| 4. | गट ड (द्वितीय वर्ष व त्यानंतर पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम) | दरमहा रु. 570/- | दरमहा रु. 300/- |
| 5. | गट इ (11 वी, 12 वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम) | दरमहा रु. 380/- | दरमहा रु. 230/- |

**संपर्क** :-

- संबंधित समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर.

------*****------

# स्वयंरोजगारासाठी अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य
## (बीजभांडवल)

**शासन निर्णय क्र. :- अपंग-2008/प्र.क्र.2012/सूधार-3, दि. 02 जुलै, 2010.**

**उद्देश :-**

- अपंग व्यक्तींना लघुउद्योगांसाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करुन देणे.

**निकष :-**

- वार्षिक उत्पन्न रु. 1.00 लाखापेक्षा कमी असावे.
- अपंग व्यक्तीचे किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्क्यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.
- वय 18 ते 50 वर्षे यामध्ये असावे.
- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरुप :-**

- रु. 1.50 लाखापर्यंतच्या व्यवसायाकरिता 80 टक्के बँकामार्फत कर्ज व 20 टक्के अथवा कमाल रुपये 30000/- सबसिडी स्वरुपात अर्थसहाय्य.

**संपर्क :-**

- संबंधित समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर.

------*****------

# अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे.

### अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे.

**शासन निर्णय क्र. :- इडीडी-1088/12185/प्र.क्र.82/सूधार-2, दि. 10 ऑगस्ट, 1989.**

**उद्देश :-**

- अपंगांचे शारिरीक पुनर्वसन करणे.

**निकष :-**

- अपंग व्यक्तीकडे किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्क्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.
- अपंग व्यक्तीचे दरमहा उत्पन्न रुपये 2000/- पेक्षा कमी असावे.
- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- उपकरणाची / साधनाची आवश्यकता असल्याचे तज्ञांचे शिफारसपत्र असावे.

**लाभाचे स्वरुप :-**

- अस्थिव्यंग अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकल, कृत्रिम अवयव, कुबड्या, कॅलीपर्स इत्यादी साधने तसेच अंध व्यक्तींना चष्मे, काठ्या, इयत्ता 10 वी पुढील अंध व्यक्तींना शिक्षणासाठी टेपरेकॉर्डर, कर्णबधिरांसाठी वैयक्तिक श्रवणयंत्र इत्यादी साधनासाठी रु. 3000/- पर्यंतचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे.

------*****------

# अपंग-अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना.

**शासन निर्णय क्र. :- क्रअपंग-2013/प्र.क्र.103/अ.क.-2, दि. 17 जून, 2014.**

**उद्‌देश :-**

- अपंग व अपंगत्व असलेल्या व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देणे व विवाहासाठी आर्थिक सहाय्य करणे.

**निकष :-**

- विहीत नमुन्यात जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- अर्जदाराचे अपंगत्व किमान 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे.
- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरुप :-**

- किमान 40 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंगत्व नसलेल्या वधू किवा वराने अपंगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास या योजनेतून खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल.
    - रक्कम रुपये 25000/- चे बचत प्रमाणपत्र
    - रुपये 20000/- रोख स्वरुपात.
    - रुपये 4500/- संसार उपयोगी साहित्य/वस्तू खरेदीसाठी देण्यात येईल.
    - रुपये 500/- स्वागत समारंभाच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यासाठी देण्यात येईल.

**संपर्क :-**

- संबंधित समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/उपनगर.

------*****------

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

- स्वच्छ भारत मिशन.

# स्वच्छ भारत मिशन

**सुरुवात :-**

- 2 ऑक्टोबर, 2014.

**उद्‌देश :-**

| ग्रामीण | शहरी |
|---|---|
| ➢ 2019 अखेर स्वच्छ भारत व सर्व ग्रामपंचायतींना निर्मल दर्जा मिळवून देणे ही लक्ष्ये साधण्यासाठी ग्रामीण क्षेत्रातील स्वच्छतेचे वर्धन करणे.<br>➢ पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित व शाश्वत स्वच्छता प्राप्त करण्यासाठी स्वस्त व योग्य तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.<br>➢ घन तसेच द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन करणे. | ➢ शहरे हागणदरीमुक्त करणे, यासाठी देशभरातील 4041 शहरे निवडण्यात आली आहेत.<br>➢ मानवी मलनिस्सारण पध्दतीने निर्मूलन करणे<br>➢ आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने नागरी घन कचऱ्याचे व्यवस्थापन करणे.<br>➢ स्वच्छतेच्या सवयी लावून वर्तणुकीत सुधारणा घडवून आणणे.<br>➢ शहरी स्थानिक मंडळाच्या क्षमतेत वर्धन करणे. |

**योजनेचे घटक :-**

| ग्रामीण | शहरी |
|---|---|
| ➢ वैयक्तिक शौचालय उभारणीस आर्थिक मदत. उभारणीसाठीच्या 12,000 रु. खर्चापैकी केंद्र 9,000 रु. व राज्यशासन 3,000 रु. खर्च पुरवतात.<br>➢ सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी आर्थिक मदत. कमाल 2 लाख रु. प्रति सार्वजनिक स्वच्छतागृह. यात केंद्र राज्य व समुदायांचा वाटा 60:30:10 असा आहे.<br>➢ स्वच्छता उपकरणे बनविणारी केंद्रे तसेच ग्रामीण स्वच्छता बाजारांसाठी | ➢ वैयक्तिक शौचालय उभारणी, अस्वच्छ शौचालयाचे रुपांतर फ्लश सुविधा असलेल्या शौचालयांमध्ये करणे.<br>➢ सामुदायिक शौचालय उभारणी.<br>➢ सार्वजनिक शौचालय उभारणी.<br>➢ घनकचरा व्यवस्थापन<br>➢ प्रशिक्षण व लोकजागृती |

| | |
|---|---|
| प्रतिजिल्हा 35 लाख रुपयांची मदत.<br>➢ घन तसेच द्रव कचरा व्यवस्थापनासाठी 7 लाख ते 20 लाखांपर्यंतची मदत. | |

------*****------

# गृहनिर्माण विभाग

- झोपडपट्टी पुनर्वसन योजना.

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना.

**शासन निर्णय क्र झोपुधो 1001/प्र.क्र.125/14/झोपसु, दि. 22 जुलै, 2014.**

**उद्दिष्ट :-**

- महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम 1971 तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, 2011 आणि महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, 2014 च्या तरतूदीनुसार दि. 01.01.2000 या अर्हता दिनांक रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमीनीवरील घोषित तसेच गणनाकृत झोपडीत प्रत्यक्ष राहत असलेल्या झोपडीवासीयांचा निवारा संरक्षित करणे.

**योजनेची व्याप्ती :-**

- या योजनेच्या तरतुदी राज्यात सुमारे 70 शहरांना लागू केल्या आहेत.
- त्यापैकी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड व नागपूर या शहरांत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

**योजनेचे स्वरुप :-**

- यामध्ये झोपडीवासींयास मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्याच्या बदल्यात विकासकास खर्च व योग्य असा नफा यासाठी खुल्या बाजारात विक्रीसाठी चटईक्षेत्र उपलब्ध करुन देण्यात येते.
- झोपडपट्टीवासियांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था

***राष्ट्रीय आरोग्य अभियानात प्रजनन, माता, नवजात, बालक व किशोरवयीन आरोग्य (RMNCH+A- Reproductive, Maternal, Newborn, Child and Adolescent Health) हा दृष्टिकोन अवलंबिण्यात आला आहे.***

***माता व बालकांच्या मृत्यूंच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर प्रभावी उपाय योजणे व माता आणि बालकांना शीघ्र उपचार पुरविणे या उद्देशाने 2013 पासून RMNCH+A हा एकात्मिक दृष्टिकोन विकसित करण्यात आला आहे.***

------*****------

# सार्वजनिक आरोग्य विभाग

- राष्ट्रीय आरोग्य अभियान.
- प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम.
- जननी सुरक्षा योजना
- जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम.
- वंदे मातरम् योजना.
- राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम.
- प्रधानमंत्री जनऔषधी योजना.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान.**

**सुरूवात :-**

- 12 एप्रिल, 2005.

**उपयोजना :-**

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (सुरुवात- 12 एप्रिल, 2005).
- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (सुरुवात- 1 मे, 2013).

**उद्दिष्टे :-**

- गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देणे.
- आरोग्य क्षेत्रातील विकेंद्रीकरण सुकर करणे
- पेयजय, स्वच्छता, शिक्षण, पोषक, सामाजिक व लैंगिक समावेशनासाठी प्रयत्न करणे.

**योजनेचे लक्ष्य :-**

- मातामृत्यूप्रमाण 100 पेक्षा कमी करणे (1 लाखामागे 100 किंवा 1000 मागे 1).
- बालमृत्यूदर 25 पेक्षा कमी करणे.
- एकूण जननदर 2.1 करणे.
- 15 ते 49 वर्षे वयोगटातील स्त्रियांमध्ये रक्तक्षय टाळणे व कमी करणे.
- सांसर्गिक, असांसर्गिक, इजा, नवीन आजारांची लागण व त्यामुळे येऊ शकणारे मृत्यू कमी करणे व टाळणे.
- आरोग्यावर कुटुंबाचा होत असणारा अतिरिक्त खर्च कमी करणे.
- क्षयरोगाची लागण व त्यामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण निम्म्यावर आणणे.
- कुष्ठरोगाचा आढळदर 10,000 लोकसंख्येमागे 1 पेक्षा कमी करणे व प्रसारदर शून्य करणे.
- वार्षिक मलेरियाची लागण होण्याचे प्रमाण 1000 मागे 1 पेक्षा कमी करणे.
- हत्तीपायाच्या सूक्ष्मफिलारिया परजीवांचा आढळ 1 टक्के पेक्षा कमी करणे.
- काला आजाराचे 2015 पर्यंत निर्मूलन करणे.

✓ राष्ट्रीय आरोग्य अभियानात प्रजनन, माता, नवजात, बालक व किशोरवयीन आरोग्य (RMNCH+A- Reproductive, Maternal, Newborn, Child and Adolescent Health) हा दृष्टिकोन अवलंबिण्यात आला आहे.

✓ माता व बालकांच्या मृत्यूंच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर प्रभावी उपाय योजणे व माता आणि बालकांना शीघ्र उपचार पुरविणे या उद्देशाने 2013 पासून RMNCH+A हा एकात्मिक दृष्टिकोन विकसित करण्यात आला आहे.

------*****------

# प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम

**(RCH- Reproductive and Child Health Program).**

**सुरूवात :-**

- 15 ऑक्टोबर, 1997.

**उद्देश :-**

- शिशू, बाल व मातामृत्यूदर कमी करणे.
- कुटुंब कल्याणाच्या (Family Welfare) विविध योजनांच्या व धोरणाच्या अंमलबजावणीसाठी, समन्वय घडवून आणणे आणि पायाभूत सुविधा निर्माण करणे.

**स्वरुप :-**

- 1 एप्रिल, 2005 नंतर RCH चा दुसरा टप्पा RCH-II सुरु करण्यात आला.

  **या दुसऱ्या टप्प्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :-**

  - कार्यक्रमाचा लाभ लोकसंख्येतील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचविणे.
  - कार्यक्रमात राज्यांचा जबाबदारीपूर्वक सहभाग वाढविणे.
  - आरोग्य सेवांचे विकेंद्रीकरण करणे.
  - आर्थिक सहाय्य करताना कार्यक्रमाच्या मूल्यांकनाचा विचार करणे.

***सध्या RCH-II राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत आहे.***

------*****------

# जननी सुरक्षा योजना

**सुरूवात :-**

- 12 एप्रिल, 2005.
- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय प्रसूती लाभ योजनेचे रुपांतर या योजनेत करण्यात आले.

**उद्देश :-**

- संस्थात्मक प्रसती वाढविणे.

**स्वरुप :-**

- योजना राबविण्यासाठी राज्यांचे वर्गीकरण Low Performing State (**LPS**) व High Performing State (**HPS**) असे करण्यात आले आहे. त्यानुसार लाभार्थ्यांची पात्रता खालीलप्रमाणे आहे:-
    - **HPS राज्ये :-**
        - दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील मातांच्या पहिल्या अपत्यांना लाभ दिला जातो.
        - तसेच मातेचे वय 19 वर्षे व त्यापेक्षा जास्त असावे.
    - **LPS राज्ये :-**
        - सर्वच मातांसाठी तसेच त्यांच्या कितव्याही अपत्यासाठी सदर योजना लागू आहे.

**दिले जाणारे लाभ (रुपयामध्ये) :-**

| **राज्ये** | **कुशल दाईच्या मदतीने घरी प्रसुती** | **ग्रामीण रुग्णालयात प्रसुती** | **शहरी आरोग्य संस्थेमध्ये प्रसुती** | **सिझेरीयन प्रसुती** |
|---|---|---|---|---|
| **HPS** | 500 | 700 | 500 | 1500 |
| **LPS** | 500 | 1400 | 1000 | 1500 |

------*****------

# जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम

**सुरूवात** :-

- 01 जून, 2011.

**उद्देश** :-

- गर्भवती व आजारी असणाऱ्या नवजात (30 दिवसांपर्यंतच्या) अर्भकांना मोफत आरोग्य सेवा पुरविणे.
- या योजनेचा लाभ किमान 1.2 कोटी गर्भवतींना देणे.

**स्वरुप** :-

- सार्वजनिक आरोग्य संस्थामध्ये प्रसुती होणाऱ्या गर्भवतींना संपूर्णत: मोफत प्रजनन सेवा पुरविली जाते.
- यामध्ये पुढील सेवांचा समावेश होतो :-
    1 मोफत औषधे व सुश्रुषा.
    2 सामान्य प्रसुतीवेळी तीन दिवसांचा आहार व सिझेरीयन सेक्शन झाले असल्यास सात दिवसांपर्यतचा आहार.
    3 मोफत निदान सेवा.
    4 रक्ताच्या बाटल्या.
    5 घरापासून रुग्णालयापर्यंत वाहतूक सेवा.

------*****------

# वंदे मातरम् योजना

**सुरवात** :-

- 09 फेब्रुवारी, 2004.

**उद्देश** :-

- माता मृत्यूदर कमी करतांना शासकीय यंत्रणेसोबत खाजगी आरोग्य यंत्रणेचा सहभाग मिळविणे.
- आरोग्य सेवांचे विकेंद्रिकरण करणे.

**स्वरुप** :-

- शासन गर्भारपणात लागणाऱ्या औषधी, अ जीवनसत्व, लसी खाजगी रुग्णालयांना मोफत पुरवत असते.
- गर्भवतींच्या खाजगी तसेच शासकीय रुग्णालयामधील बाह्यरुग्ण तपासणी, सल्ला, मार्गदर्शन व कुटूंब नियोजनाच्या सल्ल्यासाठी दर महिन्याची 9 तारीख वंदे मातरम् दिन म्हणून पाळली जाते.

- सध्या या योजनेऐवजी प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्त्व अभियान ही योजना सुरु झाली आहे

------******------

# राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम

**सुरूवात :-**

- 07 जानेवारी, 2014.

**उद्देश :-**

- 11 ते 19 वर्षे वयोगटातील (किशोरवयीन) मुलांच्या (मुलगे व मुलगी) पोषण, प्रजनन, स्वास्थ, व्यसनाधीनता व इतर महत्त्वाच्या विषयासाठी सुरू करण्यात आला.
- योजनेचे मुख्य तत्त्व किशोरवयीन गटाचा सहभाग, नेतृत्त्व, समानता, समावेशन, लैगिग समानता, इतर क्षेत्रांचा सक्रिय सहभाग घेणे.
- किशोरवयीन गटाला त्यांचे आरोग्य व चांगल्या राहणीमानाची क्षमता विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**उद्दिष्टे :-**

- पोषणात सुधारणा करणे.
- लैंगिक व प्रजनन स्वास्थ्यात सुधारणा करणे.
- मानसिक आरोग्य सुधारणे.
- इजा व हिंसा टाळणे.
- व्यसनाधीनता दुर करणे.
- ***या कार्यक्रमाला UNFPA (United Nations Population Fund) संस्था मदत करत असून, एक राष्ट्रीय किशोरवयीन स्वास्थ धोरण तयार करण्यात आले आहे.***

------*****------

# प्रधानमंत्री जनऔषधी योजना

**सुरवात :-**

- नोव्हेंबर, 2008 रोजी प्रत्यक्ष अनावरण मात्र प्रत्यक्षात 2010-11 पासून सुरुवात.
- **सहभागी विभाग –** केंद्रीय रसायने व खत मंत्रालयाच्या औषधी विभाग आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने

**उद्देश :-**

- ग्राहकांना दर्जेदार व स्वस्त औषधे पुरविणे.

**स्वरुप :-**

- या योजनेव्दारे जनऔषधालये उभारण्यास प्रोत्साहन दिले जाते.

**लाभ :-**

- जनऔषधालये उभारणाऱ्यास औषधाच्या MRP वर 16 टक्के पर्यंत नफा मिळतो. (म्हणजे ही औषधी त्याला 84 टक्के दराने मिळते).
- राज्य शासनाने निर्देशित केलेले असल्यास असे औषधालय उघडण्यासाठी 2 लाख रुपये आणि संगणक घेण्यासाठी 50,000 रुपये आर्थिक सहाय्य केले जाते.
- औषधालय उघडल्यानंतर पहिली 12 महिने मासिक विक्रीच्या 10 टक्के रक्कम (कमाल 10,000 रुपये) प्रोत्साहन म्हणून दिली जाते.

# आदिवासी विकास विभाग

- शासकीय आश्रमशाळा समूह योजना.
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे.
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मेट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना.
- अनुसूचति जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत.
- पंडित दीनदयाल उपध्याय स्वयम् योजना
- महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना.
- केद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यक्लिअस बजेट) योजना.
- मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना.
- केंद्र  शासन सहाय्यित योजना.
- ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम.
- शबरी आदिवासी घरकुल योजना.
- भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दूल कालम अमृत आहार योजना टप्पा- 1
- भारतरन्त डॉ.ए.पी.जे. अब्दल कलाम अमत आहार योजना

# शासकीय आश्रमशाळा समूह योजना

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- मुख्याध्यापक / प्राचार्य, शासकीय आश्रमशाळा

**कायदे / नियम / शासन निर्णय:-**

- समाजकल्याण, सांस्कृतिक, क्रिडा आणि पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीपी-1072/3893-जी, दिनांक 14 ऑगस्ट 1972 व दिनांक 16.06.2017.

**थोडक्यात कार्यपध्दती व लाभ:-**

- महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातींची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन 1972-73 पासून क्षेत्रविकासाचा दृष्टीकोन स्विकारुन शासकीय आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत.
- आजमितीस आश्रमशाळांमध्ये इ. 1 ली ते 12 वी पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. त्यापैकी 126 आश्रमशाळांना कनिष्ठ महाविद्यालय संलग्न आहेत. तसेच 43 आश्रमशाळांना संलग्न व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहेत.
    1. आश्रमशाळेत मोफत प्रवेश
    2. प्रवेशीत विद्यार्थ्यांना विनामुल्य शिक्षण, निवास, भोजन पुरविण्यात येते. तसेच गणवेश, आंथरुण-पांघरुण, ताट वाटी, अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक पुस्तके, शालेय स्टेशनरी, लेखन साहित्य इ. यासाठी थेट निधी विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर देण्यात येतो.

**पात्रता/निकष:-**

- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
- प्रवेशाच्या वेळेस त्याचे वय 6 वर्ष पूर्ण असावे.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांनी दिलेले पालकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र,
- प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचा जन्मतारखेचा दाखला (गट विकास अधिकारी / ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी इ.)
- जन्माचा दाखला नसल्यास आई-वडीलांचे प्रतिज्ञापत्र.
- पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला.

------*****------

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना

**कायदे / नियम / शासन निर्णय :-**

- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आदिशि- 1204/प्र.क्र.9/का-12, दिनांक 9 ऑगस्ट, 2004.
- जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.01.07.2010 रोजीच्या मार्गदर्शक सूचना.

**थोडक्यात कार्यपध्दती व लाभ:-**

- आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविता यावा म्हणून भारत सरकारद्वारा ही योजना राबविली जाते.
    - वैद्यकीय व अभियांत्रिक अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना रु. 1200/- व अनिवासीसाठी रु. 550/- मासिक निर्वाह भत्ता
    - तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक इ.शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यासाठी रु.820/- दरमहा व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी रु.530/- दरमहा मासिक निर्वाह भत्ता
    - पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र, वास्तुकला इ. साठी निवासीसाठी रु. 570/- अनिवासीसाठी रु. 300/- मासिक निर्वाह भत्ता
    - इ.11 वी व 12 वीसाठी व पदवीचे पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यासाठी दरमहा रु.380/- व अनिवासीसाठी रु.230/- मासिक निर्वाहभत्ता देण्यात येतो.
    - वरील अभ्यासक्रमांचे अनुज्ञेय शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क संबंधित महाविद्यालयास अदा केले जाते. (**tabular format मध्ये करणे**)

**पात्रता/निकष:-**

- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये 2.50 लाख.
- विद्यार्थी पूर्णवेळ नोकरीत नसावा.
- एकाच कुटूंबातील फक्त 2 मुलांना परंतु सर्व मुलींना लाभ देण्यात येतो.

**अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना :-**

- ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbtmahait.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- प्रत्यक्ष योजनेचा लाभ देतेवेळी जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, प्रवेश पावती व अनुषंगिक कागदपत्र

------*****------

# अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**कायदे / नियम / शासन निर्णय :-**

- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आदिशी- 1203/प्र.क्र.76/का-12, दि. 31 मार्च, 2005.
- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.पशिशि-2015/प्र.क्र.334/का-12, दि.16 मार्च, 2016.

**थोडक्यात कार्यपध्दती व लाभ :-**

- एम.बी.ए. (पदव्युत्तर), वैद्यकीय अभ्यासक्रम (पदवी / पदव्युत्तर), बी.टेक (इंजिनअरिंग) (पदवी / पदव्युत्तर), विज्ञान (पदवी / पदव्युत्तर), कृषी (पदवी / पदव्युत्तर), इतर विषयाचे अभ्यासक्रम (पदवी / पदव्युत्तर) मधील एकूण 10 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा यासाठी या योजनेतंर्गत शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, भोजन, निवास, प्रवास इ. / अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी सहाय्य केले जाते.

**पात्रता/निकष :-**

- अनुसूचित जमातीचा (जमातीचे वैधता प्रमाणपत्रधारक), भूमिहीन आदिवासी कुटूंबातील, दुर्गम भागातील, तसेच आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना प्राधान्य.
- विद्यार्थ्याला परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठामध्ये प्रवेश मिळालेला असावा.
- या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा रु. 6.00 लक्ष पर्यंत राहील.
- सदर शिष्यवृत्ती आदिवासी कुटूंबातील केवळ एकाच व्यक्तीस आणि एका अभ्यासक्रमासाठी अनुज्ञेय राहील.

**अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना :-**

- अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- प्रत्यक्ष शिष्यवृत्ती धारकांनी पालकाचा जमातीचा दाखला, जातीचे वैधता प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्न दाखला.

------*****------

# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**कायदे / नियम / शासन निर्णय :-**

- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आवगृ-2016/प्र.क्र.87/का-12, दि.15 ऑक्टोबर, 2016.
- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आवगृ-2016/प्र.क्र.87/का-12, दि.27 नोव्हेंबर, 2018.

**थोडक्यात कार्यपध्दती / अनुज्ञेय सेवा :-**

- इ.12 वी नंतरच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या तथापि विभागाच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्याथ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते.
- महानगर स्तरावर रु.6000, विभागस्तरावर रु.5100,जिल्हास्तरावर रु.4300 व तालुकास्तरावर रु.3800 याप्रमाणे प्रतिमाह रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते.

**पात्रता/निकष :-**

- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा रु.2.50 लक्ष पर्यंत राहील.
- विद्यार्थ्याने 12 वी नंतरच्या किमान 2 वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

**अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना :-**

- अर्ज नमुना https://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- जातीचा दाखला, जातीचे वैधता प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्न दाखला, मागील वर्षाची गुणपत्रिका इ.

------*****------

# महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना

**योजना अंमलबजावणी अधिकारी/कर्मचारी :-**

- मुख्याध्यापक/प्राचार्य

**कायदे/नियम/शासन निर्णय :-**

- आदिवासी विकास विभाग ,शासन निर्णय क्र .शाआशा1000/प्र.क्र.48/का.13, दि.11/9/2000.

**थोडक्यात कार्यपध्दती व लाभ :-**

- एकलव्य मॉडेल निवासी आश्रमशाळेसाठी केंद्र शासनाकडून सध्या रु.64,500/- प्रतिविद्यार्थी /प्रतिवर्षी अनुदान मिळते .सदर अनुदानांतून आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी तेथील विद्यार्थी व व्यवस्थापन यावरील खर्च भागविणे अपेक्षित आहे .परंतु सदर निधी कमी असल्याने राज्य शासनाकडून साधारणपणे प्रतीवर्षी रु.3.50 कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे .

**पात्रता/निकष :-**

- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
- एकलव्य निवासी शाळांमध्ये CBSE च्या अभ्यासक्रमानुसार इयत्ता 6वी ते 12 वीच्या वर्गात शिक्षण देण्यात येते .सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा ,नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत शाळा ,शासनमान्य अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांतील इयत्ता 5 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परिक्षा घेऊन इयत्ता 6 वी मधील प्रवेशांसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते.

**अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना :-**

- **अर्ज नमुना-** संबधीत शासकीय/अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, शासन मान्य अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांचे प्राचार्य /मुख्याध्यापक यांच्याकडे अर्जाचा नमुना उपलब्ध करून देण्यात येतो.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांनी दिलेले पालकांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र
- इयत्ता 5 वी मध्ये ज्या ठिकाणी शिक्षण घेत होता त्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला
- अनुसूचित जमातीच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 1.00 लाखापर्यंत असावे.

**प्रवेश देण्याचा कालावधी :-**

- प्रवेश परिक्षेचा निकाल लागल्यानंतर उपलब्ध जागेनुसार संबधित एकलव्य निवासी शाळांच्या प्राचार्यामार्फत प्रवेश देण्यात येतो.

**प्रवेशासंबधी ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय :-**

- संबधित प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

------******------

# केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

**कायदे / नियम / शासन :-**

- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. न्युबयो-2000/प्र.क्र.144(अ)/का-5, दिनांक 31 मे 2001

**थोडक्यात कार्यपध्दती :-**

- ज्या योजनाचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या कर्जविरहीत योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन गरजु आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवुन देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.
- या योजनेतंर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटूंबास / लाभाची आर्थिक मर्यादा रु.50,000/- पर्यंत असेल.तर सामूहिक प्रकल्प/कार्यक्रमांतर्गत रु.7,50,000/- आहे.

**पात्रता/निकष :-**

- लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
- लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असावा.
- लाभार्थीनी सर्व कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक.

**अर्ज कुठे उपलब्ध आहे :-**

- अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला
- दारिद्रय रेषेचा दाखला (आवश्यक तेथे) इतर अनुषंगिक कागदपत्र

**अपेक्षित कालावधी :-**

- अर्ज प्राप्त झाल्यापासुन व परिपूर्ण कागदपत्रासह सहा महिन्याच्या कालावधीत
  - योजनांच्या आराखडयास मंजूरी मिळाल्यानंतर इच्छुक उमेदवार व संस्थांकडुन अर्ज मागविणे, छाननी अंती लाभार्थी व संस्था निश्चित करणेकरिता - 15 दिवस
  - ज्येष्ठता यादी व योजनानिहाय लाभार्थी यादी निश्चित करणे, संस्था व लाभार्थी निवड यादीस मान्यता घेणे - 25 दिवस

- प्रत्यक्ष योजनेचा लाभ देण्यास योजनेच्या स्वरुपानुसार 1 ते 6 महिन्याचा कालावधी

------*****------

# मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना

**अंनलबजावणी यंत्रणा** :-

- संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

**कायदे / नियम / शासन निर्णय** -

- शासन निर्णय क्र. एसटीसी-1482/2908/प्र.क्र.96/का-9, दि. 11 सप्टेंबर 1987 व शासन निर्णय मोप्रके-1095/प्र.क्र.185/95/का-9, दि. 15 फेब्रुवारी 1997

**थोडक्यात कार्यपध्दती व लाभ** :-

- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरुन निघावा व अवजड वाहन चालक परवानाधारक अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा व गडचिरोली येथे वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- मोटार वाहन चालक प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना तांत्रिक, अतांत्रिक चालकविषयक बाबीवर सखोल प्रशिक्षण देणे.
- तसेच प्रशिक्षणार्थ्यांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन सराव करुन घेण्यात येतो.

**पात्रता/निकष** :-

- उमेदवार अनुसूचित जमातीचा असावा.
- वय 23 ते 25 वर्षे. उंची किमान 163 सें.मी., शिक्षण 7 वी उत्तीर्ण.
- उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा.
- अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी 2 वर्षाचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव.

**कोणती कागदपत्रे जोडायची** :-

- अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला,अवजड वाहन चालविण्याचा परवाना,इतर अनुषंगिक कागदपत्र

**अपेक्षित कालावधी** :-

- वर्षातून 2 बॅचेस घेण्यात येतात.

# केंद्र शासन सहाय्यित योजना

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

**कायदे / नियम / शासन निर्णय :-**

- केंद्र शासनाच्या पुढील मार्गदर्शक सुचनांनुसार
  - एफ-क्र.22040/37/2007-एनजीओ, दि.20.03.2015.
  - एफ-क्र.110015/06/2016-एसजी-II, दि.17.06.2016.
  - एफ-क्र.110015/01/2016-एसजी-1, दि.20.06.2016.

**थोडक्यात कार्यपध्दती :-**

- सेवा क्षेत्र बाधीत क्षेत्र व तत्सम बाबीतील उणीवा भरुन काढण्यासाठी राज्याच्या योजनेस पूरक म्हणून सदर योजना राबविण्यात येतात. यामध्ये क्षेत्रविकास व व्यक्तीविकास हे दोन मूलभूत घटक येतात.
- या योजनेमध्ये खालीलप्रमाणे विकास शीर्षअंतर्गत विविध योजना राबविण्यात येतात.

| अ.क्र. | केंद्र शासन योजना | घटक कार्यक्रम तथा विकास शिर्ष |
|---|---|---|
| 1 | विशेष केंद्रीय सहाय्य | 1. कृषी व पशुसंवर्धन विषयक योजनांसाठी अर्थसहाय्य<br>2. शिक्षण विषयक योजना<br>3. उत्पन्न वाढीच्या योजना<br>4. आरोग्य विषयक योजना प्रशासकीय/संस्थात्मक बळकटीकरण |
| 2 | भारतीय संविधानाच्या कलम 275(1)अंतर्गत योजना (क्षेत्र विकास व सिंचन) | 1. कृषी व पशुसंवर्धन विषयक योजनांसाठी अर्थसहाय्य<br>2. शिक्षण विषयक योजना<br>3. उत्पन्न वाढीच्या योजना<br>4. आरोग्य विषयक योजना प्रशासकीय/संस्थात्मक बळकटीकरण |
| 3 | आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम (कातकरी, कोलाम, माडीया, गोंड) | उत्पन्न वाढीच्या योजना, रोजगार निर्मिती, शिक्षण, आरोग्य, पेय जल,निवारा, दळणवळण, विद्युत. |

**पात्रता/निकष :-**

- लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.

**अर्ज कुठे उपलब्ध आहे :-**

- अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे.

**कोणती कागदपत्रे जोडायची** :-

- अनुसूचित जमातीचा प्रवर्गचा दाखला/आधार कार्ड/ योजनानिहाय आवश्यक लागणारी इतर कागदपत्रे.

**अपेक्षित कालावधी** :-

योजनेस शासनाकडुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर परिपूर्ण कागदपत्र प्राप्तीनंतर तीन महिन्यात सेवा पुरविली जाईल.

------*****------

# ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम

**सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी :-**

- संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

**कायदे / नियम / शासन निर्णय :-**

- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आवसु- 2006/प्र.क्र.72/का-14, दिनांक 26 जून 2007

**थोडक्यात कार्यपध्दती :-**

- संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी ग्रामीण / नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा / मिनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा / मिनीमाडा क्षेत्र, तसेच आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रातील 50 टक्के पेक्षा जास्त आदिवासीची लोकसंख्या असलेल्या वस्त्या / पाडे / गावे यांनी आवश्यकतेनुसार कामे सुचवावित.
- सदर कामे आवश्यक असल्याची खात्री करुन व तसा प्रस्ताव तयार करुन प्रकल्प अधिकारी यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावा.
- जी कामे घ्यावयाची असतील ती कामे ज्या प्रशासकीय विभागाशी निगडीत असतील त्या विभागाने ठरवून दिलेले निकष व मानके यांचे अनुपालन होणे आवश्यक आहे.
- ग्रामपंचायतींनी सुचविलेल्या कामांना अग्रक्रम देण्यात यावा.
- सदर योजनेतंर्गत मुख्य वस्तीपासून जोडरस्ते, सिमेंट कॉक्रिट / डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊड, पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, जुन्या विहिरीची दुरुस्ती, बंद गटार बांधणे, आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, समाजमंदिर, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी बांधकाम, नदीकाठ संरक्षण भिंत, घाट बांधकाम, नदीकाठची संरक्षण भिंत, तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास, ग्रामपंचायत कार्यालय / ग्रामसचिवालय इ. कामे.

**पात्रता/निकष :-**

- राज्यातील ग्रामीण / नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा/मिनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा/मिनीमाडा क्षेत्र, तसेच आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रातील 50 टक्केपेक्षा जास्त आदिवासीची लोकसंख्या असलेल्या वस्त्या/ पाडे/ वाडया/गांवाच्या महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग, तेथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सामुहिक विकासाच्या सुविधा पुरविण्याची योजना राबविण्यात येते.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- जे काम घ्यावयाचे त्याचे अंदाजपत्रक
- ग्रामपंचायतीचा ठराव

➢ इतर अनुषंगिक कागदपत्रे

**अपेक्षित कालावधी :-**

| | |
|---|---|
| प्रस्तावित कामाचा ठराव व लोकसंख्येचा दाखला प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठविणे | माहे एप्रिल अखेर |
| मागणीप्रमाणे सर्व गावाचा एकत्रित वार्षिक आराखडा करणे व अपर आयुक्त कार्यालयास सादर करणे | 15 मे अखेर |
| अपर आयुक्तांनी आराखडा मान्य करणे | 20 मे |
| आदिवासी विकास निरीक्षकामार्फत स्थानभेट देऊन अहवाल प्राप्त करणे | 15 जुन पर्यंत गावाच्या आदिवासी लोकसंख्येच्या आधारावर |
| वित्तीय मर्यादेत प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यता घेणेसाठी संबंधित यंत्रणेसअंदाजपत्रके पाठविणे | 30 जुन पर्यंत |
| प्राप्त अंदाजपत्रक जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेकरिता सादर करणे | - 31 ऑगस्ट पर्यंत |
| जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणेच्या नावे सदर मंजूर कामास प्रशासकीय मान्यता देऊन त्यांचे नावे निधी उपलब्ध करुन देणे | |

------*****------

# शबरी आदिवासी घरकुल योजना.

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय.

**शासन निर्णय:-**

- शासन निर्णय दिनांक 28 मार्च.2013 व दिनांक 15 मार्च,2016.

**थोडक्यात कार्यपध्दती :-**

- राज्यातील बेघर किंवा ज्यांची घरे कुडा - मातीची आहेत अशा आदिवासी लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करुन देणे.

**नागरिकांची पात्रता/निकष :-**

- अनुसूचित जमाती संवर्गातील असावा
- राज्यातील वास्तव्य किमान 15 वर्ष असावे.
- स्वत:चे किंवा कुटुंबाचे पक्के घर नसावे.
- कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा
    - ग्रामीण क्षेत्र - रु.1.20 लक्ष
    - नगरपालिका क्षेत्र - रु.3.00 लाख
    - महानगरपालिका व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्र - रु.3.00 लाख
- शासनाच्या अन्य गृहनिर्माण योजनेव्दारे घराचा लाभ घेतलेला नसावा.

**कोणती कागदपत्रे जोडायची :-**

- 7/12 चा उतारा, मालमत्ता नोंदपत्र (प्रॉपर्टी रजिस्टर्ड कार्ड) ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.
- घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत दरपत्रक या कागदपत्रांपैकी एक.
- सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत
- सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला
- अतिरिक्त दाखले : खाली नमूद केलेली कागदपत्रे/दाखले पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतील :-
    - दिनांक 1.1.1995 च्या किंवा मतदार यादीतील नांवाचा उतारा
    - निवडणूक मतदार ओळखपत्र
    - रेशनकार्ड
    - सरपंच/तलाठ्याचा दाखला
    - महानगरपालिका/नगरपालिकेतील मालमत्ता कर भरल्याच्या पावतीची प्रत

**अपेक्षित कालावधी :-**

- 1 महिना

------*****------

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना-टप्पा 1

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- संबंधित प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बाल विकास सेवा योजना

**कायदे/नियम/शासन निर्णय :-**

- शासन निर्णय दिनांक 18.11.2015, दि.02.08.2016 व दि.05.08.2016.

**थोडक्यात कार्यपद्धती :-**

- या योजनेंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत तसेच स्तनदा मातांना पाहिले सहा महिने एक वेळ दिला जातो. एक वेळच्या पुर्ण आहारामध्ये- चपाती/भाकरी, भात, कडधान्ये-डाळ, सोया दुध (साखरेसह), शेगंदाणा लाडू, (साखरेसह), अंडी/ केळी/नाचणी हलवा, फळे, हिरव्या पालेभाज्या, खाद्यतेल, गुळ/साखर, आयोडीनयुक्त मीठ, मसाला इत्यादिंचा समावेश असतो.

**पात्रता :-**

- अंगणवाडी/ मिनी अंगणवाडीकरीता क्षेत्रातील नोंदणी झालेल्या गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व्यतिरिक्त इतर ठिकाणाहून त्या अंगणवाडी क्षेत्रात आलेल्या गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांनाही या योजनेचा लाभ देण्यात येतो.

------*****------

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे .अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-2

**अंमलबजावणी यंत्रणा :-**

- संबंधित प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बाल विकास सेवा योजना

**कायदे/नियम/शासन निर्णय :-**

- शासन निर्णय क्र.आविवि-2016/प्र.क्र.83/का.08 ,दिनांक05 /08/2016

**थोडक्यात कार्यपद्धती :-**

- अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील **7 महिने ते 6 वर्ष** वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी/स्थानिक फळे इत्यादीसह अतिरिक्त आहार पुरविण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-2 सुरू करण्यात आला आहे.याअंतर्गत 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील सर्व बालकांना **आठवडयातून 4 वेळा** प्रति दिन शाकाहारामध्ये 2 केळी व मांसाहारामध्ये एक उकडलेले अंडे असे महिन्यातून 16 दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येतो.

**पात्रता :-**

- अंगणवाडी/ मिनी अंगणवाडीकरीता क्षेत्रातील नोंदणी झालेल्या बालकांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

------*****------

# पर्यावरण विभाग

- राज्य नदी संवर्धन योजना.

# राज्य नदी संवर्धन योजना

**उद्देश :-**

- नागरी सांडपाण्यामुळे होणारे नद्यांचे प्रदूषण रोखणे व राज्यातील जलस्त्रोत अबाधित ठेवणे व त्यांचे संवर्धन करणे.

**योजनेचे निकष :-**

- ही योजना नदी काठावरील महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा व 15000 वरील लोकसंख्या असलेली नदीकाठावरील गावे इत्यादी ठिकाणी लागू आहेत.
- शहरे/गावांचा समावेश त्या पट्ट्यातील प्रदूषणाच्या आधारे निश्चित करण्यात येईल.
- नदीकाठावरील अतिप्रदूषित पट्ट्यातील धार्मिक, ऐतिहासिक, व्यावसायिक व पर्यटनदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणांना प्राधान्य देण्यात येईल.

**योजनेअंतर्गत समाविष्ट कामे :-**

- शहरातून/गावातून निघणारे सांडपाणी नदीत ज्या ठिकाणी सोडले जाते तेथून गोळा करणे, अडविणे, वळविणे व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेपर्यंत पोहचविणे.
- योग्य तंत्रज्ञानावर आधारित सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणे.
- प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुर्नवापर व पुर्नचक्र होण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारणे.
- नदीच्या जवळील भागात कमी किंमतीची स्वच्छता गृहे बांधणे, त्यामधून निघणारे सांडपाणी मलशुध्दिकरण यंत्रणेस जोडणे व प्रक्रिया करणे.
- शास्त्रिय पद्धतीने नागरी घनकचरा व्यवस्थापन व विल्हेवाट, अपारंपारिक ऊर्जा निर्मिती व वापर इत्यादी कामे लोकसहभागातून करणे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी :-**

- योजनेच्या यशस्वीतेसाठी व या योजनेत पात्र होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या एकूण वार्षिक अर्थसंकल्पापैकी 30 % निधी पर्यावारण पायाभूत सुविधा विकसीत करण्याकरीता प्रत्येक वर्षी राखून ठेवणे आवश्यक असेल.
- या योजनेंतर्गत महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामीण क्षेत्रातील सादर करावयाच्या प्रकल्पांचे तांत्रिक मूल्यांकन महाराष्ट्र जीवन प्रधिकरन किंवा सक्षम प्राधिकृत संस्थेव्दारे करुन घेण्यात यावे.

**निधी :-**

- राज्य हिस्सा 80 % व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था 20 %.

------*****------

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

- प्रधानमंत्री ग्रामीण डिजीटल साक्षरता अभियान.
- उन्नत भारत अभियान.

# प्रधानमंत्री ग्रामीण डिजीटल साक्षरता अभियान

**सुरूवात :-**

- 2016-17.

**उद्देश :-**

- प्रत्येक कुटुंबातील किमान 1 व्यक्ती डिजीटल साक्षर करणे.

**योजनेचे स्वरुप :-**

- 14 ते 60 वर्षे वयोगटातील ग्रामीण व्यक्तीना 20 तासांचे (किमान 10 दिवस व कमाल 30 दिवस) डिजीटल प्रशिक्षण मोफत दिले जाते.
- हे प्रशिक्षण घेतल्यास मोबाईल हाताळणे, डिजीटल आर्थिक व्यवहार करणे, इंटरनेट हाताळणे, ई-मेल वाचणे, पाठविणे इत्यादी जमायला लागते.

**योजनेच ध्येय :-**

- 6 कोटी ग्रामीण लोकांना 2018-19 पर्यंत डिजीटल साक्षर करणे.

**आर्थिक तरतूद :-**

- योजनेच्या 2016-17 ते 2018-19 या लक्षित कालावधीसाठी 2351 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

------*****------

# उन्नत भारत अभियान

**उन्नत भारत अभियान**

**सुरूवात :-**

- 11 नोव्हेंबर, 2014.

**उद्देश :-**

- देशातील सर्व उच्च शिक्षण संस्था स्थानिक समुदायाशी जोडल्या जावून त्यांना विकासासाठी आवश्यक असणारी तंत्रज्ञाने पुरविता यावीत.

**योजनेचे स्वरुप :-**

- या योजनेअंतर्गत आतापर्यंत 132 खेडे व 16 उच्च शिक्षण संस्था यांच्यात समन्वय घडवून आणण्यात आला आहे.

**योजनेची उद्दिष्टे :-**

- ग्रामीण भारताची गरज विचारात घेवून उच्च शिक्षण संस्थामध्ये संस्थात्मक क्षमता उभारणे.

- विज्ञान, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यवस्थापन शिक्षणात अग्रेसर असणाऱ्या उच्च शिक्षण संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण भारतासाठी व्यावसायिक आदाने पुरविणे.

------*****------

# महिला व बाल विकास विभाग

- एकात्मिक बाल संरक्षण योजना.
- तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सशक्तीकरण कार्यक्रम.
- माझी कन्या भाग्यश्री सुधारित योजना.
- नवसंजीवनी योजना.
- सुधारित मनोधैर्य योजना.
- एकात्मिक बाल विकास प्रकल्प.

# एकात्मिक बाल संरक्षण योजना

**सुरवात** :-

- 2009-10.

**उद्देश** :-

- प्रतिकूल परिस्थितीतील तसेच असुरक्षित बालकांना सुरक्षित वातावरण प्रदान करणे.

**स्वरुप** :-

- या योजनेची 4 तत्त्वे आहेत.
    - **प्रतिबंध** – बालमजुरी, शोषण, व्यापार, बालविवाह, बालहत्या, भ्रूणहत्या, अपंगत्व, गंभीर आजारांपासून प्रतिबंध करणे.
    - **संरक्षण** – गंभीर आजार, शोषण, लैंगिक छळ, गुन्हेगारीपासून संरक्षण करणे.
    - **जाणीव** – बालकांच्या हक्कांची, सुरक्षेची जाणीव समाजात निर्माण करणे.
    - **संशोधन** – बालसरंक्षणासाठी उपाययोजना राबविणे, childine सारख्या हेल्पलाईन चालविणे इत्यादी

**योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवा** :-

- बालकांसाठी बालगृहे उभारणे
- child helpline व्दारे तात्काळ सुविधा पुरविणे.
- बालकांच्या संगोपनासाठी व संरक्षणासाठी आश्रयस्थाने उभारणे.
- कुटुंब आधारीत गैरसंस्थात्मक सेवा केंद्रे उभारणे.
- मोठ्या मुलांना व्यावसायिक शिक्षण देणे, समुपदेशन करणे व रोजगार मिळवून देण्यास मदत करणे.
- बालकांना आर्थिक मदत करणे.

------*****------

# तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सशक्तीकरण कार्यक्रम

**सुरवात** :-

- जुलै 2007 पासून 8 वर्षे कालावधीसाठी (जुलै 2015 पर्यंत)
- महिला विकास व आर्थिक महामंडळाने IFAD कडील आर्थिक मदतीतून तेजस्विनी योजना राबविली.
- 2016-17 पासून योजनेचा पुढील टप्पा सुरु झाला आहे .

**उद्देश** :-

- महिलांचे उत्पन्न, परिस्थिती, सहभाग, राहणीमान यांच्यात सुधारणा घडवून आणणे.

**उद्दिष्टे** :-

- सशक्त व शाश्वत स्वयंसहाय्यता गट व संस्था उभारणे,
- सूक्ष्म वित्त सहाय्य पुरविणे.
- जीवनोन्नतीच्या नवीन व सुधारीत संधी निर्माण करणे, कार्यात्मक शिक्षण, मूलभूत बचत व स्थानिक प्रशासनात सहभाग मिळवून देणे.

**योजनेचे घटक** :-

- मूलस्तरावर संस्थात्मक बांधणी,
- सूक्ष्म वित्त सेवा.
- जीवनोन्नती व उपक्रम विकास.
- महिला सशक्तीकरण.
- सामाजिक समता, कार्यक्रम व्यवस्थापन.

**योजनेचे लक्ष्यगट** :-

- दारिद्रय रेषेखालील कुटुंबामधील, अनुसूचित जाती व जमातींमधील स्त्रीप्रमुख, महिला व देवदासी आहेत.

------*****------

# माझी कन्या भाग्यश्री सुधारित योजना

**सुरूवात :-**

- 1 ऑगस्ट, 2017 .
- 1 जानेवारी, 2014 ला राज्यात सुरु झालेल्या सुकन्या योजनेचे रुपांतर 8 मार्च, 2015 ला माझी कन्या भाग्यश्री या योजनेमध्ये करण्यात आले. आता या योजनेचे नाव माझी कन्या भाग्यश्री सुधारित योजना असे करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे :-**

- मुलींचा जन्मदर वाढविणे.
- लिंग निवडीस प्रतिबंध करणे.
- मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे.
- मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे.

**जुन्या व नव्या योजनेचे स्वरुप :-**

| **योजनेचे नाव** | **माझी कन्या भाग्यश्री** | **माझी कन्या भाग्यश्री सुधारित** |
|---|---|---|
| **लागू** | 1 एप्रिल, 2016 | 1 ऑगस्ट, 2017 |
| **पात्र कुटूंब** | केवळ 1 किंवा 2 मुली असलेले दारिद्रय रेषेखालील कुटूंब | केवळ 1 किंवा 2 मुली असलेले दारिद्रय रेषेखालील तसेच दारिद्रय रेषेवरील कुटूंब (ज्यांचे उत्पन्न 7.5 लाख रु. च्या आत आहे.) |
| **ठेव रक्कम** | 21,200/- | 50,000/- |
| **लाभ** | 18 व्या वर्षी 1 लाख | दर 6 वर्षांनी व्याज व 18 व्या वर्षी मुद्दल |

**लाभार्थी पात्रतेच्या अटी :-**

- मुलीचे वय 18 वर्षे असणे गरजेचे आहे.
- मुलगी 10 वी परीक्षा उत्तीर्ण हवी.
- मुलगी अविवाहित असावी.
- लाभार्थी मुलीचे वडील महाराष्ट्राचे मूळ रहिवासी असणे आवश्यक.

------*****------

# नवसंजीवनी योजना

**शासन निर्णय क्र. :- टिएसपी-1095/प्र.क्र.6/कार्या-6, दि. 22 जून, 1995.**

**उद्‌देश :-**

- आदिवासी लोकांसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा इत्यादीसारख्या निरनिराळ्या योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करणे व त्यांना बळकटी देणे.
- माता मृत्यूदर व शिशूमृत्यू दर कमी करणे हा मुख्य उद्‌देश आहे.

**स्वरुप :-**

- या योजनेअंतर्गत 173 फिरती वैद्‌यकीय पथके तयार करण्यात आली आहेत.
- या पथकांमार्फत कुपोषित व आजारी बालकांना तसेच मातांना घरपोच आरोग्य सेवा पुरविली जाते. आवश्यकता भासल्यास त्यांना जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल केले जाते.

**उपयोजना :-**

- नवसंजीवनी योजनेअंतर्गत खालील 4 उपयोजना राबविल्या जातात :-
    - **मातृत्व अनुदान योजना** –

      गरोदर मातांना रुग्णालयात प्रसुतीपूर्व तपासणी करण्यास जाण्यासाठी रु. 400/- रोख व रु. 400/- ची औषधे पुरविली जातात.
    - **दाई सभा.**
    - **मान्सूनपूर्व उपक्रम.**
    - **अन्न व बुडीत मजूरी.**

------*****------

# सुधारित मनोधैर्य योजना

**शासन निर्णय क्र. :- संकीर्ण-2017/प्र.क्र.255/कार्या-2, दि. 30 डिसेंबर, 2017.**

**उद्देश :-**

- बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांचे पुनर्वसन करणे.

**स्वरुप :-**

- **या योजनेअंतर्गत पीडितांना अर्थसहाय्य मंजूर करण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहे:-**
  - घटनेसंदर्भातील एफ.आय.आर. ची प्रत व अन्य कागदपत्रे संबंधित तपास अधिकारी यांच्याकडून जिल्हा विधि सेवा प्राधिकरण व जिल्हा महिला विकास अधिकारी यांना 1 तासाच्या आत पाठविण्यात येतील.
  - कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 7 दिवसांच्या आत पीडितांस रु. 30,000/-इतकी रक्कम वैद्यकीय उपचारासाठी तात्काळ मदत म्हणून मंजूर करण्यात येते.
  - तद्नंतर प्रकरणाची सखोल तपासणी करुन जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थित राज्य विधि सेवा प्राधिकरण 120 दिवसाच्या आत उर्वरित अर्थसहाय्याची रक्कम संबंधित पीडितास मंजूर करेल.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी :-**

- बलात्कार- भारतीय दंड संहितेच्या कलम 375 आणि 376, 376 (2), 376 (a), 376(b), 376 (c), 376 (d) अन्वये दाखल गुन्हे.
- बालकांवरील लैंगिक अत्याचार- लैंगिक हिंसाचारापासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO Act) 2013 अन्वये दाखल गुन्हे.
- ॲसिड हल्ला - भारतीय दंड संहितेच्या कलम 326 (a) आणि 326 (b) अन्वये दाखल गुन्हे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, 1956 अंतर्गत पोलीस धाडीत अटक करण्यात आलेल्या 18 वर्षांखालील मुली.

**योजनेअंतर्गत मिळणारे लाभ :-**

- उपरोक्त नमूद पीडितांना तीव्रता बघून रु. 3 लाख ते 10 लाख एवढी नुकसान भरपाई दिली जाते.

------*****------

# एकात्मिक बाल विकास प्रकल्प

**सुरुवात** :-

- 2 ऑक्टोबर, 1975.

**उद्देश** :-

- 0 ते 6 वर्षे वयोगआंतील बालकांचे पोषण व आरोग्य सुधारणे.
- बालकांच्या मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पया रचणे.
- मृत्यूदर, आजाराचे प्रमाण, कुपोषण कमी करणे.
- बालकांचया विकासासाठी विविध मंत्रालयांच्या धोरणांमध्ये व अंमलबजावणीमध्ये प्रभावी समन्वयन घडवून आणणे.
- बालकांच्या आरोग्य व पोषणासाठी आवश्यक पोषण व आरोग्य शिक्षण देऊन माताना सक्षम बनविणे.

| योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवा :- | | | | |
|---|---|---|---|---|
| **उपयोजना** | **लक्ष्य** | **कोण राबविते** | **उद्‌देश** | **घटक** |
| पूरक पोषण | 6 वर्षाआतील बालक, गरोदर व | अंगणवाडी सेविका व मदतनीस | पोषण पूरवणे, जीवनसत्व अ व लोहाची कमतरता | • वर्षातून 300 दिवस पोषण पुरविले जाते. |
| शालेयपूर्व शिक्षण | 3 ते 6 वर्षातील बालक | अंगणवाडी सेविका | प्राथमिक शिक्षणसाठी आवश्यक | • दिवसातून 3 तास खेळीमेळीचे शिक्षण देऊन बालकांच्या |
| पोषण व आरोग्य | गरोदर व स्तनदा | वैद्यकीय अधिकारी, | 15 ते 45 वर्षे वयोगटातील | • गरोदर व स्तनदा मातांना आरोग्य, |
| लसीकरण | 6 वर्षाआतील बालक, | वैद्यकीय अधिकारी, नर्स | गोवर, पोलिओ, क्षयरोग, धनुर्वात विरुद्ध | • 0 ते 6 वयातील बालकांचे संपूर्ण लसीकरण |
| आरोग्य तपासणी | 6 वर्षाआतील बालक, गरोदर व स्तनदा माता | वैद्यकीय अधिकारी, नर्स, अंगणवाडी सेविका | योग्य व वेळीच औषधोपचार मिळणे | • कुपोषित, आजारी बालकांची तसेच गरोदर व स्तनदा मातांची नियमित तपासणी केली जाते |
| संदर्भसेवा | 6 वर्षाआतील बालक, | वैद्यकीय अधिकारी, | औषधोपचार व संदर्भसेवा मिळणे | • आरोग्य तपासणी केलेल्या |

# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

- प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना.
- प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA)

# प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना.

**सुरूवात :-**

- 15 जुलै, 2015.
- 2016 ते 2020 या काळावधीसाठी योजनेचा दुसरा टप्पा सुरु झाला आहे. या टप्प्याला PMKVY2.0 म्हणतात.

**उद्देश :-**

- तरुणांना उद्योगपूरक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे व कौशल्य प्रमाणपत्र देणे. अकुशल तरुणांना कुशल बनविणे.
- अर्धकुशल किंवा कुशल व्यक्ती ज्यांना प्रमाणपत्र हवे आहे त्यांनाही कौशल्याचे पुनःप्रशिक्षण देऊन कौशल्य प्रमाणपत्रे देण्यात येते.
- पुढील 4 वर्षांत 10 दशलक्ष तरुणांना लाभ मिळवून देणे.
- प्रस्तवित खर्च – 2016 ते 2020 योजनेसाठी 12,000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- **प्रधानमंत्री कुशल केंद्र (PMKVY) –**
  - PMKVY अंतर्गत देशातील प्रत्येक जिल्हयामध्ये किमान एक मॉडेल प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे ठरले होते. या संस्थांना प्रधानमंत्री कुशल केंद्र असे संबोधण्यात आले.
  - स्पर्धात्मक, गुणवत्तापूर्ण आणि मागणी आधारीत प्रशिक्षण देणे या केंद्र उभारणीमागील उद्देश आहे.
  - जिल्हा उद्योग केंद्राप्रमाणे प्रधानमंत्री कुशल केंद्र हे जिल्हयातील कौशल्य विकासासाठी मध्यवर्ती यंत्रणा म्हणून काम करते.

**योजनेचे घटक :-**

- लघुमुदत - प्रशिक्षण 150 ते 300 तासांचे कौशल्य प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्र दिले जाते.
- आधी शिकलेल्यांना प्रमाणपत्र – कौशल्याचे शिक्षण घेतलेल्या किंवा आधीच कुशल ज्ञान असलेल्यांना प्रमाणपत्र दिले जाते.
- विशेष प्रकल्प सूचना – शासकीय संस्था, महामंडळ किंवा उद्योगांना विशेष कुशल प्रशिक्षणाची गरज असल्यास त्याची पूर्तता केली जाते.
- कुशल व रोजगार मेळावा – दर 6 महिन्यांनी असा मेळावा आयोजित केली जातो.
- रोजगार सूचना – कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगार संधी यांचा मेळ घातला जातो.

- देखरेख सूचना – उच्च प्रतीच्या व मानकाच्या कौशल्याचे प्रशिक्षण हा योजनेचा महत्त्वाचा भागा आहे.

------*****------

## प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA).

**सुरूवात :-**

- 18 मार्च, 2015.

**ध्येय :-**

- कुशल महाराष्ट्र, रोजगारक्षम महाराष्ट्र.

**उद्देश :-**

- 15 ते 45 वर्षे वयोगटातील तरुणांना अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill development), कौशल्य वर्धन (up-skilling) व पुनःकौशल्य विकास (re-skilling)करणे.
- कौशल्य प्रशिक्षित तरुणांना रोजगारक्षम करुन त्यापैकी किमान 75 टक्के तरुणांना प्रत्यक्ष रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देणे.
- व्यावर्तित गटांच्या (महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अपंग, अल्पसंख्याक) समावेशनावर अधिक भर देणे.
- या पध्दतीने तरुणांना रोजगार व व्यावसायिकतेच्या संधी उपलब्ध करुन देणे.

**स्वरुप :-**

- **राष्ट्रीय पातळीवर रोजगाराच्या अधिकाधिक संधी असलेली 11 क्षेत्रे कोशल्य विकासासाठी प्राधान्य क्षेत्रे म्हणून निवडण्यात आली आहेत :-**
  - बांधकाम, उत्पादन, वस्त्रोद्योग, वाहन, आदरातिथ्य, आरोग्य देखभाल, बँक व विमा, संघटित किरकोळ व्यापार, औषध, माहिती तंत्रज्ञान आणि कृषी प्रक्रिया.
  - वरील योजनेन्वये या क्षेत्रांसाठी तसेच इतरही पूरक क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण दिले जाते.

**पूरक संस्था :-**

- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था **(MSSDS)Maharashtra State Skill Development Society** या संस्थेकडे योजना राबविण्याचे काम सोपविण्यात आले आहे. योजनेसाठी ती एक नोडल एजन्सी आहे.

------*****------

# पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

- महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजना.
- दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.
- भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना.

# महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजना

**शासन निर्णय क्र वृकमा 2012/प्र.क्र.117/सां.का. 4, दि. 7 फेब्रुवारी, 2014.**

**उद्देश :-**

- राज्यातील मान्यवर, नावाजलेल्या वृध्द साहित्यीक व कलावंत यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून व वृध्दापकाळात त्यांना मदत होण्यासाठी मानधन देणे.

**लाभार्थ्यांची पात्रता :-**

- कला आणि वाड्.मय क्षेत्रात ज्यांनी किमान 15 ते 20 वर्षे इतक्या प्रदीर्घ काळासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे अशा व्यक्ती.
- ज्या स्त्री/ पुरुष कलाकाराचे व साहित्यिकांचे वय 50 वर्षापेक्षा जास्त आहे, अशा व्यक्ती.
- साहित्यिक व कलावंत यांच्या निधनानंतर त्यांच्या विधवा पत्नी/विधुर पती यांना तहहयात मानधन मिळेल.
- जे साहित्यिक व कलावंत अर्धांगवायू, क्षय, कर्करोग, कुष्ठरोग या रोगांनी आजारी असतील तसेच ज्यांना 40 टक्के पेक्षा जास्त शारीरिक व्यंग असेल किंवा अपघाताने 40 टक्के पेक्षा जास्त अपंगत्व आले असेल व त्यामुळे ते स्वत:चा व्यवसाय करु शकत नसतील, असे साहित्यिक व कलावंत यांच्यासाठी वयाची अट शिथिल करण्यात येईल.
- वयाने वरिष्ठ असणाऱ्या व विधवा / परितक्त्या वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.
- ज्या साहित्यिक व कलावंतांचे सर्व मार्गाने मिळून वार्षिक उत्पन्न रु. 48,000/- पेक्षा जास्त नाही.

**योजनेअंतर्गत मिळणारे मानधन :-**

| अ.क्र. | वर्गवारी | निकष | वार्षिक मानधनाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | अ वर्ग | राष्ट्रीय कलावंत | रु. 25,200/- |
| 2. | ब वर्ग | राज्य कलावंत | रु. 21,600/- |
| 3. | क वर्ग | स्थानिक कलावंत | रु. 18,000/- |

**योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:-**

- संबंधित जिल्हा परिषदेचे अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि समाजकल्याण अधिकारी.

------*****------

# दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.

**शासन निर्णय क्र मचिअ-2012/प्र.क्र.141/सां.का. 1, दि. 30 ऑक्टोबर, 2013.**

**उद्देश :-**

- मराठी चित्रपट व्यवसायाचा विकास होण्यासाठी व मराठी चित्रपट निर्मितीला चालना मिळण्यासाठी निर्मात्यांना अर्थसहाय्य देणे.

**अर्थसहाय्य पात्रतेचे निकष :-**

- अर्थसहाय्यासाठी अर्ज केलेला प्रत्येक मराठी चित्रपट भारतीय सेन्सॉर बोर्डाने प्रमाणित करणे बंधनकारक आहे.
- इतर भाषेतील रिमेक, डब किंवा सबटायटल मराठी चित्रपट अर्थसहाय्याकरीता अपात्र ठरतील.
- अर्जदार निर्मात्याने व निर्मिती संस्थेने अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे सदस्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- चित्रपट निर्मात्याचा फक्त एक चित्रपट दोन वर्षातून एकदाच अर्थसहाय्यास पात्र राहील. सदर दोन वर्ष अंतराची अट महाराष्ट्र राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटांच्या बाबतीत लागू राहणार नाही.
- राज्यात एकूण 10 आठवडे चित्रपट प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.
- चित्रपट निर्मात्याचे महाराष्ट्रात किमान 15 वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.

**योजनेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | दर्जा | अर्थसहाय्य |
|---|---|---|
| 1 | अ | 40,00,000/- किंवा चित्रपट निर्मितीचा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते. |
| 2 | ब | 30,00,000/- किंवा चित्रपट निर्मितीचा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते. |

**योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:-**

- सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ.

------*****------

# भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना
## (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग)

शा/2010 रासांधो :.क्र.नि.शासंप्रो /2011प्र 30 दिनांक ,4.का.सां/306.क्र.
.2013,जानेवारी

**योजनेचा उद्देश** राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून राज्य सांस्कृतिक धोरण : या धोरणातील निर्णयानुसार शास्त्रीय संगीतास .जाहिर केले आहे 2010 प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी यांच्या नावे शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना सुरु करताना पंडित भीमसेनजोशी यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन शास्त्रीय गायन व वादन या दोन क्षेत्रांचा या योजनेअंतर्गत विचार करण्यात आला आहे .

**भारतरत्न पं**भीमसेन जोशी संगीत .भारतरत्न पं : **भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना**. या .प्रोत्साहन योजनेअंतर्गत ही योजना सुरु करण्यात आलेली आहे योजनंअंतर्गत शास्त्रीय संगीतात शिक्षण घेणाऱ्या हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्याच्या कलेच्या शिक्षणास मदत करण्यात येणार आहेभारतीय संगीतात पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी . शास्त्री .या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येतेय गायनाचे शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती 12 अशा एकूण 06 व वादनाचे शिक्षण घेणारे 06 2 प्रमाणे -/5000.ही शिष्यवृत्ती प्रती विद्यार्थी दरमहा रु.देण्यात येते या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज .वर्षांसाठी मंजूर करण्यात येते मागविण्यात येतातपात्र विद्यार्थ्यांची तज्ञ समितीकडून परीक्षा घेऊन . त्यामधील गुणवत्तेनुसार व आर्थिक परिस्थितीनुसार योग्य विद्यार्थ्यांची निवड .एवढा आहे -/16,68,000.या उपक्रमाचा एकूण खर्च रु .करण्यात येते

**भारतरत्न पं**या उपक : **भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार**.्रमांतर्गत भारतरत्न पं (गायन व वादन) भीमसेन जोशी यांच्या नावे शस्त्रीय संगीतात. प्रदीर्घकाळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलावंतास जीवन गौरव पुरस्कार 5.00.या पुरस्काराची रक्कम रु .देऊन गौरविण्यात येतेलाख इतकी आहे 04.हा पुरस्कार सोहळा दरवर्षी दि .फेब्रुवारी या त्यांच्या जयंतीदिनी अथवा दि 24.जानेवारी या त्यांच्या स्मृतीदिनी आयोजित करण्यात येतो . 7.00.या उपक्रमाचा एकूण खर्च रुलाख इतका आहे .

*********

# अल्पसंख्यांक विकास विभाग

- डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना.
- धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहूल शाळा/महाविद्यालये/औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना.
- उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये

# डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

**डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना**

**शासन निर्णय :- अविवि-2010/प्र.क्र.152/10/कार्या.6, दि. 11 ऑक्टोबर, 2013**

**उद्देश :-**

- मदरशामध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबर विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व ऊर्दू विषयांचे शिक्षण देणे.
- मुख्य प्रवाहातील शाळेंमध्ये प्रवेश घेणाऱ्या इयत्ता 9 वी ते 12 वी तील तसेच आयटीआय मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे .
- मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देणे.

**योजनेचे स्वरुप :-**

या योजनेअंतर्गत खालील तीन प्रमुख बाबींसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल:-

**I. मदरसांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान :-**

राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत मदरशांना खालील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त 2 लाख या मर्यादेपर्यंत अनुदान दिले जाईल.

1. इमारतीचे नुतणीकरण 2. पेयजल 3. प्रसाधन गृह उभारणी 4. फर्निचर
5. इन्व्हर्टर 6. संगणक 7. प्रयोगशाळा साहित्य इत्यादी.

**II. मदरसांमध्ये नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांचे मानधन:-**

- धार्मिक शिक्षणाव्यतिरिक्त इतर विषयांचे शिक्षण देण्यासाठी नेमलेल्या जास्तीत जास्त 3 डी.एड अथवा बी.एड शिक्षकांचे मानधन अल्पसंख्याक विभागामार्फत देण्यात येईल.
- कमीत कमी 20 विद्यार्थी असतील अशा मदरशांना यांचा लाभ देण्यात येईल.
- विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण 40:1 असे राहील.

**III. मदरशांमधील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :-**

- मानधनाचे स्वरुप खालीलप्रमाणे :-

| **शैक्षणिक पात्रता** | **मानधन** |
|---|---|
| इयत्ता 9 वी व 10 वी | रु. 4000/- प्रती वर्षी |
| इयत्ता 11 वी व 12 वी आणि आय.टी.आय. | रु. 5000/ प्रती वर्षी |

- मानधन मिळण्यासाठी विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती किमान 75% असणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्तीचा लाभ सुरवातीला राज्यातील 1000 विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

**योजनेच्या अटी व शर्ती** :-

- सदर योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरशांना दिला जाईल.
- प्रथम वर्षी सदर योजनेचा लाभ 200 मदरशांना दिला जाईल. यापेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्यास नोंदणी करुन 3 वर्ष पूर्ण झालेले मरदसे आणि अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यातील व तालुक्यातील मदरशांना प्राधान्य याप्रमाणे देण्यात येईल.
- ज्या मदरशांना Scheme for Providing Quality Education in Madarsa (SPQEM) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत लाभ मिळाला आहे अशा मदरशांना ही योजना अनुज्ञेय राहणार नाही.
- मदरशांमध्ये विज्ञान/गणित/समाजशास्त्र/हिंदी/मराठी व इंग्रजी इ. विषयांचा अभ्यासक्रम राज्यशासनाच्या अन्य शाळांप्रमाणेच राहील. तसेच मदरशांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रतिदिन 5 तासिका याप्रमाणे कामाचे तास निश्चित करण्यात येतील.
- मदरसामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे दर तीन महिन्यानी त्यांच्यासाठी नेमलेले शिक्षक मूल्यमापन करतील यामध्ये विद्यार्थ्यांची लेखी/तोंडी परीक्षा घेण्यात येईल व याबाबतचा अहवाल प्रत्येक मे महिन्यामध्ये शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर करतील.
- या योजनेंतर्गत अनुदान देण्यात येणाऱ्या मदरशांमधील धार्मिक शिक्षण किंवा दैनंदिन प्रशासन यामध्ये शासनाचा हस्तक्षेप असणार नाही.

------*****------

## धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शाळा/महाविद्यालये/औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना

**शासन निर्णय :- अविवि-2015/प्र.क्र.80/15/कार्या.6, दि. 7 ऑक्टोबर, 2015.**

**उद्देश :-**

- धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शासनमान्य शैक्षणिक संस्थांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देवून शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावणे.
- शासनमान्य शाळांना पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी वार्षिक कमाल रु. 2 लाख एवढ्या रकमेच्या मर्यादेपर्यंत अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन देणे.

**योजनेचे स्वरुप :-**

- **अनुदानासाठी पात्रता :-**

I. शासन मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानीत / कायम विनाअनुदानीत खाजगी अल्पसंख्याक-

1 शाळा
2 कनिष्ठ महाविद्यालय
3 औद्योगिक प्रशिक्षण संस्था
4 नगरपालिका/नगरपरिषद शाळा
5 अपंग शाळा

- **अनुदान देय असलेल्या पायाभूत सोयीसुविधा :-**

1. शाळा इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी 2. पेयजल 3. ग्रंथालय 4. प्रयोगशाळा 5. संगणक कक्ष 6. प्रसाधन गृह 7. फर्निचर 8. झेरॉक्स मशिन 9. अध्ययनाची साधने.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

- संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 70% व अपंग शाळांमध्ये 50% विद्यार्थी हे अल्पसंख्याक समूहातील असणे अनिवार्य आहे.
- सदरील योजनेअंतर्गत पात्र होण्यासाठी संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना शासनमान्यता मिळालेली असणे आवश्यक आहे.
- अपंग शाळांच्या बाबतीत समाजकल्याण संचलनालयामार्फत प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता असणे आवश्यक आहे.

## उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**शासन निर्णय :- अविवि-2011/प्र.क्र.44/11/कार्या.6, दि. 14 ऑक्टोबर, 2011.**

**उद्देश :-**

- राज्यातील मुस्लिम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख व पारसी या समाजातील तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या होतकरु व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

**योजनेचे स्वरुप :-**

**अ. योजनेचे लाभार्थी -**

- महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्या अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता ही योजना लागू असेल.
- **या योजनेचा लाभ**
  - वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम तसेच इतर तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात पदविका, पदवी, पदव्युत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या

**व**

  - 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम)

**अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल.**

| **अ.क्र.** | **अल्पसंख्यांक लोकसमूह** | **उपलब्ध शिष्यवृत्तींची संख्या** | | |
|---|---|---|---|---|
| | | **वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम** | **तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम** | **12 वी नंतरचे अभ्यासक्रम** |
| 1 | मुस्लिम | 1363 | 8175 | 1090 |
| 2 | बौध्द | 762 | 4575 | 610 |
| 3 | ख्रिश्चन | 150 | 900 | 120 |
| 4 | जैन | 175 | 1050 | 140 |
| 5 | शीख | 25 | 150 | 20 |
| 6 | पारसी | 25 | 150 | 20 |
| **एकूण** | | **2500** | **15000** | **2000** |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

- मागील शैक्षणिक वर्ष ज्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पूर्ण करुन पुढील वर्षात प्रवेश घेतला आहे असे विद्यार्थी, तसेच चालू शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती योजना लागू असेल.
- मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रमांमध्ये सामायिक प्रवेश चाचणीव्दारे (सीईटी) प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील.
- जे विद्यार्थी सामायिक प्रवेश चाचणी (सीईटी) न देता उक्त अभ्यासक्रम शिकत असतील, ते विद्यार्थी देखील या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरु शकतील. तथापि, अशा विद्यार्थ्यांची निवड त्यांनी उच्च माध्यमिक/ पदवी परीक्षांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांनुसार गुणवत्तेवर आधारित राहील.
- संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु. 25,000/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येईल.
- संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याने माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.
- या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुंबांचे सर्व स्त्रोतांव्दारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. 2.50 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.
- या योजनेंतर्गत 30 टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखून ठेवण्यात येतील. एखाद्या अल्पसंख्याक समाजातील मुलींची संख्या लाभार्थीमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्याक समाजातील मुलांमधून शिष्यवृत्ती देण्यात यावी.

------*****------

# मराठी भाषा विभाग

- राजभाषा म्हणून मराठी भाषेचा प्रशासकीय कामकाजात व दुय्यम न्यायालयात वार करणे.
- केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी.
- केंद्रिय व राजय अधिनियम तसेच वैधानिक व इतर बाबींच्या मराठी-इंग्रजी अनुवादाबाबत.

## राजभाषा म्हणून मराठी भाषेचा प्रशासकीय कामकाजात व दुय्यम न्यायालयात वापर करणे

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम 1964,अन्वये दिनांक 1955,जानेवारी 26पासून महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपितील मराठी भाषेचा स्वीकार करण्यात आलेला असून महाराष्ट्र ,राजभाषा 2015,अधिनियम (सुधारणा) द्वारे च्या 1964 अधिनियमामध्ये महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असेल अशी सुधारणा करण्यात आलेली 1966,नियम (वर्जित प्रयोजने) महाराष्ट्र राजभाषा .आहेमध्ये नमूद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजनांकरीता मराठी भाषा वापरणे दि 01.मे 1966,पासून अनिवार्य करण्यात आले आहे 21.दि .जुलै 1998,पासून वर्जित प्रयोजने वगळून अन्य प्रयोजनांसाठी सर्व फौजदारी न्यायालयांची तसेच उच्च न्यायालयाला दुय्यम असलेल्याराज्यातील सर्व , दिवाणी न्यायालयांची भाषा मराठी असेल असे निर्धारित करण्यात आले आहेन्याय . व्यवहारात मराठीचा वापर वाढावा या करीता जिल्हा स्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्यात येणारे दावे मराठीतून दाखल करण्याबाबत परिपत्रकान्वये सूचना देण्यात 2005/12/09.उच्च न्यायालयानेही त्यांच्या दि.याबाबत मा .आलेल्या आहेतच्या परिपत्रकान्वये सर्व दुय्यम न्यायालयांना आपल्या स्तरावर टक्के कामकाज मराठीतून 50 .करण्याबाबत सूचना दिल्या आहेत

********

## केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी.

द ऑफिशियल लँग्वेज ॲक्ट 1963,अन्वये केंद्रिय कार्यालयीन कामकाजासाठीची भाषा ठरविण्यात आलेली आहेदि ऑफिशिय .ल लँग्वेज रिझोल्यूशन 1968,अन्वये देशातील विविध भागातील लोकांना केंद्रशासनाशी संवाद साधणे सोपे व्हावे यासाठी हिंदीइंग्रजी यासह , स्थानिक जनतेच्या भाषेचाही प्रशासकीय कामकाजात समावेश करण्याबाबतचे त्रिभाषा सुत्र केंद्रिय कार्यालयात भरा .प्रथमच स्विकारण्यात आलेवे लागणारे विविध अर्जांचे नमुने स्थानिक जनतेच्या सोयीसाठी प्रादेशिक भाषेत छापण्याच्या सूचना त्रिभाषा सूत्राच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या आहेतत्यांच्या ,त्रिभाषा सूत्राच्या अनुषंगाने सर्व केंद्र शासकीय कार्यालये . ,राष्ट्रीयीकृत बँका ,अखत्यारीतील कार्यालये महामंडळेसार्वजनिक उपक्रम यांना प्रादेशिक , ,सूचनाफलक ,नामफलक ,हिंदी व इंग्रजी अशा तिन्ही भाषेत वेगवेगळ्या अर्जाचे नमुने ,भाषा मराठी भाषा .लावण्याचे निर्देश वारंवार देण्यात आलेले आहेत.निर्देशफलक इ 2017,डिसेंबर 05 विभागाच्यादिनांकच्या परिपत्रकान्वये केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाची कार्यालयेसार्वजनिक ,महामंडळे ,रेल्वे ,विमा कंपन्या ,बँका , मध्ये ज्या बाबींमध्ये इंग्रजी व हिंदीबरोबरच प्रादेशिक भाषेचा वापर करावयाचा .उपक्रम इ

आहे त्या सर्व बाबी नमूद करुन त्यामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबतच्या सूचना एकत्रितरित्या देण्यात आलेल्या आहेत.

******

## केंद्रिय व राज्य अधिनियम तसेच वैधानिक व इतर बाबींच्या मराठी.इंग्रजी अनुवादाबाबत-

केंद्रिय अधिनियमांचा अनुवाद ते प्राधिकृत पाठ म्हणून पुस्तक स्वरुपात प्रसिध्द करण्यापर्यंतचे सर्व काम मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त भाषा संचालनालयामार्फत केले जातेतसेच महाराष्ट्र राज्य विधामंडळाकडून पारीत झालेल्या राज्य अधिनियमात नवीन . पुस्तक :सुधारणा समाविष्ट करणे व त्याचे अद्ययावतीकरण पुनर्मुद्रण करणे व अंतिमत तसेच वैधानिक स्वरुपाच्या क ,स्वरुपात प्रसिध्द करणोमकाजाचा मराठीइंग्रजी अनुवाद - .करण्याचे काम भाषा संचालनालय करते

********

# मृद व जलसंधारण विभाग

- आदर्शगाव संकल्प व प्रकल्प (मृद-5) योजना.

# आदर्शगाव संकल्प व प्रकल्प (मृद- 5) योजना

## आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजना

**शासन निर्णय :- आगायो-2013/प्र.क्र.162/जल-8, दि. 10 मार्च, 2015.**

**उद्देश :-**

- गावाचा सर्वांगीण विकास करणे.

**योजनेचे उद्दिष्ट्ये :-**

- लोकसहभागातून ग्रामविकास व त्यासाठी लोक कार्यक्रमात शासनाचा सहभाग.
- सत्तेचे विकेंद्रीकरण, गावांचा सर्वंकष व सर्वांगीण विकास
- सप्तसूत्रीची अंमलबजावणी (नसबंदी, नशाबंदी, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी आणि श्रमदान लोटाबंदी व बोअरवेल बंदी)

**लाभार्थी :-**

- गाव हा घटक असतो
- गाव हा घटक मानून गावाचा सर्वांगीण विकास केला जातो.

**पात्रता :-**

- **गाव निवडीचे निकष :-**
  - गावाचे एकूण क्षेत्रापैकी सर्व प्रकारचे मिळून 30 टक्केपेक्षा जास्त सिंचन नसावे.
  - गावाची लोकसंख्या 10000 पेक्षा जास्त नसावी.
  - गावाचे महसूली क्षेत्र 2500 हेक्टर पर्यंत असावे.
  - गट ग्रामपंचायत अंतर्गत स्वतंत्र वाडी अथवा वस्तीस सहभागी होता येईल.
  - ग्रामविकास निधी उभारुन तो चालविण्यासाठी ग्रामस्थांची तयारी आवश्यक.
  - सप्तसूत्रीचे (नसबंदी, नशाबंदी, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी आणि श्रमदान लोटाबंदी व बोअरवेल बंदी) पालन करण्याची ग्रामस्थांची तयारी आवश्यक आहे.
  - विविध ग्रामअभियानात उदा. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, निर्मलग्राम अभियान, तंटामुक्त गावे, संत तुकाराम वन ग्राम योजना पुरस्कार प्राप्त गावे व त्यामध्ये सातत्य.

**आवश्यक कागदपत्रे :-**

- गाव निवडीसाठी ग्रामसभेच्या ठरावानुसार प्रस्ताव.

**सेवा पुरविण्याची कालमर्यादा :-**

- 3 वर्षे.

**लाभार्थ्यांना अनुदान देण्याची पध्दत :-**

- गावासाठी निवडलेल्या प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेच्या त्रिसदस्यीय खात्यावर प्रत्यक्षात झालेल्या कामानुसार निधी वर्ग केला जातो. (जिल्हास्तरावरुन)

**योजनेची भविष्यातील नियोजन :-**

- प्रत्येक पंचवार्षिक मध्ये 100 गावे निवडीचे लक्ष्य पूर्ण करणे.

------*****------

# जलयुक्त शिवार अभियान

**शासन निर्णय :- जलअ 2014/प्र.क्र.203/जल-7, दि. 5 डिसेंबर, 2014.**

महाराष्ट्र राज्यातील पावसाची अनियमितता व पासातील खंड यांचा पिकांच्या वाढीच्या काळात होणारा दुष्परीणाम व त्यामुळे सतत टंचाई सदृश परिस्थिती निर्माण होउुन त्याचा मोठा परिणाम कृषि क्षेत्रावर होत आहे. राज्यात मागील चार दशकात कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर चढ-उतार दिसुन येत आहे. या परिस्थितीस मुख्यत्वेकरुन पाण्याची कमी उपलब्धता कारणीभूत आहे. राज्यात जवळ जवळ 80 टक्के क्षेत्र कोरडवाहू व 50 टक्के क्षेत्र अवर्षण प्रवण आहे. सन 2014-15 मध्ये 188 तालुक्यांमध्ये (2234 गावे) भूजल पातळीत 2 मीटरपेक्षा जास्त घअ झालेली आहे. तर 22 जिल्ह्यातंतील 19059 गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर झाली आहे.

शाश्वत शेतीसाठी पाण व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करुन देण्यासाठी जलसंधारणांतर्गत उपाययोजना करण्याच्या उद्देशाने जलयुक्त शिवार योजनेची संकल्पना पुढे आली. सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र 2019 हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवुन टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश :-**

- पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाचे शिवारातच अडविणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेती साठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, राजयातील सर्वांना पुरेशा पाण्याची शाश्वता, ग्रामीण भागत बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनर्जिवीकरण करुन पाणी पुरवठ्यात वाढ करणे, ीाूजल अधिनियम अंमलबजावणी, विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे, पाणी सावठवण क्षमता निर्माण करणे, अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची पाणी साठवण क्षमता पुन:स्थापित करणे/वाढविणे, त्यातील गाळ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे, वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देवून जनजागृती करणे, पाणी अडविणे-जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित करणे.

**निधीची उपलब्धता :-**

- राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविणेसाठी विविध योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

# केंद्रीय योजना

- दिनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान.

# दीनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**सुरुवात :-**

- जून, 2011.
- स्वर्णजयंती ग्रामीण स्वरोजगार योजनेची पुर्नरचना करुन हे अभियान सुरू करण्यात आले.
- या योजनेचे मूळ आपल्याला एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात सापडते.
- ही योजना पुढील योजनांच्या एकत्रिकरणातून अस्तित्वात आली आहे :-
    1 एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम.
    2 स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरुणांचे प्रशिक्षण
    3 ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालकांची विकास योजना
    4 दशलक्षी विहिर योजना
    5 स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

**उद्‌देश :-**

- ग्रामीण गरिबांच्या सशक्त संस्था उभारुन दारिद्रय कमी करणे
- या योजनेचा भर स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून गरिबांच्या सशक्त संस्था उभारण्यावर आहे.

**योजनेचे लाभ :-**

- ज्या गटांनी विविध पतसंस्थांकडून 7 % पेक्षा जास्त व्याजदराने कर्ज घेतले आहे त्यांना 7 % पेक्षा जास्तीचे व्याज भरण्यासाठी महत्तम 3 लाखांपर्यंत व्याज सबसिडी दिली जाते.

**खर्चाचा वाटा :-**

- केंद्र : राज्य यांचा खर्चाचा वाटा 60 : 40 असा आहे.

------*****------

# नगर विकास विभाग

- अमृत अभियान.

# अमृत अभियान

**शासन निर्णय क्र. – अमृत 2015/प्र.क्र.197/नवि-33, दि.** 13.10.2015.

**उद्देश** :-

- शहरातील प्रत्येक घरासाठी प्रचलित निकषानुसार पाणीपुरवठा करणे, शहाराच्या स्वच्छतेकरिता मलनिस्सारण, मलव्यवस्थापन व पर्जन्यजल ववाहिनीची व्यवस्था करणे, शहरांमध्ये मोकळ्या जागा, अरित क्षेत्रे, शहरातील परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारण करुन प्रदूषण कमी करणे व इतर सुविधांची निर्मिती करणे इ.

**उद्दिष्ट** :-

- शहरातील रहिवाशांना पाणीपरुवठाा, मलनिस्सारण, नागरी परिवहन पुरवणि, शहरामध्ये प्रामुख्याने गरीबांसाठी नागरी सुविधांची निर्मिती करुन शहरातील नागरिकांचा राहणीमानाचा दर्जा सुधारणे.

**अभियानाची व्याप्ती** :-

- केंद्र शासनाच्या सुचनेनुसार राज्यातील 43 शहरांमध्ये सदर अभियान राबविण्यात येणार आहे..

**अभियानाचे घटक**:-

- अमृत अभियानांतर्गत खालीलप्रमाणे घटकांचा समावेश असणार आहे.
    - **पाणीपुरवठा** :-

      पाणीपुरवठा वृध्दीबदल, जलशुध्दीकरण प्रक्रिया यंत्रणा, मीटरींग, जुन्या पाणीपुरवड्रा योजनेचे पुर्नजीवीकरण, जलस्त्रोतांचे पुर्नजिविकरण व भुजल पातळी वाढाीचे उपक्रम, दुर्गम शहरे, पर्वतीय व किनार पट्टीवरील शहरे तसेच जया शहरामध्ये पाण्याच्या गुणवत्तेची समस्या अशा शहरामधील विशेष पाणीपुरवड्रा योजना इत्यादी.
    - **मलनिस्सारण** :-

      विकेंद्रीत भुयारी गटार योजना, जुन्या मलनिस्सारण योजनांच्या वृध्दीबदल, मलप्रक्रिया केंद्रे, जुन्या मलनिस्सारण योजनांचे व मलप्रक्रिया केंद्रांचे पुनर्वसन, पाण्याचा पुर्नवापर व पुर्नप्रक्रिया इत्यादी.
    - **पर्जन्य जलवाहिनी** :-

      पूरनिर्मूलनासाठी पर्जन्य जलवाहिनी बांधकाम इत्यादी.
    - **नागरी वाहतूक** :-

अंतर्गत जलवाहतूकीची साधेन, बसेस, पदपथ, वॉकवेज, साईडवॉक, फुट ओव्हर ब्रीज, नॉन मोटोराइज्ड ट्रान्सपोर्ट, बहुमजली वाहनतळ, बस रॅपिड ट्रांझिट सिस्टिम इत्यादी.

- **हरित क्षेत्र व बगीचे इत्यादी**.
- **सुधारणा व्यवस्थापन व सपोर्ट** :-

  स्वतंत्र सुधारणा पर्यवेक्षण यंत्रणा, IRMA.
- **क्षमता बांधणी** :-

  वयैक्तीक, संस्थात्मक

**अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीच विभाजन :-**

सदर अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या वार्षिक अभियान निधीचे विभाजन खालीलप्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **बाब** | **निधीचे प्रमाण (%)** |
| --- | --- | --- |
| 1 | प्रकल्प निधी | 80 % |
| 2 | सुधारणांसाठी प्रोत्साहन निधी | 10 % |
| 3 | राज्य प्रशासकीय व कार्यालयीन खर्च | 8% |
| 4 | केंद्र शासन प्रशासकीय व कार्यालयीन खर्च | 2 % |
| **एकूण** | | **100 %** |

राज्य शासन/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाचा निधी हा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे वापरण्यात येईल.

------*****------

**मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम (नियोजन विभाग)**

शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2014/प्र.क्र.400/2014/12, दि.29/05/2015

**योजनेचा उद्‌देश** : राज्यातील विकास प्रक्रिया,त्यातील टप्पे जाणून, समजून घेत असताना शासकीय यंत्रणेतील कामकाज, त्यातील घटकांचा ताळमेळ, आणि निर्णय प्रक्रियेचा अनुभव तरुणांना मिळावा, त्यातून समर्पित वृत्तीने समाजसेवा करण्यासाठी प्रामाणिक, ध्येयवादी, सुजाण नागरीक तयार व्हावेत यासाठी राज्यातील तरुणांसाठी हा कार्यक्रम सुरु.

**लाभार्थी** : राज्यातील 21 ते 25 या वयोगटातील तरुण.

**योजनेचे स्वरुप** : या कार्यक्रमाकरीता फेलोंची संख्या 20 निश्चित करण्यात आलेली असून, फेलोंच्या एकूण संख्येच्या 1/3 संख्या महिला फेलोंची असणार आहे. फेलोंचा दर्जा शासकीय सेवेतील गट अ च्या अधिकाऱ्याच्या समकक्ष ठरविण्यात आला आहे.

- फेलोंच्या निवडीबाबतची सर्व कार्यवाही नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत करण्यात येते.
- 20 फेलोंची निवड 11 महिन्यांकरीता करण्यात येते. असाधारण कामगिरी करणाऱ्या फेलोचा कालावधी 2 वर्षांपर्यंत वाढविता येतो.
- निवड झालेल्या फेलोंना दरमहा रु.35,000/- इतकी छात्रवृत्ती व त्याव्यतिरिक्त रु.5000/- एवढा प्रवासखर्च देण्यात येतो.
- निवड झालेल्या फेलोंना यशदा, पुणे मार्फत 15 दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते.
- या कार्यक्रमांतर्गत अवर्षणमुक्त महाराष्ट्र/अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प, विशेष पायाभूत सुविधा, रस्त्यांचे जाळे, पर्यटन विकास, ई-गव्हर्नन्स, आदिवासी उपयोजना/विशेष घटक योजनांची परिणामकारक अंमलबजावणी, दळणवळण यंत्रणा, पर्यावरण/carbon credit/वातावणीय बदल आणि सार्वजनिक व खाजगी भागीदारीचे प्रकल्प, राज्यातील वनक्षेत्र वाढविणे, नापिक जमीन वृक्ष लागवडीखाली आणणे, पर्यायी वनीकरणाचा मोठा कार्यक्रम राबविणे आणि वनहक्क कायदा 2006, किफायतशीर जलमार्ग विकसीत करणे, बंदर विकास पर्यटन विकासांतर्गत सागरी अभ्यास (वातावरणीय बदल व पर्यावरण या अंतर्गत), राज्य शासनाच्या सहभागातून राज्यातील रेल्वे प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी इ.प्रकल्पांतर्गत किंवा शासन निश्चित करेल त्या क्षेत्रात फेलोंनी काम करणे आवश्यक. निवड होणाऱ्या फेलोंना या क्षेत्रांपैकी ज्या क्षेत्रात काम करावयाची इच्छा आहे अशा किमान 3 क्षेत्रांचा पसंतीक्रम उमेदवारांकडून घेऊन हा पसंतीक्रम विचारात घेऊन उमेदवारांना नियुक्ती देण्यात येते.

**********

**<u>मदरसांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)</u>**

**योजनेचा उद्देश** : मदरसामधील विद्यार्थ्यांना पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांप्रमाणेशैक्षणिक गुणवत्ता/योग्यता प्राप्त होण्याकरीता मदरसामधील पारंपारीक शिक्षणाबरोबरच शास्त्र, गणित, समाजशास्त्र, हिंदी व इंग्रजी हे आधुनिक विषय शिकविण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरविणे. ज्यायोगे त्यांच्यकरीता माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल व नोकरीच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध होतील.

**लाभार्थी** : अल्पसंख्यांक मुस्लीम समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागास व मकतब/मदरसा/दारुल उलूम येथे धार्मिक शिक्षण घेणारी मुले.

**योजनेचे स्वरुप** : ही योजना संपूर्णतः केंद्र शासन पुरस्कृत आहे. तथापि, योजनेची अंमलबजावणी राज्य शासनामार्फत करण्यात येणार आहे. या योजनेद्वारे मदरसांना त्यांच्या विद्यार्थ्यांकरीता प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील आधुनिक विषयातील गुणवत्तापूर्ण व व्यावसायिंक शिक्षण प्राप्त करुन घेण्यासाठी नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ ओपन स्कूलींग NIOS शी संलग्न व्हावे लागेल. या योजनंअंतर्गत 14 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या मदरसातील विद्यार्थ्यांकरीता NIOS मार्फत देण्यात येणारे व्यावसायीक शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध होईल. तसेच मदरसामध्ये आधुनिक विषय शिकविण्याकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकांना त्यांचे अध्यापन कौशल्य वाढविण्याकरीता प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे. या योजनेअंतर्गत आधुनिक विषय शिकविणाऱ्या शिक्षकाचे वेतन अनुदान, ग्रंथालय, बँक सुविधा तसेच प्राथमिक/माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी, सायन्स/गणित किटस् तसेच इतर अध्यापन विषय साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी, सायन्स लॅब, कॉम्प्युटर लॅब,वर्कशॉप व त्यांची देखभाल इ.साठी अनुदान दिले जाईल.

*******

**समग्र शिक्षा अभियान (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)**

**उद्देश** : वयोगट 3 ते 18 वर्षे (पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक म्हणजे. इ.12 ची पर्यंतच्या मुलांच्या शिक्षणासाठी) असणाऱ्या मुलांना गुणवत्तापूर्ण व 21 व्या शतकातील कौशल्ये अंगीकृत करणारे शिक्षण प्राप्त होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, शिक्षक प्रशिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण, मुलींचे वसतीगृह, व अपंग एकात्मिक विकास योजना, या पूर्वीच्या योजना शालेय शिक्षणाकरीता एकात्मिक योजना म्हणून केंद्र पुरस्कृत योजना भारत सरकारने सन 2018-19 पासून सुरु केली. या योजनेचे समग्र शिक्षा अभियान असे नामकरण केले आहे.

**लाभार्थी** : समग्र शिक्षा ही योजना प्रामुख्याने शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मुलांसाटी लागू आहे. तथापि, मोफत पाठ्यपुस्तके, शिक्षक प्रशिक्षण इ.बाबी खाजगी अनुदानीत शाळांमधील मुले व शिक्षक यांच्याकरीता लागू राहतील. तर, शिक्षण हक्क कायद्यातील कलम 12 (1)(C) नुसार 25 टक्केआरक्षण या तरतुदीअंतर्गत खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये प्रवेशित बालकांच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**योजनेचे स्वरुप** : शैक्षणिक दृष्ट्या मागास गट, डावी कडवी विचारसरणी बाधीत जिल्हे, विशेष लक्ष केंद्रित जिल्हे आणि आकांक्षित जिल्ह्यांचा शैक्षणिक विकास साधण्यावर भर. या योजनेअंतर्गत शाळाबाह्य मुले, बेघर, अनाथ, रेल्वे स्थानकांवर राहणारीतसेच दुर्बल व वंचित घटकांतील मुलांसाठी निवासी शाळा, निवासी वसतिगृह, शाळांचे सक्षमीकरण (बांधकाम), शाळा सुविधा उपलब्ध नाही अशा ठिकाणची शहरी वंचित मुले/अनाथ मुले यांना नियमित शाळेत जाण्याकरीता परिवहन/मदतनीस सुविधा, शिक्षण हक्क कायद्यानुसार मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, 25 टक्के प्रवेश सुविधा, शाळाबाह्य मुलांकरीता विशेष प्रशिक्षण, स्थलांतरीत मुलांचे शिक्षण व हंगामी वसतीगृह, गुणवत्तेशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रम, अध्ययन समृध्दी कार्यक्रम, संयुक्त शाळा अनुदान, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडक शाळांसाठी ग्रंथालय तरतूद, राष्ट्रीय अविष्कार अभियान हा विज्ञान विषयक उपक्रम, क्रीडा साहित्य घेण्याची तरतूद, शिक्षक शिक्षण, शाळाबाह्य, दुर्बल आणि वंचित गटातील मुलींसाठी कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय, समानतेकरीता विशेष कार्यक्रम, मुलींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण दिव्यांगांसाठी समावेशित शिक्षण अशा कार्यक्रमांचा समावेश आहे.

**आर्थिक सहाय्य :** या योजनेकरीता केंद्र व राज्याच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाण 60:40 असे आहे.

********

**<u>राज्याचे युवा धोरण (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)</u>**

शासन निर्णय क्र. युकयो-2012/प्र.क्र.65/क्रीयुसे-3, दिनांक 12 नोव्हेंबर,2013

**उद्देश** : राज्यातील/जिल्ह्यातील युवांनी केलेले समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर युवा पुरस्कार प्रतिवर्षी देणे.

**लाभार्थी** : राज्यातील 13 ते 31 या वयोगटातील युवक/युवती व राज्यातील सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1860 किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट 1950 नुसार नोंदणीकृत संस्था.

**योजनेचे स्वरुप** : जिल्हा युवा पुरस्कार जिल्हा स्तरावर एक युवक, एक युवती यांना गौरवपत्र, सन्मानचिन्ह,रोख रक्कम व नोंदणीकृत संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम अशा स्वरुपाचा असेल.

राज्य स्तरावर युवा पुरस्कार क्रीडा विभागाच्या क्षेत्रिय विभागानुसार प्रत्येक विभागातील एक युवक, एक युवतीस गौरवपत्र सन्मानचिन्ह व रोख पुरस्कार या स्वरुपात व संस्थेस गौरवपत्र, सन्मानचिन्ह, व रोख पुरस्कार अशा स्वरुपाचा असेल.

अर्जदार युवक/युवती चे वय पुरस्कार वर्षातील 1 एप्रिल रोजी 13 वर्षे पूर्ण व 31 मार्च रोजी 35 वर्षे पर्यंत असावे. अर्जदाराचे त्या जिल्ह्यात सलग 05 वर्षे वास्तव्य तर राज्यात 10 वर्षे वास्तव्य असणे आवश्यक. पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागून दिला जाणार नाही. पूरस्कार मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही. केलेल्या कार्याचे सबळ पुरावे जोडणे आवश्यक. पुरस्कार प्राप्त युवक, युवती अथवा संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रियाशिल राहण्याचे हमीपत्र देणे आवश्यक. अर्जदार व्यक्ती/संस्थेचे केलेले कार्य स्वयंस्फूर्तीने केलेले असावे. एका जिल्ह्यात पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. अर्जदार/संस्थेच्या सदस्यांचा पोलीस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला देणे आवश्यक राहील.

युवा व युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांची 1 एप्रिल ते 31 मार्च या कालावधीतील गेल्या तीन वर्षाची केलेली कार्य कामगिरी विचारात घेण्यात येईल. तसेच युवा व नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले

सामाजिक कार्य, राज्याचे साधन संपत्ती जतनव संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य, समाजातील दुर्बल घटक, अनुसुचीत जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग इ.बाबतचे कार्य, शिक्षण, प्रौढ शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण, व्यसनमुक्ती तसेच युवांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य, राष्ट्रीय एकात्मतेच प्रोत्साहन देणारे कार्य, नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या, महिला सक्षमीकरण इ.बाबत कार्य, साहस इ.बाबतचे कार्य.

जिल्हा स्तरावरील पुरस्कारांची निवड जिल्हास्तर पुरस्कार निवड समितीकडून करण्यात येईल तर राज्य स्तरावरील पुरस्कारांची निवड राज्यपुरस्कार निवड समितीकडून करण्यात येईल. दरवर्षी 01,मे या महाराष्ट्र दिनी जिल्हा पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल व 23 ऑगस्ट रोजी राज्य स्तरारवरील पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल.

********

## खेलो इंडिया (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)

शासन निर्णय क्र.केआयपी-2316/प्र.क्र.87/क्रीयुसे 1, दिनांक 20 नोव्हेंबर,2018

केंद्र शासनाने राजीव गांधी खेल अभियान, अर्बन स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर स्कीम, नॅशनल स्पोर्टस् टॅलेंट सर्च या तीन योजनांचे एकत्रिकरण करुन "खेलो इंडिया-क्रीडा विकासाचा राष्ट्रीय कार्यक्रम" ही योजना सुरु केलेली आहे.

**उद्देश** : या योजनेची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

क्रीडांगण विकास, क्रीडा शिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम, राज्यस्तर खेलो इंडिया केंद्राची स्थापना, वार्षिक खेळाच्या स्पर्धा, प्रतिभावंत खेळाडूंचा शोध आणि विकास (शिष्यवृत्ती), खेळाच्या पायाभूत सुविधांचा वापर आणि निर्मिती/सुधारणा, क्रीडा अकादमीसाठी सहाय्य, ग्रामीण आणि देशी व आदिवासी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा, शाळेतील मुलांची शारिरीक दुरुस्ती (तपासणी व मापदंड), महिला क्रीडा स्पर्धा, दिव्यांग लोकांमध्ये खेळाच्या सुविधा व स्पर्धा, शांती आणि विकासासाठी खेळ

**लाभार्थी** : राज्यातील खेळाडू

**योजनेचे स्वरुप** :

- देशातील खेळाच्या मैदानांचा सर्वे करुन GIS प्रणालीवर दर्शविण्यात येणार
- क्रीडा मार्गदर्शकांसाठी ऑनलाईन अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून यादवारे क्रीडा शिक्षक व स्वयंसेवकांना मास्टर ट्रेनर म्हणून विकसित करणार. हे मास्टर ट्रेनर अन्य क्रीडा शिक्षकांना प्रशिक्षित करतील. ही योजना राज्याच्या योजनेला पूरक योजना म्हणून राबविण्यात येईल.
- राज्याने निर्माण केलेल्या क्रीडा सुविधा पुर्ण क्षमतेने वापरात आणल्या जात नसल्याने, त्याचा अधिकाधिक चांगला वापर होण्याच्या दृष्टीने राज्य स्तरावर खेलो इंडिया केंद्राची स्थापना करुन केंद्र शासनाद्वारे करारनामा (एमओयु) करुन केंद्र शासनाद्वारे साई (SAI) मार्फत अशा ठिकाणी डे-बोडींग योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना साईमार्फतच राबविण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासन केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र विकास कार्यक्रम व सी.एस.आर.द्वारे निधी उपलब्ध करुन देणार आहे.
- खेलो इंडिया योजनेअंतर्गत 2017-18 पासून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.यामध्ये एकूण 16 खेळांचा समावेश

केलेला आहे.राष्ट्रीय क्रीडा महासंघ, भारतीय शालेय खेळ महासंघ, व भारतीय विद्यापीठ असोसिएशन यांच्या वतीने एकत्रित ऑलिंपीक अभियान राबविण्यात येईल. या स्पर्धेतून प्रतिभावान खेळाडूंची निवड केली जाणार असून अशा खेळाडूंना खेलो इंडिया अंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

- देशातील प्रतिभावंत खेळाडूंचा शोध घेण्यासाठी विविध चाचण्यांचे आयोजन करण्यात येऊन या चाचण्यांमार्फत पहिल्या वर्षी 1000 प्रतिभावंत खेळाडू शिष्यवृत्ती व प्रशिक्षणासाठी आठ वर्षांसाठी निवडण्यात येतील. निवड झालेल्या खेळाडूंना भारतीय खेळ प्राधिकरणाची क्रीडा अकादमी, क्रीडा शाळा, क्रीडा महाविद्यालये, राज्य क्रीडा अकादमी, तसेच खेळाडू वा खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या क्रीडा अकादमी मध्ये प्रवेश देण्यात येईल.
- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक अॅथलेटिक्स ट्रॅक, सिंथेटिक हॉकी मैदान लाईट व्यवस्थेसह, सिंथेटिक टर्फ फुटबॉल मैदान धावनपथ व लाईटव्यवस्थेसह, बहुउद्देशीय सभागृह, जलतरण भराव, मानवी क्षमता व पुनर्प्रगती प्रयोगशाळा स्थापन करणे, या शिवाय विद्यापीठांमध्ये स्पोर्टस् एक्सलंस सेंटर निर्माण करणे
- या योजनेअंतर्गत ग्रामीण, देशी व आदिवासी खेळांना व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्पर्धांचे आयोजन करणे
- खेलो इंडिया अंतर्गत देशातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती तपासण्यासाठी मापदंड विकसित करण्यात येत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याची शारिरीक तपासणी करुन विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक फिटनेसबाबतची माहिती संकलन करण्याची प्रक्रिया, नियम व मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येतील.
- राष्ट्रीय स्तरावर महिलांच्या एकूण 4 गटांमध्ये स्पर्धा होणार असून, या स्पर्धांमध्ये 12 खेळ प्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. तत्पूर्वी राज्यस्तरावरील स्पर्धा सुध्दा 12 खेळ प्रकारांमध्ये 4 गटात घ्यावयाच्या आहेत.
- दिव्यांग व्यक्तीसाठीच्या खेळांच्या आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यांना व भारतीय क्रीडा प्राधिकरणास वित्तीस सहाय्य पुरविणे. स्टेडीयम दिव्यांग सुलभ होण्याकरीता आवश्यक निधी दिव्यांग सक्षमीकरण योजनेतून उपलब्ध केला जाईल. या योजनेतून प्राप्त निधीचा उपयोग खेळाडू, खेळाडूंचे वर्गीकरण, साहित्य, प्रशिक्षण आणि पॅराऑलिम्पिक खेळांसाठी संघाची तयारी आणि स्पर्धांसाठी करण्यात येईल.

**आर्थिक सहाय्य** : राज्य शासन केवळ महिला क्रीडा स्पर्धांवरील खर्च करणार असून, उर्वरीत सर्व योजनांवरील 100 टक्के खर्च केंद्र शासन करणार आहे.

*********

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (उद्योग उर्जा व कामगार विभाग)**

शासन निर्णय क्र. योजना-2019/प्र.क्र.121/उद्योग-7, दिनांक 01 ऑगस्ट,2019

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना राज्यस्तरीय कार्यक्रमांतर्गत योजना म्हणून राबविण्यात येईल.उद्योग संचालनालय, मुंबई हे योजनेचे प्रमुख अंमलबजावणी संस्था म्हणून कार्यवाही करतील.

**योजनेचे उद्दिष्ट** : राज्यातील युवक-युवतींना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी, त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून स्थापित होऊन पुढील पाच वर्षात सुमारे 1 लाख सूक्ष्म, लघु उपक्रम स्थापित होणे व त्यामाध्यमाजून एकूण 10 लाख रोजगार संधी राज्यात उपलब्ध होणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रथम वर्ष 2019-20 साठी एकूण 10 हजार लाभार्थी घटक उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**पात्र घटक (लाभार्थी)** : कायदेशीररित्या पात्र असणारे उत्पादन,सेवा उद्योग, कृषि पूरक व्यवसाय, कृषिवर आधारित उद्योग, ई-वाहतूक व त्यावर आधारीत व्यवसाय, एकाच नाममुद्रेवर (ब्रँड ) आधारित संघटीत साखळी विक्री केंद्रे, फिरते विक्री केंद्र/खाद्यान्न केंद्र इ.घटक कार्यक्रमांतर्गत पात्र असतील.

**पात्रतेसाठी अटी** : 18 ते 45 या वयोगटातील कुठलेही स्थायी उत्पन्न नसलेले स्थानिक रहिवासी. अनुसूचीत जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक यांच्यासाठी 5 वर्षे शिथिल.

उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट

शैक्षणिक पात्रता - रु.10 लाखावरील प्रकल्पासाठी 7 वी उत्तीर्ण, रु.25 लाखावरील प्रकल्पासाठी 10 वी उत्तीर्ण.

एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस कार्यक्रमाचा लाभ घेता येईल. (कुटुंबाची व्याख्या-पती, पत्नी)

अर्जदार व्यक्तीने प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अथवा तत्सम केंद्र अथवा राज्य शासनाच्या अन्य विभागाकडील/महामंडळाकडील अनुदानावर आधारित स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्पाचे स्वरुप** : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषि पूरक उद्योग/व्यवसायांसाठी रु.10.00 लाख व उत्पादन प्रकारच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रु.50.00 लाख राहील. मुख्यमंत्री

रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत प्रकल्प उभारणीच्या खर्चाचे वर्गीकरण, बँक कर्ज 60% ते 75%, अर्जदाराचे भागभांडवल 5% ते 10%, शासनाचे आर्थिक सहाय्य अनुदान स्वरुपात (मार्जिन मनी) 15% ते 35% असे असेल.

या कार्यक्रमासाठी ग्रामीण भागासाठी (20,000 च्या आतील लोखसंख्या क्षेत्रासाठी) खादी ग्रामोद्योग मंडळ व उर्वरीत भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र हे कार्यक्रम अंमलबजावणी संस्था म्हणून काम पाहतील. या कार्यक्रमाची सुलभ अंमलबजावणी होण्याकरीता कर्ज प्रस्तावापासून अनुदान वितरणापर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गतचे कर्जप्रस्ताव कार्यबल समितीच्या मंजूरीनंतर बँकांकडे (सरकारी व खाजगी शेड्यूल) मंजूरीकरीता पाठविण्यात येतील. बँकांच्या मंजूरीनंतर राज्यशासनाचे अनुदान दावे संबंधित बँक शाखा सादर करेल. या दाव्यांची छाननी होऊन उद्योग संचालनालयामार्फत राज्य शासनाचे अनुदान संबंधित बँक शाखेस नोडल बँकेच्याद्वारे जमा होईल.

**आर्थिक तरतूद** : या कार्यक्रमाद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, कार्यक्रम कालावधीत (पुढील 5 वर्षात) एकूण 1 लाख घटक स्थापित करण्याचे व सुरुवातीचे वर्ष 2019-20 साठी एकूण 10 हजार घटक (लाभार्थी) उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टांच्या 30% उद्दिष्ट महिला प्रवर्गासाठी व 20% उद्दिष्ट अनुसूचीत जाती/जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखून ठेवले आहे. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांचेकडून उद्दिष्टाच्या प्रमाणात तरतूद उद्योग विभागास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उर्वरित तरतूद शासनाच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

********

## राजभाषा म्हणून मराठी भाषेचा प्रशासकीय कामकाजात व दुय्यम न्यायालयात वापर करणे

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम,1964 अन्वये दिनांक 26 जानेवारी,1955 पासून महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपितील मराठी भाषेचा स्वीकार करण्यात आलेला असून, महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम,2015 द्वारे 1964 च्या अधिनियमामध्ये महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असेल अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम,1966 मध्ये नमूद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजनांकरीता मराठी भाषा वापरणे दि.01 मे,1966 पासून अनिवार्य करण्यात आले आहे. दि.21 जुलै,1998 पासून वर्जित प्रयोजने वगळून अन्य प्रयोजनांसाठी सर्व फौजदारी न्यायालयांची तसेच उच्च न्यायालयाला दुय्यम असलेल्या, राज्यातील सर्व दिवाणी न्यायालयांची भाषा मराठी असेल असे निर्धारित करण्यात आले आहे. न्याय व्यवहारात मराठीचा वापर वाढावा या करीता जिल्हा स्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्यात येणारे दावे मराठीतून दाखल करण्याबाबत परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत मा.उच्च न्यायालयानेही त्यांच्या दि.09/12/2005 च्या परिपत्रकान्वये सर्व दुय्यम न्यायालयांना आपल्या स्तरावर 50 टक्के कामकाज मराठीतून करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

********

## केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी.

द ऑफिशियल लँग्वेज ॲक्ट,1963 अन्वये केंद्रिय कार्यालयीन कामकाजासाठीची भाषा ठरविण्यात आलेली आहे. दि ऑफिशियल लँग्वेज रिझोल्यूशन,1968 अन्वये देशातील विविध भागातील लोकांना केंद्रशासनाशी संवाद साधणे सोपे व्हावे यासाठी हिंदी, इंग्रजी यासह स्थानिक जनतेच्या भाषेचाही प्रशासकीय कामकाजात समावेश करण्याबाबतचे त्रिभाषा सुत्र प्रथमच स्विकारण्यात आले. केंद्रिय कार्यालयात भरावे लागणारे विविध अर्जांचे नमुने स्थानिक जनतेच्या सोयीसाठी प्रादेशिक भाषेत छापण्याच्या सूचना त्रिभाषा सूत्राच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या आहेत. त्रिभाषा सूत्राच्या अनुषंगाने सर्व केंद्र शासकीय कार्यालये, त्यांच्या अखत्यारीतील कार्यालये, राष्ट्रीयीकृत बँका, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांना प्रादेशिक भाषा, हिंदी व इंग्रजी अशा तिन्ही भाषेत वेगवेगळ्या अर्जाचे नमुने, नामफलक, सूचनाफलक, निर्देशफलक इ.लावण्याचे निर्देश वारंवार देण्यात आलेले आहेत. मराठी भाषा विभागाच्यादिनांक 05 डिसेंबर,2017 च्या परिपत्रकान्वये केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाची कार्यालये, बँका, विमा कंपन्या, रेल्वे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम इ. मध्ये ज्या बाबींमध्ये इंग्रजी व हिंदीबरोबरच प्रादेशिक भाषेचा वापर करावयाचा आहे त्या सर्व बाबी नमूद करुन त्यामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबतच्या सूचना एकत्रितरित्या देण्यात आलेल्या आहेत.

*******

**<u>केंद्रिय व राज्य अधिनियम तसेच वैधानिक व इतर बाबींच्या मराठी-इंग्रजी अनुवादाबाबत.</u>**

केंद्रिय अधिनियमांचा अनुवाद ते प्राधिकृत पाठ म्हणून पुस्तक स्वरुपात प्रसिध्द करण्यापर्यंतचे सर्व काम मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त भाषा संचालनालयामार्फत केले जाते. तसेच महाराष्ट्र राज्य विधामंडळाकडून पारीत झालेल्या राज्य अधिनियमात नवीन सुधारणा समाविष्ट करणे व त्याचे अद्ययावतीकरण पुनर्मुद्रण करणे व अंतिमतः पुस्तक स्वरुपात प्रसिध्द करणे, तसेच वैधानिक स्वरुपाच्या कामकाजाचा मराठी-इंग्रजी अनुवाद करण्याचे काम भाषा संचालनालय करते.

********

## भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग)

शा.नि.क्र.: रासांधो 2010/शासंप्रो 2011/प्र.क्र.306/सां.का.4, दिनांक 30 जानेवारी,2013.

**योजनेचा उद्देश** : राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून राज्य सांस्कृतिक धोरण 2010 जाहिर केले आहे. या धोरणातील निर्णयानुसार शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी यांच्या नावे शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना सुरु करताना पंडित भीमसेन जोशी यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन शास्त्रीय गायन व वादन या दोन क्षेत्रांचा या योजनेअंतर्गत विचार करण्यात आला आहे.

**भारतरत्न पं.भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना** : भारतरत्न पं.भीमसेन जोशी संगीत प्रोत्साहन योजनेअंतर्गत ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनंअंतर्गत शास्त्रीय संगीतात शिक्षण घेणाऱ्या हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्याच्या कलेच्या शिक्षणास मदत करण्यात येणार आहे.भारतीय संगीतात पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. शास्त्रीय गायनाचे शिक्षण घेणारे 06 व वादनाचे शिक्षण घेणारे 06 अशा एकूण 12 विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते.ही शिष्यवृत्ती प्रती विद्यार्थी दरमहा रु.5000/- प्रमाणे 2 वर्षांसाठी मंजूर करण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येतात. पात्र विद्यार्थ्यांची तज्ञ समितीकडून परीक्षा घेऊन त्यामधील गुणवत्तेनुसार व आर्थिक परिस्थितीनुसार योग्य विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. या उपक्रमाचा एकूण खर्च रु.16,68,000/- एवढा आहे.

**भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार** : या उपक्रमांतर्गत भारतरत्न पं.भीमसेन जोशी यांच्या नावे शस्त्रीय संगीतात (गायन व वादन) प्रदीर्घकाळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलावंतास जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.  या पुरस्काराची रक्कम रु.5.00 लाख इतकी आहे. हा पुरस्कार सोहळा दरवर्षी दि.04 फेब्रुवारी या त्यांच्या जयंतीदिनी अथवा दि.24 जानेवारी या त्यांच्या स्मृतीदिनी आयोजित करण्यात येतो. या उपक्रमाचा एकूण खर्च रु.7.00 लाख इतका आहे.

*********

## माझी कन्या भाग्यश्री-सुधारित योजना (महिला व बाल विकास विभाग)

शा.नि.क्र.: भाग्यश्री-2017/प्र.क्र.107/का.3, दिनांक 01 ऑगस्ट,2017.

मुलींचा जन्मदर वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे, मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे यासाठी माझी कन्या भाग्यश्री ही योजना दिनांक 01 एप्रिल, 2016 पासून लागू करण्यात आली. सदर योजना दारीद्रय रेषेखालील कुटुंबात जन्माला येणाऱ्या दोन मुलींसाठी लागू असून दारीद्रय रेषेवरील कुंटुंबात जन्माला येणाऱ्या मुलींसाठी या योजनेतील काही लाभ देण्यात येणार आहे. या योजनेत अमूलाग्र बदल करण्याबाबत वित्त विभागाने सुचविल्याप्रमाणे माझी कन्या भाग्यश्री या योजनेमध्ये बदल करुन माझी कन्या भाग्यश्री सुधारीत योजना दिनांक 01 ऑगस्ट,2017 पासून लागू करण्यात आली आहे. त्यानुसार ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 7.50 लाख पर्यंत आहे अशज्ञ समाजातील सर्व घटकांसाठी लागू करण्यात येत आहे.

**योजनेच्या लाभाचे निकष :**

- एका मुलीनंतर माता/पिता यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मुलीच्या नावे रु.50,000/- बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतविण्यात येतील. या जमा रकमेवर त्यावेळी मुलीचे वयानुसार देय असलेली व्याजाची रक्कम तीला अनुज्ञेय होईल.
- दोन मुलींनंतर माता/पिता यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पहिल्या व दुसऱ्या मुलीच्या नावे प्रत्येकी रु.25,000/- या प्रमाणे एकूण रु.50,000/- इतकी रक्कम दोन्ही मुलींच्या नावावर बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतविण्यात येईल.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

- मातेने/पित्याने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्याचा दाखला योजनेचा लाभ घेण्यापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.
- या योजनेचा लाभ 01 ऑगस्ट,2017 रोजी वा त्यानंतर जन्मलेल्या मुलींना अनुज्ञेय राहील.
- पहिले अपत्य मुलगा असल्यास व दुसरे अपत्य मुलगी झाल्यास किंवा पहिले अपत्य मुलगी असल्यास व दुसरे अपत्य मुलगा झाल्यास योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.
- कुटुंबात पहिले अपत्य मुलगी आहे व दुसरे अपत्य मुलगी जन्मल्यास तीला हा लाभ देय असेल. मात्र तिसरे अपत्य जन्मलास त्यास हा लाभ अनुज्ञेय नसेल. तिसरे अपत्य झाल्यास पहिल्या एक/दोन अपत्यांचे लाभही बंद होतील. तसेच प्रदान करण्यात आलेली रक्कम 911 अतिप्रदानाची वसुली या लेखाशिर्षांतर्गत जमा करण्यात येईल.

- लाभार्थी मुलीचे वडील महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवासी असणे आवश्यक आहे.
- योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करताना बालिकेचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- मुदत ठेवीत गुंतविण्यात आलेले मुद्दल व त्यावरील 18 व्या वर्षी देय असणारे व्या अनुज्ञेय होण्यासाठी मुलीचे वय 18 पूर्ण असणे, इ.10 वी उत्तीर्ण असणे तसेच मुलगी अविवाहित असणे आवश्यक राहील.
- दुसऱ्या प्रसुतीच्यावेळी जुळ्या मुली झाल्यास त्याही योजनेस पात्र असतील.
- बालगृहातील अनाथ मुलींसाठी ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र दत्तक पालकांवर योजनेच्या सर्व अटी/शर्ती लागू राहतील.
- सदर योजना आधारसोबत जोडण्यात येईल.
- 18 वय पूर्ण होण्यापूर्वी मुलीचा विवाह झाल्यास, मुलीची दहावी पूर्वी गळती झाल्यास, 10 वी नापास झाल्यास या योजनेचा फायदा तिच्या पालकांना मिळणार नाही. मुलींच्या नावे जमा असलेली रक्कम शासन जमा होईल. मात्र मुलीचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास मुलीच्या नावे गुंतविण्यात आलेली रक्कम मुदतीनंतर मुलीच्या पालकांना देण्यात येईल.
- प्रत्येक लाभार्थी मुलीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येईल. मुलीच्या नावे रक्कम बँकेत जमा झाल्यानंतर गुंतवणूक प्रमाणपत्राची मूळ प्रत लाभार्थ्यांला देण्यात येईल व त्याची छायांकित प्रत शासकीय कार्यालयात जमा करण्यात येईल.
- वार्षिक उत्पन्न रु.7.50 लाख पर्यत असल्याचे स्थानिक तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला सादर केल्यानंतरच योजनेचा लाभ देण्यात येईल.
- एका मुलीच्या जन्मानंतर माता/पित्याने 1 वर्षाच्या आत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन योजनेचा लाभ मिळण्यासाठी संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सादर केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही. तसेच दोन मुलींनंतर 6 महिन्यांच्या आत कुटुंब नियोजन केल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणाऱ्या कुटुंबांनाच या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

**योजनेची अंमलबजावणी** : योजनेच्या अंमलबजावणीबाबत संनियंत्रण व मूल्यमापनाची जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवायोजना, नवी मुंबई, महाराष्ट्र राज्य यांची राहील. सदर योजना राबविण्यासाठी राज्यस्तरावर मार्गदर्शन व संनियंत्रण करण्यासाठी एक सुकाणू समितीचे गठन करण्यात येणार असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी एका कार्यकारी समितीचे गठन करण्यात येणार आहे.

**आर्थिक तरतुद** : माझी कन्या भाग्यश्री सुधारित योजनेसाठी दरवर्षी रु.100.00 कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

********